१४४, शुक्रवार पेठ,
पुण २.
दि. २०-८-६७

प्रिय माजगावकर,

तुम्हांला मी इथल्या इथे पत्र लिहून पाठवावे असे कांही आपले संबंध औपचारिक नाहीत. मी तुम्हांला केव्हाही भेटू शकतो आणि भावना व्यक्त करू शकतो. परंतु आता असे वाटते की, अनौपचारिकतेमध्ये आणखी एक पातळी अशी असावी, की, जी आपल्या प्रगाढ भावना पत्रानेच नीट व्यक्त करू शकत असावी. आणि हे अपरिहार्यही असावे, म्हणूनच तुम्हांला हे पत्र लिहीत आहे. 'माणूस'च्या सर्व अवस्था मी पाहत आलो आहे. आणि दुरून का होईना 'माणूस'च्या आणि त्याच्या परिवाराशी मी भावनेने समरस होत आलो आहे. 'माणूस'च्या सहवासाचा कधी मला दुरावा वाटलेला नाही. परंतु गेल्या चार महिन्यांतील 'माणूस'चे स्वरूप पाहता त्याची प्रगती निश्चिपणे कौतुकास्पद आणि मला अभिमानास्पद वाटली. या

माणूस
साप्ताहिक
२ सप्टेंबर १९६७ : ४० पैसे

प्रगतीला उपमाच द्यावयाची झाली तर असे म्हणावेसे वाटते की 'आता विडा रंगत चाललेला' आहे! 'माणूस'विषयी मला काय वाटते, तसेच इतरांना काय वाटते, हे पाहण्याचीही उत्कंठा असते. त्या दृष्टीने चर्चा करताना 'दक्षिणायन'वर माझ्या काही मित्रांशी बोलणी सुरू झाली तेव्हा 'दक्षिणायन' ही सर्वश्री श्री. ज. जोशी, वि. ग. कानिटकर आणि पुंडलीक यांनी लिहिलेली लेखमाला अप्रतिम आहे, असा बहुसंख्य सूज्ञ वाचकांचा सूर दिसून आला.

परंतु काही तथाकथित प्राध्यापकांचे मत श्री. ज. जोशी यांच्या 'दक्षिणायना'तील लेखांविषयी नाके मुरडणारे हे ऐकून मला आश्चर्य वाटले, तशीच खूप मौजही वाटली! त्या मानाने प्रा. पुंडलिकांचे लेख या प्राध्यापकांना म्हणे खूप आवडले! प्राध्यापकांना असे लेख आवडतात आणि त्यांना ते वाचावयास वेळ मिळतो हेही नसे थोडके!

मला स्वतःला श्री. ज. जोशी यांचे लेख उत्कृष्ट वाटले. तसेच पुंडलीक आणि कानिटकरांचेदेखील आहेत. परंतु जोशी यांच्या लेखणीला जीवनातील चैतन्याचा स्पर्श जाणवतो. ही गोष्ट वृत्तपत्रीय लिखाणात किती दुर्मिळ आहे, याची सूज्ञांना जाणीव आहेच.

माझ्या या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ दुसरे एक उदाहरण सुचते ते म्हणजे श्री ज. जोशी यांचा बालगंधर्वांवरील अप्रतिम लेख. बालगंधर्वांवर या तोडीचा लेख माझ्या वाचण्यात आलेला नाही. याची बरोबरी करणारे दुसरे शब्दकाव्य म्हणजे 'दादा, ते आलेच नाहीत!' हा वि. ग. कानिटकर यांचा १९ च्या 'माणूस'मधील लेख. तुमच्या 'माणूस'मध्येच 'एक संध्याकाळ' हा श्री. ज. जोशींचा आणि 'दादा ते आलेच नाहीत' हा वि. ग. कानिटकरांचा–हे दोन, बालगंधर्वांवरील उत्कृष्ट लेख प्रसिद्ध व्हावेत हा योग काही औरच.

शेवटी एक विचारतो. 'दक्षिणायन'* हे लेखमालेला लाभलेले सुंदर नाव कोणाला सुचले?

'माणूस'च्या प्रगतीला दहाही वाटा मिळोत. स्नेहांकित

*वि. शं. पारगांवकर*

[*'दक्षिणायन' या सुंदर नावाचे जनक – श्री. वि. ग. कानिटकर – संपादक]

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : चौदावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** **ऑगस्ट, ८**

आपल्या १९-८ च्या अंकात पक्षांतराबद्दल श्री. मो. ग. तपस्वी यांचा लेख आला आहे तो चांगला आहे. त्यात पक्षांतराबद्दल जनसंघ कुप्रसिद्ध नाही, असे म्हटले आहे, ते तितकेसे बरोबर नाही. जनसंघाचे एकेकाळचे अध्यक्ष व संघावरील बंदी उठवण्यास ज्यांचे श्रम कारणीभूत ठरले, असे पंडित मौलीचंद्र शर्मा केवळ राज्यसभेच्या सभासदत्वाच्या आश्वासनावर काँग्रेसवासी झाले. डोंबिवली नगरपालिकेचे एक जनसंघीय सभासद श्री. बाबा राजे हे केवळ अध्यक्षपद मिळाले नाही म्हणून पक्षांतर करते झाले. आपल्या माहितीकरता हे कळवत आहे.

**यशवंत अभ्यंकर, कुर्ला**

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २.
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# शिवसेना! सावधान!

अखेर प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनाही 'शिवसेने'ची दखल घ्यावी लागली. श्री. बाळ ठाकरे यांनी स्थापन केलेल्या 'शिवसेने'संबंधी दक्षिण भारतीय नागरिकांत विशेष भीती वसत आहे, ही गोष्ट नाकारण्यात अर्थ नाही. उत्तर भारतात हिंडणाऱ्या वा वास्तव्य करणाऱ्या मराठी नागरिकाला 'शिवसेने'संबंधी विचारण्यात येते. नाही असे नाही. परंतु त्यात केवळ औत्सुक्याचा भाग असतो. परंतु दक्षिण भारतीय नागरीक–ज्यास आपण सरसकट मद्रासी या नावाने ओळखतो तो मात्र 'शिवसेने'ने काहीसा व्यथितचित्त झाला आहे. याचे कारण असे की, पोटासाठी परराज्यांत जाऊन नोकरी करणारी जमात म्हणून दक्षिण भारतीयांचा विशेष लौकिक आहे. जो स्वतःच्या मालकीचा उद्योगधंदा करतो त्याला अशा चळवळीचा फारसा उपद्रव होत नाही. परंतु नोकरी करणाऱ्या माणसाचा नोकरीचा आधार तुटला तर तो हादरून जातो. मुंबई शहर हे 'शिवसेने'चे रणांगण. या रणांगणावर तिला प्रामुख्याने बड्या किंवा छोट्या पगाराच्या नोकऱ्या अडवणाऱ्या मद्राशांविरुद्ध लढा द्यावयाचा आहे. मुंबईतल्या मराठी माणसाची महाराष्ट्राच्या राजधानीतच उपेक्षा होते. ह्या गाऱ्हाण्यांतून 'शिवसेने'चा अवतार झाला आहे. परंतु मराठी माणसाचे हित पाहण्याची गोष्ट करण्याच्या नादात तिच्याकडून (शाब्दिक) प्रहार झाले ते दक्षिण भारतीयांवर.

त्यामुळच एखादा मराठी माणूस दक्षिणेकडेच-विशेषतः तामीळनाडमध्ये गेला की• त्यास या 'शिवसेने'संबंधी भयग्रस्त मुद्रेने विचारले जाते. गेल्या आठवड्यात प्रधानमंत्री इंदिरा गांधी मद्रासला गेल्या असताना 'शिवसेने'संबंधी त्यांना काय वाटते, असे विचारण्यात आले. गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांनाही हा प्रश्न वारंवार विचारण्यात येतो. त्यामुळे महाराष्ट्र प्रदेश कांग्रेसला एक खास ठराव करून 'शिवसेने'चा निषेध करावा लागला. 'शिवसेने'ने ठाणे नगरपालिकेत बहुमत मिळविल्यामुळे या प्रश्नाला पुन्हा चालना मिळाली आहे. मुंबई महापालिकेची आगामी निवडणूक लढविण्याचा 'शिवसेने'चा विचार असून महाराष्ट्रीय समाज बहुसंख्य असलेल्या विभागात 'शिवसेना' यशस्वी होईल असे सांगण्यात येत आहे.

'शिवसेने'ला एका उद्योगपतीकडून पैशाचा पुरवठा होत असल्याचा आरोप श्री. मधु लिमये यांनी केला आहे. हा आरोप खरा आहे किंवा नाही हे एक श्री. मधु लिमये यांनाच माहीत. परंतु मध्यस्थ वृत्तीने विचार करणाऱ्याला 'शिवसेना'

## दिल्ली दरबार

— सदाशिव पेठकर

कोणाच्या पैशावर फोफावली आहे असे म्हणता येणार नाही.

मुंबईतल्या मराठी समाजाच्या मनातील गाऱ्हाणे श्री. ठाकरे यांनी अचूक ओळखल्यामुळे त्यांना कोणत्याही पक्षाशी जखडला न गेलेला मराठी माणूस सुयश चिंतीत असतो ही वस्तुस्थिती नाकारण्यात अर्थ नाही. 'शिवसेने'चा चालक मराठी समाजाच्या गाऱ्हाण्यांची जी यादी वाचतो ती सर्वच खरी आहे असे मी मानीत नाही. याचे साधे कारण असे की, मुंबईच्या सार्वजनिक जीवनातून मराठी माणूस उखडला गेला असेल तर त्याला इतर भाषिकांच्या आक्रमणापेक्षा स्वतःचा दुबळेपणा, पूर्वग्रह आणि खोटा अहंभावच अधिक प्रमाणात कारणीभूत आहे. मुंबईच्या बहुढंगी आणि बहुरंगी जीवनात सहभागी होण्याचे मराठी समाज टाळत आहे ही गोष्ट नाकारता येणार नाही. फोर्ट विभागात ज्या निरनिराळ्या संस्था काम करीत आहेत त्यांत भाग घेण्याची मराठी माणसाला मना केलेली नसताना तो त्यात प्रवेश करतो आहे, अहमहमिकेने निवडणूक लढवून पदाधिकारी होण्याची खटपट करीत आहे, असे दृश्य गेल्या तीस–चाळीस वर्षांत मुळीच दिसलेले नाही.

### खोटा अभिमान

शेअर बाजारात प्रवेश करावयास मराठी माणसाला कोणी मज्जाव केलेला नाही. नाबर, पंडित अशी एक–दोन नावे सोडली तर शेअर बाजारात किंवा तत्सम इतर वायदे बाजारात मराठी माणूस दिसत नाही. याला गुजराती, मारवाडी आदी व्यापारी वृत्तीच्या समाजांची आक्रमक वृत्ती कारण नसून 'व्यापार हे आमचे क्षेत्र नव्हे', 'रुपये, आणे, पैच्या व्यवहारात बुडून जाणे हा आमचा पिंड नव्हे' ही आपली फुशारकी कारणीभूत आहे. ही फुशारकी कोठपर्यंत जाते याचा अनुभव राज्यसभेत दहा बारा वर्षांपूर्वी राज्यपुनर्रचना विधेयकावरील चर्चेच्या वेळी दिसून आले. त्या वेळचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते श्री. त्र्यं. र. देवगिरीकर म्हणाले की, गुजराती माणसाला रुपये–आणे–प माहीत आहेत. आम्हांला कालिदास आणि ज्ञानेश्वर माहीत आहेत. या फुशारकीमुळे एकतर आम्ही दारिद्र्याची सोबत करून औद्योगिक आणि आर्थिक जीवनावर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत नाही. शिवाय 'लक्ष्मी'ची उपासना करणे हा जणू गुन्हा समजून इतर भाषिक समाजांचा अकारण अपमान करीत असतो.

आमचा हा अहंभाव कोणत्या थरापर्यंत पोहोचतो याचे आगळी एक हरघडी दिसणारे उदाहरण सांगतो. मुंबईतला गुजराती माणूस मराठी माणसाशी बोलताना मोडक्या तोडक्या का होईना पण मराठीत बोलताना आढळतो. उलट सर्वसाधारण मराठी माणूस गुजराती माणसाशी बोलताना मराठीचा किंवा जास्तीत जास्त झाले तर हिंदीचा (त्याही मोडक्या तोडक्या) आधार घेतो. आपण होऊन मुंबईवर मराठी प्रभाव पाडण्याचे दरवाजे बंद करून टाकले आहेत.

अर्थात हो या प्रश्नाची एक बाजू आहे. मराठी समाजाच्या आत्मकेंद्रित वृत्तीचा फायदा घेऊन इतर समाजांनी मुंबईवर आपला वरचष्मा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, ही गोष्ट नाकारण्यात अर्थ नाही. ' मद्राशा 'न आपल्या इंग्रजी भाषेच्या सामर्थ्यावर सरकारी व खासगी क्षेत्रांतील सर्व नोकऱ्यांवर आपली मिरासदारी निर्माण केली, हे दृश्य कोणत्याही कचेरीत आढळून येते. एकीकडून व्यापार–उदिमाची उपेक्षा आणि दुसऱ्या बाजूने इंग्रजीची अडचण अशा दोन कारणांमुळे मुंबईतील मराठी समाज सर्वसामान्यत: कामगार किंवा कारकून यापुढे प्रगती करू शकला नाही. या दुय्यम किंवा तिय्यम दर्जाच्या भूमिका सतत स्वीकाराव्या लागल्यामुळे त्या बरोबर येणारी मानहानीही अंगीकारावी लागली. या मानहानीची बोच मनात सलत असली तरी ' शिवसेने ' सारखी या असंतोषाला फुंकर घालणारी यंत्रणा उभी राहीपर्यंत हा अपमान गिळण्याची सवय करावी लागली होती.

मराठी मनातील हा असंतोष वा उद्रेक दूर करण्याचे वाजवी उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून ही ' शिवसेना ' मुंबईच्या राजकारणात उभी राहिली असती तर आज जो तिच्यासंबंधी साऱ्या भारतभर निषेधाचा उद्गार ऐकू येत आहे तो आला नसता. परंतु तिने प्रारंभापासूनच ' मद्राशा ' विरुद्ध थयथयाट सुरू केला. दुसऱ्याला शिव्या देण्याने दोष झाकले जात असले तरी त्यामुळे वस्तुस्थिती बदलता येत नाही, हा धडा यावरून शिकावा लागतो.

## अखेर काय साधणार ?

त्यामुळे परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, प्रत्यक्षात या ' शिवसेने 'कडून मुंबईतल्या मराठी समाजाचे हित साधले जाण्याऐवजी या मराठी समाजासंबंधी मुळात इतिहासाने निर्माण केलेले गैरसमज वाढविण्याला मदत होत आहे. वस्तुत: इतर कोणत्याही भाषिक गटापेक्षा महाराष्ट्राने साऱ्या भारताचा नेहमीच अधिक विचार केलेला आहे. अधिक काळजी वाहिलेली आहे. परंतु असे असूनही इतिहास काळात मोंगलाविरुद्ध झुंज देण्याच्या निमित्ताने महाराष्ट्राकडून इतर प्रांतामध्ये क्वचित काही लुटालुटीचे प्रकार घडले असण्याची शक्यता आहे. आजही बंगाल, ओरिसा आदी राज्यांत मराठी समाजाचे तेच जुने चित्र रंगविले जाते. अशा वेळी साऱ्या भारताची सहानुभूती संपादन करणे चातुर्याचे ठरले असते. कारण, आता कोणत्याही एका भाषिक गटाला सर्व भाषिक गटांशी वैर संपादन करून आपल्याला

उन्नतीचा मार्ग चोखाळता येणार नाही.

परंतु 'शिवसेने'ने दक्षिण भारतीय समाजाचा 'युंडू गुंडू' असा सर्रास उल्लेख करून त्या समाजाचा अकारण अपमान करण्याचा जो प्रयत्न केला त्या पायीच एरव्ही उपयुक्त ठरण्याची शक्यता असणारी ही संघटना साऱ्या भारताचे शिव्याशाप घेत आहे. 'शिवसेना' म्हणजे अनेक तोंडांचा राक्षस आहे असे उद्‌गार श्रीमती इंदिरा गांधी यांनी मद्रास येथील मुक्कामात काढले. त्या मागे 'शिवसेने'ची गुंडगिरी त्यांना अभिप्रेत आहे, हे उघड आहे. इंदिरा गांधी यांच्या राज्यकारभारावर इतर अनेक प्रकारची टीका करता येईल परंतु त्या प्रांतीय वृत्तीच्या आहेत, किंवा त्या महाराष्ट्रद्वेष्टच्या आहेत, ही टीका निखालस खोटी- ठरेल. असे असताना त्यांच्यासारख्या व्यक्तीलाही 'शिवसेने'ची 'अनेक तोंडांचा राक्षस' या शब्दांत संभावना करावी लागली, यावरून मुंबईंतील मराठी समाजाने आत्मसंशोधन केले पाहिजे, असे मला वाटते.

खरे पाहिले तर आज प्रत्येक राज्य आणि प्रत्येक भाषिक गट केवळ आपल्यापुरतेच पाहत आहे. संपूर्ण भारताचे चित्र फारच थोडया व्यक्तींच्या डोळयांसमोर उभे आहे. बंगाली माणूस बंगालसाठी, आंध्र भाषिक आंध्रसाठी आणि केरळी माणूस (मग तो कोणत्याही पक्षाचा असो) केरळसाठी झगडताना दिसत आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्राने स्वत:पुरता विचार केला तर ती गोष्ट आक्षेपार्ह तरी ठरू नये. परंतु इतरांवर हल्ले करून वा त्यांना शिव्याशाप देऊन हे साध्य करता येईल. असे ज्यांना वाटत आहे, ते मात्र मूर्खांच्या नंदनवनात वावरत आहेत, असेच म्हटले पाहिजे.

'शिवसेने' कडून जे घडले ते नेमके हेच. मराठी माणूस उद्योगधंद्यात कसा स्थिर होईल वा इंग्रजीचे ज्ञान वाढवून वरिष्ठ जागांवर कसा चिकटविला जाईल, याचा विचार करण्याऐवजी या संघटनेने निरपराध उडुपी हॉटेलवाल्यांना आपल्या रागाची शिकार केली. यामुळेच या चळवळीचे स्वरूप महाराष्ट्र पक्षपाती असे न दिसता महाराष्ट्रियेतर विरोधी असे दिसून आले.

आजच्या मराठी समाजाच्या असंतोषाच्या अग्नीवर काही पालिकांत जागा मिळविण्याइतके यश ही संघटना प्राप्त करून घेईलही. परंतु त्यामुळे ती ज्या उद्दिष्टांकरिता जन्म पावली आहे ते उद्दिष्ट मात्र तिच्या हातून सफल होईल, असे आज तिचा जो प्रचार चालू आहे तो पाहता वाटत नाही. कारण वीस-पंचवीस कोटी जनमानसाला दुखवण्याचे कृत्य घडले आहे. 'शिवसेने'ची ही प्रतिमा जोपर्यंत सुधारत नाही, तोपर्यंत तिच्या हातून महाराष्ट्राचे हित होण्यापेक्षा अहितच होण्याचा अधिक धोका आहे. इंदिरा गांधी यांच्या टीकेवरून जर काही बोध घ्यावयाचा असेल तर तो हाच. पण तेथेही आमचा खास 'मराठी' अहंभाव आड येण्याचा संभव आहे.

●

# मुक्ताफळे



## □ चतुराबाई

एका मोठ्या वाड्यात एक मध्यम वयाची विधवा स्त्री राहत होती. मुले वांड निघाली होती – वेगळी झाली होती. नवऱ्याचे भरपूर पेन्शन होते. वडिलांच्या इस्टेटीतला हिस्सा येत असे. यामुळे बाई एकटीच पण विलक्षण टामटुमीत राहत असे.

तिचे वर्तन वाड्यात आदर्श होते. वाड्यात नाना प्रकारची बिऱ्हाडे होती. कुणाच्या अध्यात ना मध्यात. अशा या बाईबद्दल वाड्यातील सर्व मंडळींचे मत मात्र फारच चांगले होते. समारंभातून तिला मोठा मान मिळे.

या बाईला काही दुःख असेल असे कुणाला वाटत नव्हते. कुणी ओळखीचे समोरून आले तर किंचित हसावे, या पलीकडे तिच्याशी कुणी संबंध ठेवीत नसे. नवरा–बायकोची भांडणे, दारिद्र्य, पोरांच्या मारामाऱ्या, यांपासून बाई मुक्त होती. पण या मुक्तीतच तिचे दुःख होते.

उपेक्षित जीवनात विरंगुळा असावा म्हणून एके दिवशी त्या स्त्रीच्या मनात आले, वाड्यातल्या सर्व पोरा-पोरींना फराळाला बोलवावे. मुले ही फुले असतात. काही काळ बगिच्यात बसल्यासारखे वाटेल. वाड्यात बिऱ्हाडकरूंची खूप पोरे आहेत. कुणी आत्या म्हणतात, कुणी आजी म्हणतात, कुणी बाई म्हणतात. वाड्यात बाईने एका पोराच्या हाती सर्क्युलर फिरवले. एका रविवारी दुपारी वाड्यातल्या सगळ्या पोरांना फराळाचे ते निमंत्रण होते.

रविवार उजाडला. दुपारी चारच्या सुमारास वाड्यातल्या सर्व मुलामुलींची टोळी बाईच्या घरात जमली. प्रथमच बाईंच्या घरात शिरल्यामुळे पहिल्यांदा थोडीशी बुजलेली ती ' फुले ' बाई त्यांच्याशी हसू खेळू लागताच चांगलीच उमलली. एक म्हणालं– " आत्याबाई, आत्याबाई, आमचे बाबा अगदी वाईट्ट आहेत. आई चांगली आहे. उगाच्या उगाच आईवर खेकसतात–" दुसरं म्हणालं, " आत्याबाई,

आत्याबाई, आमच्याकडे परवा मोठ्ठं कपाट आणलं आरशाचं! विकत नाही की आणलं– बाबांच्या ऑफिसातले एक शेटजी आले आणि त्यांनी फुकट दिले...!"

"फुकट दिलं–?" बाईंना काही कळेना.

पोरगं पुढे सांगू लागलं–

"मग, बाबा त्यांची बिलं पास करतात हपीसात!"

तिसरं पोरगं दुसऱ्यावर मात करण्यासाठी म्हणालं–

"आमचे आप्पा तर ऑफिसातून काय काय आणतात–! तांबडया पेन्सिली, निळया पेन्सिली, कागद, वह्या, बॉलपेनसुद्धा आणतात!"

एक मुलगी म्हणाली–

"आमच्या आईला आता पुन: बाळ होणार आहे..."

"हवाच हो दुसरा मुलगा–!" बाईंनी त्या मुलीचा गाल कौतुकाने चिमटीत धरून सोडला.

त्यावर ती मुलगी शेजारच्या मुलीकडे पाहत म्हणाली–

"या शरीच्या आईला आता होणार नाही की नाही हो बाळ? लूप बसवल्यावर कधी बाळ होतं का?"

बाईंनी नुसते स्मित केले. बाईंना भीती वाटली, पोरगी विचारणार, "बाई, तुम्ही बसवलात काहो लूप?" खाण्याचे पदार्थ पुढे आल्यावर सर्व पोरं त्यावर तुटून पडली. अधिकच रंगांत आली. एक पोरगा खाता खाता बाईंच्या कानाजवळ जाऊन म्हणाला–

"या किशीची मोठी बहीण आहे की नाही, तिचं आणि गुंडयाचं काही तरी आहे!"

"काहीतरी म्हणजे काय?" बाईंना पण गंमत वाटू लागली.

"एल्. ओ. व्ही. ई.!" त्या कार्टयाने खुलासा केला.

असे तास–दोन तास मोठे मजेत गेले. वाडयातल्या घराघरांतल्या बित्तंबातम्या विनासायास बाईंना कळल्या; आणि बाईंच्या घरात काय काय आहे, हे दुसऱ्या दिवशी पोरांनी सगळया वाडयाभर केले. त्यांचा उंची स्वेटर, नवऱ्याबरोबरचा फोटो, नवऱ्याच्या मित्राबरोबरचा फोटो, सगळे काही पोरांनी अचूक टिपले.

त्यानंतर बाई महिन्यातून एकदा नियमाने सर्व पोरांना फराळाला बोलावीत असतात. त्यांच्या जीवनात नवा आनंद निर्माण झाला आहे.

परवा इंदिरा गांधींनी सर्व केंद्रीय मंत्र्यांच्या मुलांना फराळाला बोलावले, ही बातमी जेव्हा आम्ही वाचली तेव्हा या चतुरबाईंची आठवण आम्हांला झाली. केंद्रीय मंत्र्यांची वये विचारात घेता, सर्वसाधारण वय ५० येते. या वयाच्या मंत्र्यांना अजून 'मुले' या सदरात गणण्यासारखी फारशी अपत्ये नसणार असा आमचा समज होता. परंतु या मुलांच्या मेळाव्यात इंदिराजींचा जो फोटो प्रसिद्ध

झाला त्याने आमचा भ्रमनिरास झाला. नेहरूंना मुलांची आवड होती. या देशात मुलांची आवड ही तूर्त घातुक ठरली आहे. मुले कमी कशी होतील याबद्दल नेहरूंच्या मृत्युनंतर जारीने प्रयत्न सुरू आहेत. फक्त मंत्र्यांच्याच मुलांना फराळाला बोलावून इंदिराजींनी हे सूचित केले आहे, की "मंत्र्यांच्या मुलांपुरतीच मला मुलांची आवड आहे!"

या मुलांच्या सहवासात आपल्या मंत्र्यांची अनेक खासगी विंगे आणि सोंगे या पोरांनी इंदिराजींना नक्की सांगितली असली पाहिजेत. वस्तुत:, विरोधी पक्षाचे मधू लिमये यांच्या पत्नी सौ. चंपावती लिमये यांनी मंत्र्यांच्या मुलांना फराळाला बोलावले असते तर मधू लिमयांना किती दारूगोळा उपलब्ध झाला असता?

परंतु हे सुचले इंदिराजींना! या मुलांना इंदिराजींनी काय दिले असावे? कोकाकोला! बरोबर ओळखलंत. या चित्रावर शीर्षकच दिलेले होते– "कोकाकोला!"

मंत्रिपुत्रांनी आणि मंत्रिकन्यकांनी आपल्या वडिलांच्या ज्या गंमती इंदिराजींना सांगितल्या असतील, त्या ऐकून त्यांना जर संताप आलाच तर तो आवरता यावा, म्हणून कोकाकोलाची योजना मुद्दाम केलेली होती हे आमच्या सहज लक्षात आले. अमेरिकन पेयाची ही जाहिरात झाली, अशी कुल्हेकुई करणाऱ्या डाव्या कम्युनिस्टांना आम्ही विचारतो– "पोरांच्या हातावर फक्त नारळाच्या वड्या ठेवायला इंदिराजींचे माहेर रत्नागिरीचे आहे की काय? त्या कोकाकोलाच देणार! तुम्हांला राग आला असला तर तुम्ही पण कोकाकोला प्या."

ते जाऊद्या– परंतु आपल्या सहकाऱ्यांवर बारीक नजर ठेवण्यासाठी सर्व केंद्रीय मंत्रिनिर्मित बालसेनेला फराळाला बोलावण्याची ही इंदिराजींनी पाडलेली प्रथा पाहून, त्यांच्याजवळ मुत्सद्देगिरीचा अभाव आहे, असे यापुढे कुणाला तरी म्हणवेल काय?

तात्पर्य, साहेबाने कारकुनांच्या मुलांना वारंवार फराळाला बोलावणे श्रेयस्कर!

## □ बेचाळीसचे स्पिरिट

८ ऑगस्ट १९४२. गोवालिया टँक मैदानावरचा तो अफाट जनसागर आणि तिथल्या विस्तीर्ण मंडपातील मंचावर बसलेले थोर थोर स्वातंत्र्यभक्त हे दृश्य ज्यांनी प्रत्यक्ष पाहिले ते धन्य होत. सकाळपासून महात्माजींच्या आगमनाची वाट पाहणाऱ्या जनसंमर्दाची अखेर निराशा झाली. गांधीजींना मागील बाजूनेच मंडपात नेण्यात आले. मंडपाभोवतालच्या झाडांवर शेकड्यांनी चढून बसलेली माणसे कनातीच्या आणि मंडपाच्या झरोक्यांतून आतील दृश्य पाहत असताना मध्येच एखादी फांदी काडकन् मोडून पडत होती. धूळ झटकीत माणसे नवे झाड शोधीत होती. यांतल्या ज्या फांदीवर ग्यानबा बसला होता ती त्या वेळी सुदैवाने मोडली

नाही. नाहीतर त्याच वेळी हात मोडता तर आज हे लिहिणे शक्य नव्हते.

युद्ध सुरू होण्याचा रंग दिसू लागताच गांधीजींनी प्रथम हिटलरला पत्र लिहिले– "तू करतो आहेस हे काही चांगले नाही बरं!" दुसरे पत्र चेंबर्लेन साहेबाला लिहिले– "प्रतिकार करू नका. हिटलरला इंग्लंडमध्ये उतरू द्या, तो आपोआप परत जाईल." परिणाम इतकाच झाला की दोघांची कचऱ्याची टोपली एका कागदाने जड झाली.

युद्ध सुरू झाले. ५ सप्टेंबर १९३९ ला गांधीजींनी व्हॉईसरॉय लिन्‌लिथगो साहेबाची भेट घेऊन त्याला सांगितले–" माझी सहानुभूती शुद्ध मानवतावादी दृष्टिकोनातून इंग्लंड-फ्रान्सकडे आहे. परंतु तुमचे युद्ध-हेतू तुम्ही एकदा स्पष्ट शब्दांत जाहीर करा. साम्राज्य निर्माण करण्यासाठी हिटलर आणि साम्राज्य टिकविण्यासाठी तुम्ही लढत असाल तर दोघेही मरा!"

दोन वर्षे गांधीजींनी व्हॉईसरॉयच्या हृदय-परिवर्तनाची वाट पाहिली. ७ डिसेंबर १९४१ ला जपानने पर्ल हार्बरवर भयानक हल्ला चढवून युद्धात धडाक्याने पदार्पण केले. चेंबर्लेनला खाली खेचून पंतप्रधान झालेल्या साम्राज्यवादी विन्स्टन चर्चिलनी आपल्या मंत्रिमंडळातील स्टॅफर्ड क्रिप्स यांना सांगितले– "भारतात जा. तिथल्या लोकांना सांगा की युद्धानंतर आम्ही तुम्हांला वसाहतीचे स्वराज्य देऊ! स्वातंत्र्य देणे काही जमणार नाही. या स्वराज्यात ज्या प्रांतांना सामील व्हायचे नसेल त्यांचे निराळे राज्य करू!"

पाकिस्तानचे विष नांगीत ठेवून क्रिप्ससाहेब इथे आले. काँग्रेसच्या वतीने मौलाना आझाद, नेहरू, मुस्लिम लीगच्या वतीने महंमदअली जिना व हिंदुमहासभेच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी क्रिप्स साहेबांची भेट घेतली. क्रिप्स साहेबांना भेटून बाहेर आल्याबरोबर सावरकरांनी क्रिप्स योजना ठोकरली– "छुपे पाकिस्तान आमच्या गळ्यात बांधणारी ही योजना आम्ही ठोकरली आहे." काँग्रेसन विचार केल्याशिवाय कुठलीही गोष्ट कधी केली नाही. त्यांना खूप विचार करावा लागला. "समजा, आपण योजना नाकारली आणि मुस्लिम लीगने स्वीकारली तर?" वसाहतीचे स्वराज्य भोगणाऱ्या भारतात मुसलमान नसले तर उपयोग काय त्या स्वराज्याचा?" शेवटी काँग्रेसने व मुस्लिम लीगने योजना ठोकरली. मुस्लिम लीगने नाकारली. कारण, त्यात 'पुरेसे पाकिस्तान नाही' म्हणून! काँग्रसने नाकारली त्यात संपूर्ण स्वातंत्र्य नाही म्हणून!

९ मार्च १९४२ ला रंगून जपान्यांनी घेतले. पाठोपाठ ब्रह्मदेश घशात घातला. जपान भारताचे दार ठोठावू लागला. भारताचे त्या वेळचे गोरे डेप्युटी चीफ ऑफ जनरल स्टाफ, मेजर जनरल मोल्सवर्थ म्हणाले की, जपानी स्वारी झालीच तर प्रथम माघार घ्यावी लागेल. अलाहाबादपर्यंत जपान्यांना कडवा प्रतिकार सुरू करता येणार नाही! जिकडे तिकडे जनतेची घाबरगुंडी उडाली. मुंबई खाली होऊ

लागली. बायका-मुले कोकणात धाडून कारकून मंडळी हाताने स्वैपाक करू लागली. जनतेतले हे बेचाळीसचे पुळपुटे स्पिरिट पाहून गांधीजी अस्वस्थ झाले. हातपाय बांधून भारतीय जनतेला श्वापदापुढे फेकावे तसे ब्रिटिश करणार, असा रंग दिसत होता.

वर्धा येथून गांधीजींनी हालचाली सुरू केल्या. नेहरू भेटून गेले. ' हरिजन ' मधून गांधीजी म्हणाले– " ब्रिटिशांनी जावे ! जाणार ना ? नाहीच का मग जात ? तुम्हांला जायला हवे ! गेला नाहीत तर परिणाम भयंकर होतील..." हळूहळू गांधीजी आवाज तापवीत होते.

– आणि ८ ऑगस्ट १९४२ ला गोवालिया टँक मैदानावर गांधीजी गरजले– " Quit India – चले जाव ! "

हातपाय बांधून भारतीय जनतेला त्राही भगवान करणाऱ्या राक्षसांना चालते व्हा, गादी सोडा. सत्ता सोडा... असे गर्जून सांगणे म्हणजे बेचाळीसचे स्पिरिट !

आता पंचवीस वर्षांनी परवा मुंबईला ' चले जाव 'ची रजत जयंती साजरी झाली. अध्यक्ष होते ना. वसंतरावजी नाईक. ना. नाईकांनी संदेश दिला– " आज बेचाळीसचे स्पिरिट हवे ! " ते पुढे म्हणाले की– " देशाला मजबूत करण्यासाठी आज त्याची आवश्यकता आहे ! "

ना. नाईकांनी हा संदेश योग्य वेळी दिला आहे. ४२ साली ना. नाईक साहेबांनी या स्पिरिटचे काय केले हा प्रश्न महत्त्वाचा नाही. त्या वेळी समजा, ते रिक्रुटिंग ऑफिसर असले, तरी माणसाला उपरती केव्हा व्हावी याचा नियम आहे की काय ? आज ते मुख्य प्रधान आहेत. आज ते संदेश देणारच ! श्रोत्यांना वाटले, हा संदेश मुंबईतल्या जनतेसाठी आहे. परंतु हा संदेश ज्या प्रांतांत आज कॉंग्रेस मंत्रिमंडळ नाहीत, तिथल्या जनतेला आहे. त्यांनी तिथल्या राज्य करणाऱ्यांना ' ४२ चे स्पिरिट ' दाखवले पाहिजे. संदेश नेहमी आम जनतेला असतो आणि भारताची आम ६४ टक्के जनता आज कॉंग्रेसविरोधी आहे. योग्य वेळी संदेश दिल्याबद्दल ना. नाईकांचे कुणीही हार्दिक अभिनंदनच करील ! हे ६७ चे स्पिरिट आहे ! ! स्पिरिट जितके जुने तितके अधिक चढते असे म्हणतात ! ! !

**ग्यानबा**






विजय तेंडुलकर

भेटतील त्या मित्रांना बोलावले पण कुठल्या ना कुठल्या सबबीवर जो तो टाळीत होता. अखेर मी एकटाच गेलो– 'अमन' नामक हिंदी चित्रपट पाहायला. हिंदी तर खराच पण अण्वस्त्रांच्या दुष्परिणामांवर होता. 'भारताचा पहिला आंतरराष्ट्रीय बोलपट' आणि 'एका विश्वव्यापी समस्येचे चित्रण करणारा जगातला पहिलाच चित्रपट' अशा बिरुदांनी त्याची जाहिरात सजली होती. सायरा बानू नि राजेंद्रकुमारबरोबर सर बर्टरंड रसेल यांच्याही त्यात भूमिका असल्याचे प्रसिद्ध झाले होते. बाकी काही म्हणा, पण हे हिंदी चित्रपटवाले जिगरबहाद्दूर. काहीतरी अचाट आणि अफाट– जमो, न जमो– लाखो रुपये आपले नाही तर दुसऱ्याचे इरेस घालून करून दाखवावे यांनीच ! या लोकांच्या एवढ्या एका गुणावर मी नेहमीच लुब्ध असतो. हा 'अमन' पाहण्याआधीच मी त्याचे निर्माते–दिग्दर्शक ज कुणी मोहनकुमार त्यांच्यावर असा खूष झालेलो होतो. या घनचक्कर माणसाच्या या तितक्याच घनचक्कर प्रयत्नाला दाद दिलीच पाहिजे, असे ठरवून मी चित्रपटाचे तिकीट काढले. तिकीट काढताना सहजी आठवण झाली शांताराम बापूंची. पुष्कळ वर्षांपूर्वी काढलेल्या 'डॉ. कोटनीसकी अमर कहानी' ची. तो असाच काहीतरी आंतरराष्ट्रीय वगैरे होतासे आठवले. पण चित्रपटसृष्टीत सर्व काही दर वेळी पहिलेच आणि अपूर्व, एकमेवाद्वितीय असले पाहिजे. एरवी त्याचा प्रभाव पुरेसा पडत नाही. तेव्हा 'डॉ. कोटनीसकी अमर कहानी ' हा पहिला आंतरराष्ट्रीय हिंदी बोलपट आणि हा 'अमन 'देखील अलीकडचा पहिलाच, असा निकाल मनाशी करून मी थेटरात शिरलो.

'अमन' म्हणजे काय ? असा प्रश्न साहजिकच अगदी आरंभी माझ्या मनात आला. आपले हिंदीचे ज्ञान ते काय ! 'चमन' म्हणजे काय ते 'गुलेचमन 'वगैरे शब्दांमुळे अलीकडेच नाटककार विद्याधर गोखले यांच्या कृपेने ठाऊक झालेले; पण

*संन्याशाच्या जटा, चोराचे डोळे,*
*एखाद्या रंगेल रंगराचे ओठ. . . .*


# अ म न

हे 'अमन' तिन्हाईतच. त्यामुळे चित्रपटाइतकीच या नावाच्या अर्थाविषयीही मनात उत्सुकता होती.

चित्रपट गौतम नावाच्या एका तरुण डॉक्टरवर होता. दुसऱ्या महायुद्धात त्याची आई ब्रह्मदेशात विमानहल्ल्यात घायाळ होऊन वारली; तेव्हा हा गौतम 'माँ' म्हणून टाहो फोडणारा बच्चा होता. पुढे तो साऱ्या घायाळ आणि रुग्णाईत मानवतेची सेवा करण्यासाठी उत्तम प्रकारे डॉक्टरकीची परीक्षा उत्तीर्ण झाला. ही तो इंग्लंडात उत्तीर्ण झाला. नंतर अल्पकाळ भारतात राहून तो लगेच जपानला हिरोशिमाच्या अणुस्फोटातल्या बळींची शुश्रुषा करण्यासाठी गेला. आणि जपानमध्येच अणुबाधेने मरून नंतर भव्य उत्तरक्रियेसाठी भारतात परतला— किंवा त्याला आणले. यात इंग्लंडात त्याला सर बर्टरँड रसेल, भारतात त्याचे विधुर वडील आणि जपानात कलकत्त्याच्या शांतिनिकेतनमध्ये हिंदी नाच-गाणे शिकलेली जपानी प्रेयसी भेटली. या प्रेयसीचे नाव मिनोडा. हिचे नाव जपानी असले तरी नाक टागोरांच्या सहवासामुळे की काय, त्यांच्यासारखे बाकदार, सरळ झालेले. 'अमन' चे कथासूत्र हे एवढेच.

चित्रपट पाहताना सहज असा विचार आला की (तेव्हा पडद्यावर इंग्लंडमधल्या कोठल्यातरी नाइट क्लबमध्ये कुणातरी सुप्रसिद्ध नॉर्वेजियन उत्तान कसरतबाज नर्तक युगुलाचे किमान वस्त्रानिशी नृत्य चालू होते; ) अण्वस्त्रे, हिरोशिमा वगैरे जरा विसरले तर हे सारे थोडेफार आपल्या त्या राज कपूरच्या 'संगम' चित्रपटासारखेही आहे, नाही का? प्रेमप्रकरणानिमित्ताने देशोदेशीची सैर? अर्थात अंधारात चुकीचे भासदेखील होतात; कारण असाच विचार करता करता 'संगम' चित्रपट ज्या सारखा म्हणता येईल असे आणखी बरेच चित्रपट आठवले; फक्त आंतरराष्ट्रीय रंगीत सीनसीनरी वजा.

हाही चित्रपट रंगीतच होता. जात्याच रंगवेड्या जपानातली अनेक चित्रणे यात मोठ्या हिकमतीने माथेरान, मनाली, महाबळेश्वर अशी कोठे कोठे करून वापरली होती. अणुबाधा झालेली जपानच्या इस्पितळातली जपानी माणसे म्हणून देखील येथलीच माणसे दाखवली होती, पण हिरोशिमाविषयीचे जपानातले स्मारकवजा प्रदर्शन मात्र अस्सल दिसत होते. कारण त्यातली उजाड भयाणता, माणसांच्या आत्म्यांचाच विध्वंस, शरीरावरची महाभयंकर क्षते, हे सारे पुन्हा एखादे अण्वस्त्र टाकल्याशिवाय कोणाला तितक्या विदारकपणे इतरत्र निर्माण करणे अशक्य आहे. याच चित्रपटात असले प्रयत्न केले होते ते उघड उघड बनावट वाटत होते. जपानमधल्या कोठल्यातरी खऱ्याखुऱ्या बागेतले कबूतरांचे शुभ्र थवे नि त्यांना दाणे टाकणारी बाहुल्यांसारखी टिल्ली, खरोखरीची जपानीच पोरे हाही या चित्रपटातला एक फार खरा भाग. खरे म्हणजे ही सुंदर जपानी बाग, ही निर्भर कबुतरे आणि पोरे, त्यानंतर हिरोशिमाच्या खऱ्याखुऱ्या विध्वंसाचे काळजाला चटके देणारे



अभिनयाची बाजू सांभाळणारे ओमप्रकाश

जपानातले ते प्रदर्शन आणि प्रत्यक्ष दृश्ये— आणि पुन्हा ही सुंदर बाग, ही निर्भर जपानी पोरे–पाखरे, एवढेच जरी दिसते तरी चित्रपटाचा मुद्दा—अण्वस्त्रविरोधी भावना—सिद्ध झाला असता, पण जिगरबहाद्दर मोहनकुमार यांना केवळ यासाठी लाखो—त्यांचा दावा करोडोंचा—रुपये पणास लावता आले नसते आणि एका भारतीय डॉक्टरने मानवतेसाठी केलेल्या त्यागाची, अत्यंत महत्त्वाची कथाही जळत्या चितेच्या हृदयद्रावक शेवटापर्यंत चित्रीत करण्याला संधी लाभली नसती. हेही त्यांच्या दृष्टीने हिरोशिमाच्या अणुस्फोटाइतकेच महत्त्वाचे असले पाहिजे. एरवी या चित्रपटाचा हा एवढा लांबलचक, तसेच कष्टसाध्य प्रपंच त्यांनी तरी कशाला केला असता ?

भावविवश डॉक्टर गौतम, त्याची प्रेमभरी आणि पर्यायाने दर्दभरी कहाणी आणि हिरोशिमाचा या साऱ्यापलीकडे माझ्यासारख्याला नेऊन बेचैन, सुन्न करणारा

विध्वंस, जपानचे म्हणून येथलेच युक्तिबाजपणे घडवलेले सृष्टच-प्रदर्शन आणि यातच चुकून माकून घडणारे अव्वल जपानचे दर्शन, उत्तान नृत्य-गाणी आणि हळवा ध्येयवाद, फुलांची लाल टवटवी आणि लालभडक रक्ताचे वारंवार आग्रहाने घडवले जाणारे दर्शन या साऱ्यांचे हे 'अमन' नामक मिश्रण माझ्या प्रकृतीला जड गेले हे कबूल केलेच पाहिजे. संन्याशाच्या जटा, चोराचे डोळे, एखाद्या रंगेल रंगरावाचे ओठ असे सारे एकत्र करून लहरी विधात्याने घाईघाईने एखादा मुखडा घडवावा तसे सारे दृष्टीला हिसके देणारे आणि लहरी वाटले.

## जुने दोस्त

तरीही आपण हे संपूर्ण मिश्रण गिळले त्याचे एकच कारण. काही जुने दोस्त पडद्यावर पुष्कळ वर्षांनी भेटले व हिरोशिमातल्या अणुस्फोटाने शरीरमनाने जाया झालेल्या जपानी रोग्यांच्या वेशातले 'सज्जन' आणि 'ओमप्रकाश' परिस्थितीच्या आणि नशिबाच्या ओरखड्यांनी तसे हटले असले तरी त्यांना देण्यांत आलेल्या छोट्या भूमिकांतलीही त्यांची मनःपूर्वकता, पूर्वकर्तृत्वाचे हृद्य स्मरण देत होती. ओम्प्रकाशनी तर त्यांच्या अंगभूत आरड्याओरड्याच्या शैलीनेच या चित्रपटातली करुण भूमिका खूप परिणामकारक केली. डॉ. गौतम गेला म्हणून त्याच्या प्रेतापाशी उभा राहून हा कधीही न रडलेला रोगी 'मी रडणार नाही,' 'मी रडत नाही' असे हट्टाने म्हणत म्हणत एकीकडे ढसढसून रडला तेव्हाच या चित्रपटातला डॉक्टर गौतमचा लांबलेला आणि नाटकी मृत्यू क्षणभर खरा भासला. फिल्मिस्तानच्या जुन्या 'सरगम' नामक अत्यंत आचरट, बाष्कळ आणि संगीतनृत्यमय खमंग हिंदी चित्रपटात (हा चित्रपट मी तेव्हा तीनदा पाहिला; ) चित्रपटाला साजेशी आचरट आणि बाष्कळ भूमिका करून पोट फुटेपर्यंत हसवणारे ओम्प्रकाश त्याच शैलीने रडवतात हे मला नव्यानेच कळले आणि इतक्या वर्षांनी त्यांच्या माझ्यात नव्यानेच एक जवळीक – चित्रपट गृहातलीच – निर्माण झाली. आता त्यांना पुन्हा अशी एखादी छोटी का होईना पण चटकदार भूमिका कोण देतो, पाहू या. फिल्मिस्तान-आधीच्या बॉम्बे टॉकीजच्या 'बंधन,' 'कंगन' आदी हलक्या फुलक्या (म्हणजे 'इंटरनॅशनल' नसलेल्या) हिंदी चित्रपटातला चुणचुणीत पोर सुरेश या चित्रपटात एका प्रौढ जपानी डॉक्टरचे काम करीत होता. जपानी मेकपमुळे बेटा पट्दिशी ओळखता आला नाही पण उभे राहण्याची ढब तशीच – तेव्हा तो नायिका मुमताजशांती शेजारी तिचा धाकटा भाऊ म्हणून उभा राहायचा. या चित्रपटात सायराबानू समोर डॉक्टर गौतमचा दिलदार प्रौढ सहकारी म्हणून उभा राहत होता, इतकाच फरक. सायराबानूपुरते विचाराल तर आपल्याला मुमताजशांतीच अधिक पसंत ! (आता कुठे आहे हो ती ?) आणि अर्थात राजेंद्रकुमारपेक्षा अशोककुमार हाच आपला हिरो; अगदी आजसुद्धा तो पुन्हा शीळ घालीत 'धीरे धीरे आरे बादल' करीत समोर आला तर आपण अनावर होऊन टाळ्या मारू.

वलराज सहानी आणि चेतन आनंद हे खरेखुरे बुद्धिजीवी तिष्ठित नट आपले या चित्रपटात शोभेचे बुद्धिजीवी प्रतिष्ठित म्हणून वावरले, झाले. एक हिरोचा बाप, दुसरा हिरॉइनचा. मी म्हणालो, नाहीतरी बाप ही संस्था यानंतर पोरांच्या तरुण वयात इतक्यापुरतीच उरायची – शोभेपुरती.!

संगीत दिग्दर्शक शंकर-जयकिशननी एका गाण्याला मजा केली. माझ्या घरी ' माय नेम ईज ख्रिस्टाइन ' नावाची एक सूचक, चावट इंग्रजी वाद्यसंगीतप्रधान रेकॉर्ड आहे; तिची आठवण त्यांच्या या द्वंद्व गीतात्मक गाण्याने पाहता पाहता जागी केली. कारण हे गाणे जागोजाग तीच रेकॉर्ड होते ना ! संगीत दिग्दर्शनाच्या क्षेत्रातले हे लोकप्रिय ' द्वंद्व ' ऑर्डरबरहुकूम माल पुरवण्यात मोठे कसबी आहेत यात शंका नाही.

राघू कर्मकार हे या रंगीत चित्रपटाचे छाया लेखनपर्यवेक्षक. एकूण देखाव्याच्या रचनेत माणसे – विशेषत: नायक-नायिका – या शोभेच्या आणखी दोन वस्तू ते मानीत असावेत. बाकी या चित्रपटातली नायिका किंमती फुलदाणीसारखी नाजूक आणि नायक सूट-स्पेशॅलिस्टच्या शोकेसमध्ये शोभावा असा पोषाखी होताच म्हणा. म्हणून तर अभिनयाची जबाबदारी जुन्यापान्या ओम्‌प्रकाशवर आली !

' अमन ' पाहून बाहेर पडलो तेव्हा बिलकुल लक्षातसुद्धा नव्हते; पण आता पुन्हा आठवले म्हणून विचारतो, ' अमन ' म्हणजे काय हो ? □

# स्मृती पुराणी . . .

## खून पहावा करून

काही नाटके–विशेषत: हलकी फुलकी विनोदी नाटके–नटसंचामुळे अवीट गोडीची ठरतात. या नटसंचात एकाद-दोन प्रथम श्रेणीचे असतील, तिसरा एक नुसताच विशिष्ट प्रकारच्या भूमिकेसाठी फिट्ट ठरणारा असेल आणि बाकीचे ' कण्टाळू ' या सदरात जमा होत असतील. पण एकमेकांचे गुणदोष सांभाळीत आणि फुलवीत हा संच कधी कधी छोटया जिवाच्या एखाद्या नाटकाचे सोने करून जातो आणि मग एकदा का हा जमलेला नटसंच या ना त्या कारणामुळे पांगला की नादी प्रेक्षकाने केवळ त्या जुन्या बहारदार प्रयोगाच्या स्मृती जपायच्या. ' खून पहावा करून ' या सरिता पतकीलिखित अनुवादित नाटकाचे अक्षरश: असे झाले. त्याचे पुण्याच्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनने केलेले मोजके प्रयोग ज्यांनी पाहिले ते भाग्यवान.

मी या भाग्यवानांपैकी आहे. अशात याच नाटकाचा प्रयोग आणखी कुणीतरी करते आणि तो बऱ्यापैकी होतो असे कानी येताच मी त्या जुन्या आठवणींनी एकीकडे कासावीस होत ठरवून टाकले की हा प्रयोग काही झाले तरी अगदी अवश्य बघायचा.

मी पाहिलेल्या या प्रयोगाचे निर्माते होते मुंबईच्या एअर इंडियाचे महाराष्ट्र

मित्र मंडळ. त्याचे दिग्दर्शन केले होते रमाकांत देशपांडे यांनी. भूमिका करणारी मंडळी, सुलोचनाबाईंचे काम करणाऱ्या धंदेवाईक लता जूकर सोडल्यास, तशी अगदी नवखी होती.

एअर इंडियाच्या या नाट्य-मंडळाचा प्रयोग या मानाने खरे म्हणजे माझ्या किमान अपेक्षेहून उजवाच ठरला. त्यातला नाटकाचे मूळच असा तरुण होतकरू रहस्य-कथा-लेखक 'गर्गे' झालेले अरविंद कारखानीस आणि जहांबाज 'सुलोचनाबाई' लता जूकर यांनी पुष्कळ गंमत केली. सुलोचनाबाईंचा विशी-बाविशीतला मुलगा 'मधुकर' अशोक कुलकर्णींनी मूळ प्रयोगातही दिसत नसे इतका या वयाला साजेशा चटपटीतपणे उभा केला. मधुकरचे फार एकमार्गी पण खुनाच्या न जमलेल्या फंदात पडलेले तीर्थरूप 'आप्पासाहेब' श्रीकृष्ण वालावलकरांनी काही जागी नेमके दाखवले. 'बारटक्के' हे या नाटकातले वैशिष्ट्यपूर्ण पुणेरी पात्र; लॉरेल-हार्डीपैकी जाड्या ढेकूणमिशीवाल्या वल्लीशी जमणाऱ्या लोभस गुटगुटीत व्यक्तिमत्त्वाच्या वामनराव भागवत नामे गृहस्थांनी या भूमिकेत अक्षरशः धमाल केली. असे आणि एवढे या प्रयोगाविषयी वेगवेगळे म्हणता येऊनही एकूण प्रयोग मात्र हवा तसा खुलला नाही. त्याच्या रंगतीला ओघ, गती, नियमन राहिलेले नाही. कुठे तो उत्तम रंगला तर कुठे तितकाच सपाट वाटला. कुठे फार वेगाने गेला तर कुठे अति संथ भासला. नवख्या नटसंचाच्या प्रयोगाचे कित्येकदा असे होते. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनच्या सराईत नटसंचाच्या त्या जुन्या प्रयोगात पाहता पाहता येणारी अवीट रंगत काही या प्रयोगाला पकडता आली नाही.


वस्तुतः असोसिएशनच्या तेव्हाच्या त्या प्रयोगातला 'मधुकर' फिका वाटे, 'इन्स्पेक्टर मोहिते' नाटकाला जरुर तेवढा तऱ्हेवाईक वाटत नसे, आप्पासाहेबांना लुबाडण्यासाठी आलेला काश्मिरी 'समशेरसिंग' जसा या एअर इंडियाच्या तसाच त्याही प्रयोगात बनेल त्याहून एक सरळसोट उमदा गडी वाटला होता. नाटकाच्या विनोदी प्रकृतीपासून मुळातच फटकून बाजूला पडणारी ही भूमिका आहे. असोसिएशनच्या त्या प्रयोगातली हुकुमाची पाने म्हणजे आप्पासाहेबांच्या भूमिकेतले डॉ. श्रीराम लागू, गर्गेच्या भूमिकेतले जब्बार पटेल आणि सुलोचनाबाईच्या भूमिकेतल्या श्यामला आगाशे. या तीन भक्कम आधारांवर या प्रयोगाची रंगत प्रामुख्याने पेलली जाई या तिघांचीही भूमिकेची समज, स्वतःचे व्यक्तिमत्व त्या भूमिकेशी समजून वापरण्यातले कसब, विनोदी नाटकातील उत्तम भूमिकेला आणि नाटकाला आवश्यक ते वाक्योच्चारणाचे चातुर्य आणि हशे घेण्यातला हुकमी हिशेबीपणा, या गुणांनी या तिघांची जणू एक प्रेक्षणीय आणि श्रवणीय स्पर्धाच, नाटकाच्या एकूण रंगतीचे पक्के भान ठेवून, रंगमंचावर चालत असे. पडदा वर गेल्यानंतर पाहता पाहता हे नाटक या सुंदर स्पर्धेने फुलत जाई आणि नाटकाच्या लेखनातले, तसेच नटसंचातले कच्चे दुवे जाणवेनासे होत असत. इतकेच नव्हे तर या तिघांच्या अभिनय स्पर्धेत तुलनेने

कमी ताकदीचे इतर नटदेखील प्रसंगी दाद घेऊन जात. या तिघांच्या आधाराने इतर नटसंचही नाटकाची गती चोख सांभाळीत असे. कुठेही हे नाटक रेंगाळत नसे. किंवा जड होत नसे आणि संपू नयेसे वाटत असतानाच संपत असे. एक असमाधान, चुटपूट मागे राहत असे; पोटभर न हसण्याची. पण या प्रकारच्या नाटकाच्या सौम्य विनोदी जातीत ही चुटपूट अपरिहार्य असते. अशा नाटकाकडे प्रेक्षकाला प्रसंगोपात् पुन्हा खेचण्यालाही हीच कारणीभूत ठरते.

एअर इंडियाच्या 'खून पहावा करून'ने या सुखद अनुभवाचा अंशतः पुनः प्रत्यय दिला. परंतु प्रामुख्याने स्मृतीतला तो तेव्हा दोन–तीनदा घेतलेला सुखद अनुभव पुन्हा ताजा केला. वाटले की गंभीर, भारदस्त, संथ, काहीसे विमनस्क आणि यातून हशे पिकविण्याइतके विनोदी असे श्रीराम लागूंचे विलोभनीय आप्पासाहेब पुन्हा धीरगंभीरपणे एकेक पाऊल टाकीत रंगभूमीवर यावेत. श्यामला आगाशे यांच्या नकटचा नाकाच्या, भांडखोर डोळ्यांच्या आणि तिखट जिभेच्या ठसकेबाज सुलोचनाबाईंनी त्यांना साथ करावी. आणि आपली ताडमाड उंची लपवीत लाजत, संकोचत हातानें रहस्यपूर्ण हस्तलिखित जपत जब्बार पटेल यांचा गांगरलेला कोवळा लाजवाब गर्ग येऊन यात उभा राहवा. श्रीराम खऱ्यांच्या समशेरसिंगने आपल्या अस्सल रुबाबदार आदबशीर व्यक्तिमत्त्वाने गर्गाच्या हस्तलिखितातले रहस्य प्रत्यक्षात आप्पासाहेबांहस्ते चुकत माकत साकार होण्याला सबळ कारण द्यावे आणि वासुदेव पाळंद्यांचा हडेलहप्पी मिशाळ इन्स्पेक्टर मोहिते या गोंधळात निष्पापपणे मधून मधून पोलिस फंडाच्या कार्यक्रमाची तिकिटे खपवण्यासाठी छाती काढून छडी फिरवीत टपकत राहावा...बडबडचा वारटक्क्याच्या जोडीने...

वाईट एवढेच, की हे आता शक्य नाही.

नाटकाचे हेच फार वाईट ! रंगतीचे, चैतन्याचे सारे क्षण इथे क्षणभंगुर. येतात आणि जातात. राहतात फक्त स्मृती–आणि एक कायम चुटपूट.





# पुरंदरच्या बुरुजावरून

पंत दादाजी कोंडदेव म्हणजे मूर्तिमंत दरारा. पंतांचा राग म्हणजे धगधगती आग होती ! त्यांची शिस्त फार कडक. त्यांचं स्वत:चं वागणंही तितकंच आखल्या रेघेसारखं होतं. नागमोडी वळण त्यांच्या स्वभावात नव्हतंच. स्वत: केलेले नियम ते स्वत: अत्यंत काटेकोर दक्षतेने पाळीत. त्यामुळे पंतांचा धाक साऱ्यांना होता. पण पंत मायाळूही फार होते. ते सासूसारखे तिखट होते अन् आईसारखे गोडही होते.

सकल सौभाग्यसम्पन्न जिजाऊसाहेबांना आणि बाल शिवाजीराजांना सांगाती देऊन दादाजीपंतांना शहाजीराजांनी पुणे प्रांतांत रवाना केलं. पंत पुण्यात आले, पुण्याची त्या वेळी अक्षरश: मसणवट झाली होती. आदिलशाही सरदार रायाराव याने पुण्याची नुकतीच धूळधाण उडवलेली होती. पुण्याची जाळून पोळून राखुंडी उडवून त्याने पुण्यातील लोकांची कत्तल उडवली होती. नांगराला गाढवं जुंपून, तो नांगर रायारावाने पुण्यातून फिरवला होता. पुणं भकास झालं होतं. अशा पुण्यात ती मायलेकरं म्हाताऱ्या दादाजीपंतांच्या मागोमाग पुण्याच्या वेशीतून प्रवेशली. पुण्याची ती गिधाडदैना पाहून साऱ्यांचीच मन करचळली. पुण्याची जी अवस्था, तीच पुण्याभवतीच्या मुलखाचीही झालेली होती. शाही फौजांनी डावं–उजवं काहीही ठेवलं नव्हतं.

पण अशा पुण्यात पंत आले आणि त्यांची जिद्द उफाळून आली. महत्त्वाकांक्षा फुलली. म्हाताऱ्याला तरण्याचं बळ आलं. जिजाऊसाहेबांचा आधार त्यांच्या पाठीशी होताच. पंतांनी ठरवलं की, या उजाड मुलखाचं

गोकुळ करायचं. जिजाऊसाहेबांची हौस आणि जिद्द तर त्यांच्याहून अपार! आऊसाहेबांनी पदर बांधला. पंतांनी बाह्या सावरल्या. दोघांच्या सावलीत छोटे शिवबा होतेच.

पंतांनी पुणं सजवायला सुरुवात केली. लाल महाल बांधू घातला. अंबील ओढ्याला धरण घेतलं. पुण्यात सोन्याचा नांगर धरला. वस्ती वाढू लागली. बाजार भरला.

पंतांच्या कडक कारभाराचा रंग पुण्याच्या शिवारावर चढू लागला. शिवारं हिरवीगार होऊन डोलू लागली. एक एक नवल गावोगावच्या पारांवर आणि चावडीच्या ओट्यावर कुजबुजलं जाऊ लागलं. काल म्हणे पुंडावा करणाऱ्या फुलजी नाईक शिळमकराला पंतांनी जेरबंद करून लाल महालापुढं आणलं अन् रयतेला हैराण केल्याबद्दल त्यांनी त्याला गोणत्यात घालून काठीने झोडपलं! परवा म्हणे कृष्णाजी नाईक देशमुखाच्या गावगुंडीबद्दल पंतांनी त्याचे हातपाय तोडले! पंतांचा कारभार असा कडक!

पंतांनी शिवाजीराजांच्या नावाने एक नवंच गाव खेडेवाऱ्यांत वसवलं. गावाचं नांव ठेवलं 'शिवापूर.' गाव कसं गुंजावणी दिसू लागलं. मागे डोंगर. समोर डोंगर. भवती फेर झाडांचा.

पंतांच्या मनात एक कल्पना आली. कल्पना अशी की, शिवापूरच्या शिवारात आंबराई करावी. माणसं पाठवून चवीचवीचा आंबा शिवापुरात रुजवावा. असा बाग भरावा की, शाही बागेतही अशी फळं नसतील.

झालं. कल्पना रुजली. रोपटी तरारली. जिजाऊसाहेबांना आणि राजांना आनंद झाला. शिवापूरच्या ह्या बागेला नाव देण्यात आलं, शहाजीराजांचं. शहाबाग! रोपं पोरासारखी जिवापाड जपली गेली. पंतांच्या माणसांनी मातीत मन घालून मशागत केली. चार पावसाळे

# पंतांचा कारभार

ब. मो. पुरंदरे

हिवाळे उलटले आणि शहाबागेतला आंबा मोहरला. शिवार घमघमलं. मोहोराला हिरवे मोती लगडले.

कैऱ्या भरल्या. झाडं भारावली. कैऱ्यांचा रंग पालटू लागला. तांबूस झाक चढली. कलमी आंबा पाडाला आला. तांबूस मेंदीभवती पित्रळट कुंचला फिरला.

पंतांच्या मनी आलं की, आपल्या धाकल्या धन्यांना असा बहरलेला बाग दाखवावा. पंतांनी शिवाजीराजांना विनंती केली.

"सरकार, शिवापूरचा बाग कलमी आंब्यांनी डवरलाय. आपण जातीने बघावा अशी इच्छा आहे."

"जरूर जरूर दादाजीपंत!"

आणि लाल महालातून घोडे दौडत निघाले. कात्रज घाट ओलांडला. शिवापूरच्या शहाबागेत घोडे शिरले. कलमी झाडं डोलडोलून आणि लवलवून राजांचं स्वागत करीत होती.

राजांनी, पंतांनी आणि बरोबरच्या शिलेदारांनी घोड्यावरून उड्या टाकल्या. भाल्याइतक्या उंचीची झाडं घागर पालथी घालावी तशी घेरेदार दिसत होती. आंबे तर इतके खाली लटकले होते की, सहज हाताला येत होते. टाचा उंचावायचीसुद्धा गरज नव्हती. राजांच्या मुखावर आनंद उमलला. ते पाहून पंतांना कृतार्थता वाटली, त्यांच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या विस्कटल्या. हसू फुटलं. राजे आंबे पाहून उद्गारले,

"वा! पंत ही फळं, भाऊसाहेबांच्या जामदारखान्यातच शोभतील!"

पंतांच्या पडक्या दातांतून आणि सुरकुतलेल्या डोळ्यांतून समाधान सांडू लागलं. त्यांच्या श्रमांचं चीज झालं होतं. पंत म्हणाले,

"सरकार, हा पहिला बहर! हे पहिलं फळ!"

नंतर राजे आणि पंत एक एका झाडापुढून जाऊ लागले. इतक्या लहान वयात इतकं उत्कृष्ट फळ देणाऱ्या झाडांकडे राजे मोठ्या कौतुकाने बघत होते. तेवढ्यात पंत झपझप पलीकडच्या एका झाडाकडे गेले. पंतांचं लक्ष एका पाडाला आलेल्या घवघवीत आंब्यावर गेलं होतं. अशा अधीर उत्सुकतेने आले होते की, ते नकळत आपलं म्हातारपणही विसरले. त्या झाडावरचा तो आंबा खरोखरच मनात भरत होता.



इमान

केशरी व तांबूस छटा त्यावर पसरली होती. आंबा हाताला येत होता. पंतांनी चटकन् त्या फळाला हात घातला आणि हसत हसत त्यांनी आंबा तोडला. डहाळी हेलकावली. पंतांनी हातातल्या आंब्याकडे पाहिलं. चीक द्रवत होता अन् पंतांची मुद्रा बदलत गेली. हास्य मावळत गेलं. ते गंभीर नजरेने आंब्याकडे बघत राहिले. त्यांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. हातातला आंबा थरथरू लागला. राजे दूर होते. ते पंतांच्या दिशेने येत होते. पंतांची मान हलत होती. त्यांनी आंबा जमिनीवर टाकला आणि सरकन् आपल्या कमरेची तलवार उपसली. राजे येत होते. त्यांना दिसलं. त्यांना काहीच उमगेना. पंतांनी आपली तलवार डाव्या हातांत घेतली. स्वतः उजवा हात ताठ धरला आणि त्यांनी डाव्या हातातली तलवार दात ओठ खाऊन उगारली ! स्वतःच्याच उजव्या मनगटावर घाव घालण्यासाठी ! तेवढ्यात राजे मोठ्याने ओरडले,

"पंत ! थांबा, थांबा पंत !"

राजे धावले. त्यांनी पंतांचा तलवारीचा हात एकदम पकडला.

"पंत, काय करता हे ?"

"हात तोडून टाकतो हा !"

"का ? काय झालं, पंत ?"

"बेइमानी केली या हातानं !"

" म्हणजे? काय झालं ? "

पंतांचा हात घट्ट धरून ठेवीत राजे बोलत होते. पंतांनी म्हटलं,

" सरकार, तुम्हांला न विचारता मी आंबा तोडला ! गुन्हा झाला ! गुन्ह्याला माफी मंजूर नाही ! शिक्षा झालीच पाहिजे ! सरकार, कलम करा हा हात ! "

" नाही नाही, पंत ! अहो, यात कसला गुन्हा ? झाडं तुम्हीच लावलीत. सहजी आंबा तोडला तर गुन्हा कसला त्यात ? कोण दोष लावील तुम्हांला ? क्षुल्लक गोष्ट ! "

" आजपर्यंत असा क्षुल्लकही गुन्हा कधी घडला नव्हता. क्षुल्लक गुन्ह्यातूनच चटक लागते. सारा कारभार नासतो ! दौलती बुडतात ! राज्यं बुडतात ! बरे नव्हे, हे बरे नव्हे ! तुमच्या आज्ञेशिवाय मी हे फळ तोडलं. हे बरे नव्हे ! शिक्षा झालीच पाहिजे ! "

पंत ऐकेनात. ते राजांचा हात सोडवू लागले. तेव्हा राजे म्हणाले,

" थांबा पंत ! तुम्ही आम्हांला इतकं मानता ? "

" म्हणजे ? ही शंका का ? भाऊसाहेबांच्या आणि तुमच्या पायींचे चाकर आम्ही ! "

" होय ना ? मग आमचा हुकूम आहे, पंत तलवार म्यान करा ! हातास काही इजा करून घ्याल तर ते आमचे मर्जीस येणार नाही ! सख्त ताकीद आहे आमची ! "

पंतांच्या हातातील तलवार ढिली झाली. राजांनी तलवार काढून घेतली.

स्वाऱ्या पुण्यास परतल्या. पण पंतांच्या मनाला मात्र, आपण विनापरवानगी आंबा तोडला ही गोष्ट रुखरुखत राहिली. उजव्या हाताने पानातला घास घेणंही त्यांना जड वाटू लागलं. अस्वस्थ झालेल्या पंतांनी आपल्या अंगरख्याची उजवी बाही कोपरापासून तलवारीवर चिरली !

पंत दुसऱ्या दिवशी लाल महालात प्रवेशले. सदरेवर भाऊसाहेबांच्या व राजांच्या मुजऱ्याला ते गेले. सारा लाल महाल त्यांच्या कापलेल्या बाहीकडे बघत होता.

○



## प्रीतपरी

रातदिवाणी स्वप्नगंधिता
रानातुन भिरभिरणारी
धुंद सदाची रागबावरी
वेडी स्वप्निल प्रीतपरी
इवल्या चिमण्या त्या पंखांवर
किरणांची नाजुक नक्षी
चंद्रकोर ती अंधारासह
बघत रातिच्या नीलाक्षी
दवात भिजता चिंब खुळी ही
कशी पहाटेवर रुसते
शुभ्र धुक्याचा लेउन पडदा
मौनाचे अन् व्रत जपते
कुठवर राही असला रुसवा
क्षणात किरणातुन हसते
फुलात फुलते–पानोपानी
रेषा अन् रेखित बसते !

*कुन्दाबाला फडणीस*

## आस्वाद

प्रीतीला परीची उपमा देऊन कुन्दाबाला फडणीस यांनी एक सुंदर कल्पना साकार केली आहे. परीसारखीच नसते का प्रीती, सुंदर आणि स्वप्नजा ? पहाटेवर रुसणारी आणि मौनाचे व्रत पाळणारी. प्रीती जगातल्या सौंदर्यात प्रतिबिंबित झालेली दिसते. ही कल्पना छान आहे. चंद्रालाही काही काम दिले आहे. ते काम नीलाक्षाकड पाहत तो करतो हे सांगण्यात चंद्राची रसिकता मानायची की तो छांदिष्ट आहे म्हणायचे ? काही का असेना नजरेपुढे काही सुंदर येऊन गेल्यासारखे वाटते खास !

*– गोपिनाथ तळवलकर*

# भारतीय मुस्लिमांच्या राष्ट्रनिष्ठेविषयी संशय का ?

पुण्यातील काही विचारी नवयुवकांनी ' लोकशाही समाजवादाची चळवळ बळकट करणे व प्रतिगामी उजवी भांडवलशाही यांना विरोध करणे ' या ध्येयाने प्रेरित होऊन ' पुरोगामी युवक मंडळ ' स्थापन केले असून सदर मंडळाचे विद्यमाने ' धर्म आणि राष्ट्रवाद ' ही पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. तीत वर्ण्य विषयाची मीमांसा करताना लेखक श्री. श्रीविलास कुलकर्णी यांनी भारतीय मुसलमानांच्या राष्ट्रनिष्ठेविषयी साशंकता का वाटावी, या मूलगामी प्रश्नाचा विस्ताराने ऊहापोह केलेला असल्यामुळे त्याची दखल या स्तंभातून घेणे अगत्याचे वाटते.

श्री. कुलकर्णी लिहितात– " भारताच्या फाळणीमुळे भारतीय वंशाच्या लोकांची दोन राष्ट्रे निर्माण झाली. एक मुस्लिम बहुसंख्याक असलेले, आणि दुसरे हिंदू बहुसंख्याक असलेले. आजवर एका देशात एक राष्ट्र म्हणून राहिलेला भारतीय मुस्लिम समाज दोन राष्ट्रांत विभागला गेला. आज भारतात जवळ जवळ सात कोट मुसलमान आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने मुस्लिम लोकसंख्या असलेला भारत हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. भारतातील काही मुस्लिमांना पाकिस्तानबद्दल अनैतिक प्रेम वाटते, ही वस्तुस्थिती आहे; कारण भारत–पाकिस्तानातील मुस्लिमांचा वंश एक आहे ! मुळात भारत–पाकिस्तानातील हिंदू–मुसलमानांचे रक्तच एक आहे !"

श्री. कुलकर्णी यांची मीमांसा बव्हंशी समर्पक आहे. परंतु रक्ताचे नाते असलेला अगदी सख्खा भाऊही त्या पवित्र नात्याशी प्रामाणिक राहत नसेल, प्रतारणा करीत असेल तर भारतीय मुस्लिमांनी तरी संताचा आव का आणावा ? ऊठसूट इस्लामचा उदो उदो करून भारतीय मुस्लिमांची नाहक दिशाभूल करणाऱ्या पाकने परवाच्या भारत–पाक युद्धाच्या वेळी प्रत्यक्ष मशिदीवरही अमानुष हल्ले केले नव्हते काय ? तसेच चीनमध्ये रेडगार्डस्करवी इस्लामचे समूळ उच्चाटन केले जात असताना प्रे. अयूब तोंडातून निषेधाचा शब्दही काढीत नाहीत, याचा अर्थ काय ? याचा उघडच अर्थ असा की, भारत, चीन किंवा इतर कोठल्याही परदेशातील मुस्लिमांविषयी प्रे. अयूब किंवा इतर पाक राज्यकर्त्यांना कसलेच सोयर सुतक नाही !

मग भारतीय मुसलमानांनी– अगदी रक्ताचे नाते असले तरी– हा ' फिफ्टी पर्सेंट ' प्रेमाचा उपद्व्याप का करावा ? या तथाकथित ' रक्ताच्या नातेवाईकांना' आमची अशी प्रेमळ सूचना आहे की, एक तर त्यांनी आपल्या या स्वार्थांध नातेवाईकांविषयी वाटणाऱ्या प्रमाला त्वरित तिलांजली द्यावी किंवा सरळ भारत सोडून

पाकिस्तानात जावे आणि आपल्या रक्ताच्या नातेवाईकांच्या गळयात गळा घालून पाकचे खुशाल गोडवे गावेत ! इथे भारतात राहून समस्त मुस्लिम समाजाविषयी हिंदूंच्या मनात निष्कारण अविश्वास निर्माण होईल, असे वर्तन करण्याचा अव्यापारेषु व्यापार तरी करू नये ! कारण, या मूठभर मूर्खांच्या धर्मांधतेमुळे व परधार्जिणेपणामुळे समस्त भारतीय मुस्लिमांच्या राष्ट्रनिष्ठेविषयी साशंकता निर्माण होते आणि खेदाची गोष्ट अशी की, काही हिंदू लोकही ह्या मूठभर मुस्लिमांच्या राष्ट्रद्रोहाला अखिल भारतीय मुसलमानांचे प्रतिनिधित्व बहाल करून निष्ठावंत मुसलमानांविषयीही हेतुपुरस्सर अपप्रचार, गैरसमज पसरवतात.

श्री. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे एकाच राष्ट्रातील भिन्न धर्मियांमध्ये राष्ट्रवादाची ज्योत सारखीच प्रखर असते. आणि हे आजवर अनेकदा सिद्धही झालेले आहे. अगदी १८५७ सालचा स्वातंत्र्य–संग्राम घ्या, सुभाषबाबूंची मुक्ती सेना पाहा किंवा परवाचा भारत–पाक लढा आठवा. त्यात आपल्याला हिंदूंच्या खांद्याला खांदा लावून मुसलमानही प्राणपणाने लढलेला आढळेल ! अब्दुल हमीदसारखे मुस्लिम हुतात्मे दिसतील !

तेव्हा एखादी व्यक्ती केवळ मुस्लिम आहे, म्हणून तिच्याविषयी मनात आकस बाळगून कसे चालेल ? अपराध्याला शासन मिळणे जितके जरूर तितकेच किंबहुना त्याहून निपराध व निष्ठावंत भारतीय मुस्लिमाला संरक्षण मिळणे अत्यावश्यक आहे ! भारतीय मुस्लिमांच्या राष्ट्रनिष्ठेविषयी वारंवार संशय घेणे, मानसशास्त्रदृष्ट्याही घातक आहे. एखादा पती आपल्या पत्नीच्या पातिव्रत्याबद्दल सारखा संशय घेऊ लागला तर तिने आजवर जपलेल्या श्रद्धांना तडा जाण्याची, किंबहुना ती व्यभिचारालाही उद्युक्त होण्याचा धोका उत्पन्न होण्याची शक्यता असते ! एवीतेवी नवऱ्याचा विश्वास संपादन करता येत नाहीच, मग खरोखरीच विश्वासघात करायला काय हरकत आहे, अशी विपरीत प्रतिक्रिया घडण्याची शक्यता नाही काय ?

म्हणूनच, प्रस्तुत पुस्तिका प्रसिद्ध करून एका ज्वलंत प्रश्नाला हात घालणाऱ्या पुरोगामी युवक मंडळाच्या या उपक्रमाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत असतानाच त्यांच्याकडून या संदर्भात अधिक भरीव व विधायक अशा कार्याची अपेक्षा आहे. म्हणजे असं की, कोणीही एखाद्या घटनेचे भांडवल करून राष्ट्रविघातक कृत्य केल्याचे आढळताच संबंधित गुन्हेगारास सर्वसामान्य जनतेपुढे आणण्याची दक्षता नव्हे, धडाडी त्यांनी दाखवावी. म्हणजे मागे पुण्यात गणेशोत्सवाच्या वेळी घडले होते, तसले निंद्य प्रकार पुनश्च घडणार नाहीत ! व मग क्षुल्लक गोष्टींमुळे दोन जमातींत संघर्ष पेटणार नाहीत ! किडयाबरोबर गहूही रगडले जाणार नाहीत ! भारतीय मुस्लिमांच्या मनात भारताविषयी वसत असलेला आपलेपणा, जिव्हाळा अधिक दृढ होईल– प्रसंगोपात्त दृश्यमानही होईल ! –हिदायतखान

समीर

# विचार वारे

## ☐ भारताचे अमेरिकेतील प्रतिबिंब

गेल्या काही वर्षांच्या काळात निरनिराळ्या कारणांमुळे निरनिराळ्या देशांचे भारताबद्दलचे मत दूषित झाले आहे, हे नाकबूल करता येणार नाही काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कोलंबिया विश्वविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. एन्स्ली एम्ब्री यांनी नव्या दिल्लीला दिलेल्या एका भाषणात ही गोष्ट परखडपणे सांगितली. भारतातील दैन्य आणि बेसुमार लोकसंख्या या दोन मुख्य कारणांमुळे सर्वसाधारण अमेरिकन माणसाचे भारतीयांबद्दलचे मत कलुषित झाले आहे. अमेरिकन माणसाच्या मते ही दोन्ही कारणे मानवनिर्मित असल्याने त्यांना काबूत आणता येते. त्यामुळे त्यांना निरंकुश राहू देणे हे एक प्रकारचे अनैतिक आहे. भारत सरकारच्या दोन आणखी मूलभूत मुद्यांमुळेही भारताचे अमेरिकेतील प्रतिबिंब धूसर झाले आहे. ते म्हणजे तटस्थता आणि अहिंसा ! भारतीय तटस्थता ही अमेरिकनांच्या मते रशियाकडे कललेली व अमेरिकाविरोधी आहे. ईजिप्त–इस्रायल संघर्षात भारताने स्वीकारलेल्या धोरणामुळे हे मत अधिक दृढमूल झाले आहे. त्याचप्रमाणे भारताने अहिंसेचे धोरण स्वीकारले असताना गोवा प्रकरणासारखी घटना कशी घडू शकते, हे अमेरिकन माणसाच्या लक्षात येऊ शकत नाही. एकंदरीत पाहता भारताला आपल्यापुढील समस्या सोडविण्यात यश आलेले नाही, असे सर्वसाधारण अमेरिकन मत आहे. काही अंशी ही अमेरिकन टीका जीवन-विषयक दृष्टिकोनाच्या भिन्नतेतून निर्माण झाली आहे.

तरुण अमेरिकनांपैकी फक्त एका वर्गाला मात्र भारताबद्दल आत्मीयता वाटत असलेली दिसते व ती म्हणजे "हिप्पी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'बीटल'-छाप तरुण–तरुणींचा वर्ग. हिप्पींना भारतीय धर्म, आधिभौतिक द्रव्ये आणि मादक द्रव्ये यांच्यांत स्वारस्य वाटते. त्यांच्या मते अमेरिकन मूल्ये असत्य असून भारतीय मूल्यात व परंपरेत मोक्ष सामावलेला आहे.

## ☐ अमेरिका–रशियाचे वाढते सामंजस्य

अमेरिकेत ग्लासबरो येथे अमेरिकन अध्यक्ष जॉन्सन आणि रशियन पंतप्रधान कोसिजीन यांची नुकतीच जी प्रदीर्घ मुलाखत झाली तिच्यामुळे या दोन प्रबळ पण परस्परविरोधी देशांतील सामंजस्य वाढले आहे, असे सर्व जगाचे रास्त मत आहे. परंतु सामंजस्याची ही प्रक्रिया गेली काही वर्षे हळूहळू पण सतत चालू आहे,

असा खुलासा एका अमेरिकन तज्ज्ञांनी केला आहे. न्यूयॉर्क विश्वविद्यालयातील 'आंतरराष्ट्रीय विकास' या विषयाच्या प्राध्यापिका सौ. व्हेरा डीन यांनी परवा नव्या दिल्लीत असे निःसंदिग्ध मत मांडले की, अमेरिका-रशियामधील वाढत्या सामंजस्याचा काटा आता मागे फिरविता येणार नाही. सौहार्दाची ही प्रक्रिया सुमारे दहा वर्षांपूर्वी रशियात प्रारंभ झाल्यानंतर तेथील मंडळींना अभ्यासाला व चिंतनाला इतका वेळ मिळाला आहे की, ही मैत्री सारखी वाढतच राहील. आता उत्पादनावरील निर्बंध कमी करावेत, असे मत मांडणारे अर्थशास्त्रज्ञ रशियात आहेत. जीवनोपयोगी वस्तूंच्या उत्पादनावर आता तेथे भर देण्यात येत असून कोणत्या वस्तूंचे उत्पादन व्हावे याबद्दल गिऱ्हाइकांचे मत घेतले जात आहे.

अमेरिका व रशियामध्ये खूपच गोष्टी समान आहेत. दोन्ही देश अणुशक्तिशाली असूनही दोघांनी हे भयानक हत्यार न परजण्याचा संयम व शहाणपणा दाखविला आहे. दोन्ही देशांना शांती हवी आहे व दोन्ही देशांना अंतर्गत परिस्थिती सुधारण्याची काळजी लागली आहे. अमेरिकेचे लक्ष निग्रो-समस्या सोडविण्याकडे लागले आहे, तर रशिया आपले जीवनमान उंचावण्यात व्यग्र आहे. तेव्हा या दोन देशांतील मैत्री पुढेही वाढतच राहील.

पण याचा अर्थ रशियाचे व साम्यवादी चीनचे संबंध कायमचे दुरावतील काय? उत्तर : राजकारणात 'कायमचे' असे काहीच नसते. आजच्या घटकेला चीनमध्ये कुठल्या प्रकारचा नेता-वर्ग पुढे येत आहे, हे आपल्याला कोठे माहीत आहे?

सौ. डीन यांनी हाताळलेले आणखी दोन ताजे विषय म्हणजे अमेरिकेतील निग्रो व भारतातील लोकशाही.

अमेरिकेत प्रथमपासून निग्रोंच्या विकासाकडे पुरेसे लक्ष देण्यात आले नाही. त्याचे फळ म्हणजे वंशवादाचा स्फोटक उद्रेक होय. पूर्वीपासून साचत आलेल्या या समस्येकडे आता लक्ष पुरविणे भाग झाले आहे. निग्रो जमातीचे गुलामीकडून आर्थिक व सामाजिक प्रगतीकडे होत असलेले स्थित्यंतर फारच मंदगतीचे आहे, असे आढळून आले आहे. पराधीन वसाहतींतल्या जनतेप्रमाणे निग्रो जनतेलाही आता स्वातंत्र्य डोळ्यासमोर दिसू लागल्याने ती अधिक उतावीळ झाली आहे.

भारतीय लोकशाहीबद्दल खुद्द भारतातील बऱ्याच मंडळींना संदेह वाटू लागला आहे; पण सौ. डीन यांच्या मते मात्र भारतीय जीवन-पद्धतीतच लोकशाहीची मुळे खोलवर रुजलेली आहेत. हिंदू आणि बौद्ध तत्त्वज्ञानांमुळे सामान्य भारतीयांची निसर्गतःच लोकशाही विचारप्रणालीवर श्रद्धा बसली आहे. इतकेच नव्हे तर "भारतीय लोक सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी प्रत्यक्ष निर्णय घेण्याची जरूरी असतानाही सारखी चर्चाच करीत बसतील." कदाचित् भारतीय समाजांत फुटीरपणा बळावला तर तोही लोकशाही दृष्टिकोन पराकोटीला पोचल्यानेच बळावेल. ○

# दिलखुश !

## प्रा. सुनीति जोशी

अजून गाडी स्टार्ट करायला १५ मिनिटे तरी होती. रंग्यानं उगीचच आपल्या दाढीचे खुंट खाजवले. मग त्या शिरशिरीतून त्याला एकदम जाणीव झाली, की आपल्याला थंडी वाजते आहे. त्याला नेहमीप्रमाणे जगूकडे चहा मागावासा वाटला. पण तो मख्खपणे तिकिटाच्या पेटीशी चाळा करीत मोटारीला टेकून उभा होता. इतका रेलला होता, की जणू एक मढं कुणाच्या आधारानं टेकून ठेवावं. वाढलेली दाढी. तोंडावर अवकळा. कंबरेत कुणी लाथ घातल्यागत तो वाकला होता. पेटीवरून सवयीनं फिरणारी बोटंच काय ती तो जिवंत असल्याचं दाखवीत होती. नजर मातीत गाडलेली. तो थंडीत कुडकुडत कसा नाही ?

मग तो जवळ जाऊन फक्कन हसला. सोडावॉटरची बाटली उघडावी तसा. पण जगू दचकला नाही. त्यानं मख्खपणानं त्याच्याकडे पाहिलं. प्रेतानं तिरडी बांधणाऱ्याकडे बघावं तसं. आणि परत नजर मातीत पुरली.

" काय जगन्नाथराव, एक चाय पाजा की ! " जग्यानं मोठ्या प्रयासानं नजर उपटली. नाखुशी दाखविण्यास ओठ दुमडला आणि लुळेपणानं हात उचलून त्याच्यापुढं अंगठा फिरवला. नकार रंग्याला पाठ होता. मग त्याला खिजवण्यासाठी तो म्हणाला, " हां बराबर. दोघी भैणी लग्नाच्या आहेत पाठच्या. पैका साठवायला हवा ! काय खरं की नाय ? " आणि टिनच्या फुटक्या पातेल्यावर खडे मारताना आवाज यावा तसा तालबद्ध आवाज करीत तो खिदळू लागला. पण जग्यानं आज बहिणींच्या लग्नाची गोष्ट काढली नाही. त्याच्या मनात त्या वेळी तो विचार नव्हता. आईनं त्याच्या लग्नाचा लकडा लावला होता. मुली सांगून येत होत्या. पण त्यांचीही त्याला आता फिकीर नव्हती. काही तरी एक वेगळीच जाणीव ढेकणासारखी त्याच्या मनाच्या कानाकोपऱ्यात फिरत होती. चावे काढीत होती. तिला शब्दांत धरता येत नव्हतं. उचलून फेकता येत नव्हतं... नुसतं सलणं... बोचणं... जाणवत होतं...

एरवी रंग्याच्या खिदळण्याबद्दल त्यानं त्याच्याशी मारामारी केली असती. पण आता तो त्याच्याकडे नुसता बघत राहिला. त्याच्या घुसळणाऱ्या अंगाकडे, त्याच्या ओठांवर ओघळणाऱ्या लाल ओघळांकडे... त्याच्या जिवाला जणू मुंग्या आल्या होत्या. काहीतरी बधीर-पणे सुन्न झालं होतं. पण त्या बधिर-पणाखाली एक बोचरी तळमळ होती...



रंगावरची नजर काढून त्यानं आजू-बाजूला फिरविली. स्टॉपवर १०–१५ मुलं-मुली. पण त्यात ती नव्हती. झाडा-खालीही कुणी नव्हतं. चिखल बरबटलेला. झिमझिम पाऊस... अजून शेवटचा तास संपायला अवकाश होता. कदाचित हा तास संपल्यावर येईल ती... पण ती शेवटच्या बसला कधीच नसते... आपल्या पहिल्या फेरीच्या वेळीच ती असते... गर्दीत घुसून येते. आपण तिला कधी रागावलो नाही... अगदी पहिल्या वेळची गोष्ट... स्टॉपवर ही गर्दी... ती मध्येच घुसली. मुलांचा हा ओरडा!... पण तिला पाहिल्यावरोबर आपण ओळखलं... गोरीपान, नाकेली, लांडचा वेण्या... घारे डोळे... नक्कीच ती गोखल्यांची कुमी असणार! मुलं ओरडली तरी आपण तिचा पास पंच केला. मग विचारलं, " ओळ-खलं का मला?..." पण तिच्या कपाळावर आठयांची जत्रा जमली. संशयाचा फुगा फुगत राहिला अन् नकाराची हवा ओकीत फुटला. मग आपणच ओळख दिली तशी ती म्हणाली... काय म्हणाली...? ती म्हणाली, "अरे... तू...? तू कंडक्टर झालास?" अन् मग तिची नजर आपल्या कपड्यांत रुतून बसली. डोंगळा रुतावा तशी आणि आपला साहेब हसतो चूक झाली एखाद्या वेळी तर, तशी ती हसली. बाकी आयुष्यात चुकाच फार झाल्यात. सगळंच चुकलंय्! साफ चुकलं सारं गणित आयुष्याचं. ते पुसून टाकून नवीन लिहिताही येत नाही. अगदी वज्रलेख. बेरजेच्या ऐवजी वजाबाकीच झाली... सुखांची... आशांची... स्वप्नांची... आप्पा गेले आणि गणिताचं चिन्हच बदललं एकदम. शाळेला रामराम... नोकरी... ही असली नोकरी. चार टिकल्या हातावर आणि घरात पाच माणसं...

वाऱ्याचा एक झोत आला अन् त्याला वाटलं, आपलं डोकं बधीर झालंय. मेंदूत रक्ताचा कुणी बर्फ बनवलाय. तो बर्फ कचाकच तोडून एक बर्फलाडू बनवलाय... त्यावर ठांबडा तांबडा रंग... कुणीतरी खातोय... तो... हो, तोच आहे तो... गोऱ्या रंगाचा... निळा सूट घालणारा... ऐटबाज चालीचा... पण ती चाल जगूला शिष्ट वाटते. त्याला तो मुळीच आवडत नाही... मुळीच... पण बेल झाली...

ती आली का... नाही. तो दिसतोय. हो, तोच! झाडाखाली उभा राह्यलाय्... पण ती कुठेय्...? की कॉलेजातच आली नाही... आठ दिवस झाले ती येतच नाही. पहिली बस तिनं कधी सोडली नाही. गेल्या वर्षभर... अन् यंदाही कॉलेज सुरू झाल्यावर पहिले चार–पाच दिवस कशी नेमानं पहिल्या खेपेला येई... ती आणि तो... तो नेहमी तिच्याबरोबर... ह्या झाडाखाली दोघं उभे. बस वळताना तो रोज पाही... हो, याच झाडाखाली. तो आज एकटाच दुसरीकडे उभा आहे. त्याला वाटलं, आपण त्या नेहमीच्या झाडाखाली जाऊन उभं राहावं. ऐटीत... तिनं वाकडी मान करून आपल्याकडे बघत हसावं... काहीतरी... काहीतरी... बोलावं... हवं ते...

कणा मोडल्यासारखा आणखीनच कुबड काढून तो बसला रेलून उभा राहिला. तो तिची वाट पाहत आहे... आपणही... पण ती येईल. त्याला भेटेल. आपण फक्त बघू... तिला बरं नसेल का...? तो घरी चौकशी करायला गेला असेल... तिला औषध आणून दिलं असेल... ओतूनही... मग ती हसली असेल... वाकडी मान करून... ते घारे डोळे मग कसे चकाकतात. बसमध्येदेखील ते नेहमी असेच चकाकतात. तो जवळ बसलेला... किंचित् रेलून... ती सुखावलेली... सारखी हसत असलेली... तो बोलत असलेला... आणि आपण फक्त बघत असतो. एक हात दोरी ओढतो... बस थांबते–परत सुरू होते. तो हळूच तिची वेणी ओढतो... ती कलते... कानात तो काही कुजबुजतो... आपण इकडे घंटी ठणठण वाजवीत असतो... परत क्यू .. परत तिकिटे... गर्दी... करकर... घंटा... ब्रेक...

"कंडक्टर वेळ झाली वेळ..." मुलांनी स्टॉप भरला होता. गलका वाढत होता. पण तो एकटाच दूरदूर उभा होता... तिची वाट बघत? कुठे गेली ती? त्याला वाटलं त्याच्याकडे जावं... त्याला विचारावं .. एकटे दिसता...? ती कुठे ..? पण तो खेकसेल... आपण त्याला दोन वेळा गर्दीतून धक्के मारून बाहेर काढलं होतं घुसल्याबद्दल... पण तीही घुसतेच की... ते चालतं... तिची गोष्ट वेगळी... पण हा सैतान .. तो आपल्याला मुळीच आवडत नाही हे खरं... वाटतं चिखलात पाडून चांगला तिबून काढावा.

पण आज हा असा उदासीन का...? हात तिकिटं फाडीत होते... पास पंच करीत होते... रांग संपली... शेवटी बसही... पण तो अजून उभा... तिथेच... तोही चार दिवस दिसला नव्हता... पण तीही कुठे गेली होती...? आपण सरळ

तिच्या घरी गेलो तर...? पण कुणा लेकाला घर ठाऊक आहे ... ! हुडकायला हवं... गोखले वकील जज्ज झालेत आता... कुणीही पत्ता सांगेल... जाऊन विचारपूस करावी.. जाताना जाऊ या– पण नको... हे कपडे बघून ती हसेल... तिची नजर डोंगळ्यासारखी रुतली की ओढून काढणं कठीण...

बस सुरू झाली. पण तो तिथेच उभा एकटाच... भकासपणानं .. पडू लागलेला अंधार गोळा करीत... स्वत: त्यातला एक गोळा बनत... एकटाच... त्याला एकदा वाटलं, त्याला ओरडून हाक मारावी. पण मरूदे... येईल साला चालत... फार घमेंडखोर आहे... धाडकन् दार लावलं गेलं अन् दोन घंटीचे टोल...

मागे एकदा दंगामस्ती केल्याबद्दल त्यानं त्याला न घेता बस सोडली होती... ती बसमध्ये. केविलवाणे डोळे त्याच्यावर खिळले...राखून ठेवलेली जागा दुसऱ्याला द्यावी लागली...पण आपण ऐटीत त्याला ढकलून देऊन दार लावलं...तो हिरमुसलेला...मग कुठेतरी तो सुस्तावला...

" कंडक्टर स्टॉप...स्टॉप गेला माझा..."

" अरे, आज कंटक्टरना झोप लागली. "

" राव, फार काकडलात का पावसात ? "

शेरे मारीत पोरं उतरली...परत खडखड...उगीच वेडं धावणं...पिसाट...

तीही लहानपणी अशीच धावत असे. हाती लागत नसे पळापळीत. कधीच आपल्याला सापडली नाही...कधीच...आपण फक्त मागे पळत राहिलो...आपल्याच वाड्यात राहत गोखले वकील. त्यांची ही एकुलती एक मुलगी. आपल्या बरोबरची. आपण लहानपणी भातुकलीचा खेळ खेळत असू. तिचा पितळेचा खेळ होता...ती मांडे...एकटीच...कुणी हात लावायचा नाही त्याला. आपण फक्त दुरून बघायचं...तिनं खेळ रचायचा. आपण फक्त जवळ उभे...कंटक्टरसारखे...!!

रंग्यानं भला मोठा आळस दिला. एक शिवी हासडली. पाऊस वाढला होता. ऑफिसमध्ये जाता जाता तो परत एकदा फसफसला... " चा पाजणार का ? "

अंगावर पडणाऱ्या पावसाच्या थेंबासारखे ते शब्द त्याच्याकडे आले. घरंगळून खाली पडले. तो निर्विकारपणे चालत होता...कुणा दूरच्या माणसाच्या प्रेतयात्रेत चालावा तसा...

घरी जायची ओढ नव्हती, पण जायला तर हवेच होते...आज त्या मुलीकडचे लोक होकार-नकार विचारायला येणार होते...ती आईला पसंत होती...वहिणी खूष होत्या...पण तिचे केस लांब होते...फारच लांब...त्याला आखूड वेण्या हव्या हव्या वाटत होत्या. तो अंगावर रेलून बसला की तिच्या वेण्या त्याच्या खांद्यावरून बाहीवर डुलत राहत. बसच्या हिसक्यासरशी हिंदकळत. ती हसे. तो काहीतरी बोले...परत ती हसे...

त्यानं डोकं हालवलं...तिथं मुंग्या वारूळ रचत होत्या...ते थोडं कोलमडलं...

त्या भुसभुशीत मातीत तो पळसुल्यांच्या पोरीला नकार देण्याचं कारण शोधू लागला...ते त्या मातीत कुठेतरी लडबडलं होतं...नीट दिसत नव्हतं पण जाणवत होतं...

गाडीच्या तोंडाशी हे पाणी साचलेलं! डब्ब डब्ब पावलं बुचकळीत तो आत शिरला. कोपऱ्यावर पिंपळ...तिथं लहानपणी ती येऊन बसे. मग आपल्याला पानं पाडून दे म्हणून लाडीगोडी...मनधरणी...आपण वर चढून पानं खाली टाकत असू. ती झग्याच्या झोळीत झेली...मग आपण पिकाणी करून देत असू. दातानं चावा काढीत तिच्यावर हत्ती घोडे नाचायला लावीत असू...ती उष्टी पिकाणी तोंडात धरून ती म्हणे...किती छान वाजते रे तुझी पिकाणी जगू! ..." अन् त्या उष्टचा पिकाण्यांना हळुवारपणे ती दोरी गुंडाळत बसे...

त्याच्या ओठावर काहीतरी शिरशिरलं...त्याची सणक थेट डोक्यापर्यंत गेली... तिथल्या वारुळावर तो उभा होता...तो...हो तोच होता... अन् त्याचे ओठ जगूकडे बघून हसत होते...त्यात ती उष्टी पिकाणी केकाटत होती...

घरात दारात पाय नाही तोच आईनं बातमी पुरवली,

" पळसुले आले होते... "

"........."

" मुलाचा निर्णय विचारत होते... "

" ........"

" अरे, बोलत का नाहीस ? "

" नाही म्हणून सांग." तो खेकसला.

" मी नाही सांगणार. येणाराहेत उद्या. कायते तुझं तू सांग... सोन्यासारखी मुलगी......"

" सोन्यासारखी ? ती काळुंद्री ? "

" अन् तू मोठा मदनाचा पुतळा का? परत नोकरी ही अशी...ना घर ना दार..कशाकडं बघायचं लोकांनी..." आईचे नेहमीचे ध्रुवपद सुरू झाले...

कपडेसुद्धा काढावेसे वाटत नव्हते...ना घर ना दार...ना शिक्षण... ना नोकरी...लोकांनी कशाकडे बघायचं...गोखल्यांच्या कुमीनं का ओळख दाखवायची ...का ?...का ?..."

पण कोण जबाबदार याला ?...कोण ?...समोर भिंतीवर लावलेल्या आप्पांच्या फोटोकडे त्याचे थिजलेले डोळे बघत होते...अन् एकाएकी मुंग्यांच्या लाल रंग त्यात डोकावला. तो फोटोकडे धावत गेला... "तुम्ही, तुम्ही जबाबदार आहात याला आप्पा. तुम्ही... " त्याचे धोगरे ओठ धडपडले...त्याला वाटलं तसबिरीतला तो फोटो टराटरा फाडावा...त्याखाली जन्म आणि मृत्यूच्या तारखा...ती मृत्यूची तारीख ओरबडून टाकावी. पण त्याचा हात तेथपर्यंत पोचतच नव्हता...त्याची

बोटं नुसती तसबिरीच्या चौकटीपर्यंत जात होती...ती मृत्यूची तारीख वर शाबूत होती...अगतिकपणे तो पुटपुटत होता... " आप्पा, का गेलात तुम्ही इतक्या लवकर...का...का ?...मला शिकायचं होतं...खूप खूप. कॉलेजात जाऊन...त्या गोखल्यांच्या कुमीसारखं..." त्याला वाटलं ती मृत्यूची तारीख फाडून टाकून आप्पांना ओढून बाहेर काढावं...हा संसार त्यांच्या अंगावर फेकून द्यावा...कॉलेजात जावं...त्याच्यासारखा निळा सूट...गुळगुळीत दाढी...सेंट. झाडाखाली उभं राहावं...मग तिनं वाकडी मान करून...

पण त्याची बोटं फक्त त्या तसबिरीच्या चौकटीचा रंग ओरखडत राहिली. तिला आणखीन बेसूर, बेढब बनवीत राहिली...मग ओरखडून ओरखडून त्याच्या नखात कुसळ गेलं...पण त्याला विव्हळावंसही वाटलं नाही. बहिणीनं चहा आणला...तो त्याला आप्पांच्या तोंडावर टाकावासा वाटला...पण तो नुसताच त्याचे मचमच आवाज करीत घुटके घेत राहिला. स्वयंपाकघरात पळसुल्यांच्या मुलीची दबल्या आवाजात चर्चा होत होती अन् तसबिरीतली लाखो कुसळं त्याच्या अंगावर धावून येत होती ! !

रात्री झोपतानादेखील त्याला वाटलं, एकदा बाहेर पडून तिचा पत्ता काढावा... भेटून यावं...पण पाय उंबऱ्याच्या आत पुरलेले...कानात पळसुल्यांची पोरगी भुणभुण करणारी...बाराचे टोल पडून गेले...त्याला आठवलं...मातुकली खेळताना खेळातली रात्र होई...मग आपण सारे झोपत असू...ती आपल्या जवळ...ती फक्त पुटपुटत राही...मामाची रात्र टण्टण् टण् एक वाजला. मामाची रात्र टण्टण् टण् दोन वाजले...मामाच्या रात्रीचं घड्याळ धावत सुटलेलं...आपण गप्प...ती दोन हातांवर झोपलेली... आपण बघत असू...लगेच सकाळ होई. आपल्याला ते पटत नसे...मग आपण तिचा हात घट्ट पकडून ठेवून म्हणायचो... " झोप झोप अजून. अजून रात्र आहे." मग ती ओरडून म्हणे, " रात्र कुठली ? आता सहा वाजले."

" रात्र इतक्या लवकर संपत नसते काही !" आपण हात न सोडता म्हणत असू.

" होय मुळी संपतेच .." ती म्हणे आणि हात हिसकून उठून बसे... चूल पेटवे... ती मामाची रात्र मग खुंटीवर बसून आपलं जेवण होण्याची वाट बघत राही...

त्या खुंटीवर आता त्याचा कंडक्टरचा पोशाख होता... ती मामाची रात्र आता तिथं येणार नव्हती... कधीच.

कदाचित् ती रात्र आता त्याच्याकडे गेली असेल... त्याच्याकडे... अशी खुंटीवर बसून मग हळूच पलंगावर उतरत असेल... आणि लवकर संपत नसेल. खूप वेळ... खूप वेळ... त्याचं समाधान होईपर्यंत...!

रुसलेली झोप बुबुळात सलत होती. पण मामाची रात्र कधी परतणार नव्हती.

सकाळी उठून परत तेच रहाटगाडगं... क्यू... तिकिटे... खेपा... मारामारी... ब्रेक... शिव्या... बस्स...!

संध्याकाळी बस घेऊन कॉलेजवर जाणं त्याच्या जिवावर आलं होतं. पण जाणं भाग होतं... बस कॉलेजच्या वळणाशी वळली तशी स्टॉपवरून त्याची नजर घरंगळली... अन् त्याच्यावर स्थिर झाली... तो... हो. तोच होता... पिशाच्याचा चेहरा... बुबुळं निखळून पडतील असे डोळे... अन् अचानक ती दिसली. हिरव्या साडीत... पुढे घुसून आली...

अन् त्याला वाटलं एक मोठा ॲक्सिडेंट होतोय... बस आपल्या छातीवरून जातेय्... तिच्या... तिच्या गळ्यात मंगळसूत्र होतं...

सराईत बोटं पास पंच करीत होती. तिकिटे फाडीत होती... पण त्याच्या मनात तो उभा होता... एकाकी... झाडाखाली काल उभा होता तसा आणि त्यानं त्याच्याकडे पाहिलं... नजर जमिनीकडे... मागचा मुलगा ढकलत होता म्हणून पुढे सरकणारा...

स्टँडिंग सुरू झालं तरी त्यानं त्याचं तिकिट फाडलं... त्याला वाटलं काहीतरी बोलावं... त्याला दिलासा द्यावा, पण तो काहीच बोलला नाही. फक्त अगदी हळुवारपणे त्यानं त्याचं तिकीट पंच केलं. अगदी हळू त्याच्या हातात दिलं. त्याला तो अगदी जवळचा वाटत होता... त्याच्या गळ्यात गळा घालावासा वाटत होता... हलकं हलकं वाटत होतं... कुणीतरी खूप जवळचं भेटल्यासारखं...

बस थांबली... मुलं उतरली. तो म्हणाला... "चला रंगापंत, आज तुम्हांला स्पेशल चाय पाजतो..." ○


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये


राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

# फॉस्फोमिन -

# अधिक उत्साह देते. भूक वाढविते. जोम वृद्धिंगत करते. शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते.



## खरोखर!...
## फॉस्फोमिन म्हणजे घरकुलांतील आरोग्याचे कारंजे!





व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस्युक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB® ® हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50 A/67 Mar



? ? ?

# रातोरात लखपती

जी. शरद कृष्णन्

# नवी साथ

सोमवारचा दिवस म्हणजे चर्चा करून अंदाज बांधण्याचा, कसून प्रयत्न करण्याचा पहिला दिवस. पाच दिवसांच्या सलग सौदेबाजीनंतर दोन दिवस विश्रांती घेऊन राशींच्या शुभधारणेची सुरुवात या शिवभक्तांच्या शुभदिवशी होते.

साधारणपणे हमरस्त्यावरील कोणतेही हॉटेल घ्या. कामगारांपासून ते महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांपर्यंत आणि सरकारी नोकरांपासून ते अन्य व्यावसायिकांपर्यंत विविध व्यवसायांतील विविध वयाची मंडळी एकत्र येऊन अंदाज घेत असतात की, 'आज वरळीचा मटकावाला काय आकडा काढणार?' आकड्याच्या एकाच विचारात गढलेली ही मंडळी आजची 'फिट फिगर' काढण्याचा कसोशीने प्रयत्न करीत असतात.

न्यूयॉर्क कॉटनचे बेटिंग बंद झाल्यानंतर मुंबईच्या काही अज्ञात व्यक्तींच्या सुपीक डोक्यातून निघालेला जुगारीचा नवीन प्रकार म्हणजे सध्या राजरोस गाजत असलेला 'वरळी मटका'. कायदेकानूंच्या मर्यादेबाहेर असूनही व्यावसायिक मर्यादा या व्यवसायातील मंडळी काटेकोरपणे पाळत असल्याने या धंद्याला एक 'वेगळीच प्रतिष्ठा' प्राप्त झाली आहे.

जुगारीच्या या प्रकाराचे स्वरूप समजावून घेण्यासाठी अर्धे आयुष्य आकडेबाजीमध्ये खर्ची घातलेल्या एका तज्ज्ञ आकडेबहाद्दराकडून मिळवलेली मटक्याची कहाणी मोठी सुरस आहे.

वरळी मटक्याचे मुख्य कार्यालय मुंबईला आहे. १ ते १० आकड्यांमध्ये बसवलेल्या या जुगारावर शेकडो मंडळी हजारो रुपयांची धुळधाण करतात, तेव्हा

काहींच्या वाट्याला थोडेफार यश येते. क्वचित येणाऱ्या यशाचा या जुगारी मंडळींना असा जबरदस्त कैफ चढतो की, आलेले पैसे जाऊन वरती श-पन्नास रुपये जाईपर्यंत त्यांना आपल्या आर्थिक व्यवहाराची शुद्ध येत नाही.

मटक्याचे आकडे काढण्याची निश्चित पद्धत कोणती याची माहिती हा जुगार नियमित खेळणारांनाही नाही. अनेक सुरस, चमत्कारिक कथा या संदर्भात प्रचलित आहेत.

रात्री ८ ते ८।। च्या दरम्यान तीन मंडळी मटका कार्यालयाच्या खास खोली-मध्ये जातात. त्यांच्यासमोर एक्का ते दश्श्या असे १० पत्ते मांडलेले असतात. आत गलेल्यांपैकी प्रत्येकजण एक-एक पत्ता उचलतो. या तीनही पत्त्यांची बेरीज करून आलेला आकडा 'ओपन' किंवा 'खुलत्या' बाजाराचा आकडा म्हणून जाहीर करण्यात येतो. आश्चर्यजनक पद्धतीने काम करणारी यंत्रणा या मटका-मंडळाच्या मागे उभी असल्यानेच ८।। ला येणारा खुलत्या बाजाराचा आकडा ९–९।। पर्यंत महाराष्ट्राच्या सर्व प्रमुख शहरांत पोहोचतो. आणि पुण्याला तर १०–१०। पर्यंत खुलत्या बाजारा-तील खेळतीचे पैसेही दिले जातात व लगेच बंद बाजारासाठी नवीन पावत्या फाडल्या जातात.

रात्री ११–११।। च्या सुमारास याच पद्धतीने बंद भाव काढण्यात येतो. समजा, अ, ब, क, या तीन व्यक्तींनी ८–७–३ असे पत्ते उचलले तर या तिन्हींची बेरीज म्हणजेच ८ + ७ + ३ = १८. या अठरावरील वरचा आठ हा बंद बाजाराचा आकडा म्हणून जाहीर करण्यात येतो. याच पद्धतीने ८।। ला काढलेला खुलत्या बाजाराचा आकडा समजा ४ (चौक) असेल तर या चारावर बंद बाजाराचा अठ्ठा ठेवतात. ८ या दोन आकड्यांतून तयार होणाऱ्या ४८ या दुहेरी आकड्यांना जोड राशी किंवा ब्रॅकेट म्हणतात.

**अजूनही अनेक भाबड्या जुगारींना मात्र मटक्याचा संबंध मुंबई बाजाराशी असावा असे वाटते.**

पुण्यातील एक नामवंत डॉक्टर गंमत म्हणून नियमितपणे मटका खेळतात. त्यांच्याशी बोलण्याचा प्रसंग आला असताना मी विचारले, " डॉक्टर, हे आकडे कसे काढतात याची काही माहिती तुम्हांला आहे का ?" उपरोधिक हास्य करून डॉक्टर म्हणाले, " बाबारे, ते जर मला माहिती असतं, तर अर्धवेळ मटका, आणि अर्धवेळ डॉक्टरी करण्यापेक्षा मी पूर्ण वेळ मटकेश्वराचीच सेवा केली असती. ही एक गोष्ट मात्र खरी की उद्याचा आकडा कसा येणार याची पूर्वकल्पना नसली तरीसुद्धा पूर्वी आलेल्या आकड्यांच्या आधारे मी काही अडाखे (या अडाख्यांनाच मेथड्, लाईन स्कीम, इत्यादी अन्य उपनावेही आहेत.) बसवले आहेत.

**मी :** मागील आकड्यांच्या आधारे बसवलेले हे अडाखे येणाऱ्या आकड्यांचा मार्ग दाखविण्यासाठी कितपत उपयोगी पडतात ?

**डॉक्टर :** खरं सांगू का ? ४० अडाखे चुकल्यावर एखादे वेळेस अचूक फिगर येते. आणि अशी फिगर आल्यावर मिळणारा आनंद व पैसा (?) हा पुन्हा ४० वेळा थांबण्यासाठी पुरेसा असतो.

आता हे डॉक्टरसाहेब स्वतःच्या अडाख्यांच्या आधारे काढलेल्या आकड्यावर नियमित खेळतात, पण 'आकडेबहाद्दर' म्हटलं म्हणजे असा घुस्सा करतात की, विचारता सोय नाही. काय हो डॉक्टर, तुम्हांला 'आकडेबहाद्दर' म्हटलं तर इतका राग का येतो, असा प्रश्न त्यांना कोणीही विचारला तर त्यांचं उत्तर ठरलेलं. माझा संसार, मुलं-बाळं आणि व्यवसाय सांभाळून मी हा खेळ सांभाळतो. केवळ आपलं काहीतरी 'थ्रिल' असावं म्हणून ! खरा आकडेबाज मात्र पैशापोटी या मागे धावतो, माझी अवस्था अशी नसल्यामुळे मला हे आकडेबाजाचे लेबल लागू शकत नाही.

माझ्या घराच्या कोपऱ्यावर एक पानवाला आहे. पैसे घेणे आणि खेळणे असा दुहेरी प्रकार ही स्वारी करते. पानासाठी चुना मळण्याचे काम चालू असताना जरी सहज विचारले, " काय बबनराव, आजचं काय ?" तर विजेच्या वेगाने कोणते तरी दोन आकडे तोंडातून हमखास बाहेर पडणारच. मटक्यातील अशी ही अधिकारी व्यक्ती. डॉक्टर साहेबांना विचारलेला प्रश्नच मी बबनला विचारला, " काय रे बबन, हे आकडे खरंच पत्त्याच्या आधारे काढतात का रे ?"

" काय साहेब चेष्टा करता होय !"

" अरे बाबा, चेष्टा नाही, मी खरंच विचारतोय." असं कळवळून म्हणून मोठ्या आशेने मी त्याच्या चेहऱ्याकडे पाहतो.

साहेबाला खरंच यातली एक माहिती नसावी, अशी खात्री झाल्यावर आपण एखादे गुपित सांगतो आहोत, अशा थाटात बबन सांगतो, " साहेब, खरं सांगायचं म्हणजे या मटक्याला काहीही मेथडच् नाही साला ! एका वाक्यातच सांगायचं तर ज्या आकड्यावर कमीत कमी बेटिंग, नेमके तेच आकडे बाहेर येतात." इतकी माहिती देऊन आपण खूप उपकार केले, अशा थाटानं पानाला लवंग (?) लावत बबन पान हातात ठेवतो. पुरेशा गप्पा मारून झाल्यावर त्याला नको असलेला माणूस कटवायचा एक मार्ग म्हणजे ही पानपट्टी. तेव्हा गुमान पान तोंडात टाकून मी रस्ता सुधारतो.

मटक्यावर पैसे लावण्याची पद्धत इतकी सोपी की, भणंग, भिकाऱ्यापासून कोणालाही सहजगत्या पैसे लावता यावेत. दोन आकड्यांच्या या जुगारावर तीन प्रकारचे बेटिंग चालते. फक्त खुलत्या बाजाराच्या आकड्यावर आणि फक्त बंद बाजाराच्या आकड्यावर होणाऱ्या बेटिंगला १ रुपयास ९ रुपये असा भाव दिला जातो. एका वेळी कितीही आकडे खेळता येतात.

खुलत्या व बंद बाजारापासून मिळणाऱ्या 'जोड' आकड्यावर खेळले जाणारे बेटिंग यशस्वी झाल्यास १ रुपयास ८१ रुपये असा भाव देण्यात येतो.

सहज पैसा मिळवण्याचा मोह माणसाला मटक्यापर्यंत घेऊन जातो. आणि सुदैवाने पहिल्या दोन–चार तडाख्यांत पैसे मिळाले तर मनुष्य इतका मोहून जातो की, पुन्हा मागे पाय निघणे महा कर्मकठीण !

मटक्याच्या आश्रयदात्यांमध्ये समाजाच्या सर्व थरांतील मंडळी आढळून येतात.

असा हा लोकविलक्षण जुगार सध्या विलक्षण लोकप्रिय आहे. मटक्याच्या लोकप्रियतेचे लक्षणही मोठे गंमतीशीर आहे. कामगार, विद्यार्थी, कनिष्ठ प्रतीचे व्यावसायिक व कनिष्ठ दर्जाचा नोकरवर्ग, या क्षेत्रांतील मंडळी ही या मटकादेवीची मुख्य गिऱ्हाइके.

बरं, याची लागण एखाद्या साथीच्या रोगाच्या गतीने होत असते.

## साथ अशी पसरते ?

एखाद्या कामगाराला एखाद्या दिवशी एक रुपयाचे ८१ रुपये मिळतात. नवीन उमेदीने तो पुन्हा दुसऱ्या दिवशी पैसे फिरवतो. आणि काय आश्चर्य ! आजही पैसे मिळतात. अचानक धनलाभाने प्रमुदित झाल्याने आपला हा आनंद तो मोकळ्या मनाने आपल्या स्नेही–सोबती मंडळींपर्यंत पोहोचवतो. मटक्याच्या संपूर्ण कथेचे साग्रसंगीत श्रवण होते. आणि ऐकणाऱ्या दहा मंडळींपैकी निदान आठ तरी मटक्याच्या मोहमय जाळ्यात अचूक अडकतात. दहा वेळा पैसे गेले तर यातले कोणी ब्र काढणार नाहीत. पण दोनदा मिळाले तर त्याचा इतका डांगोरा पिटतील की, आजूबाजूंनी जाणारी चार–दोन मंडळी तरी या वाहत्या गंगेत मार्गाला लागावीत.

माझ्या माहितीत प्रभाकर म्हणून एक कसबी सुतार आहे. चांगले फर्निचर बनवण्यात त्याचा हात धरणारा मिळणे कठीण. भरपूर श्रम करावेत, भरपूर पैसे मिळवावेत अशा वृत्तीचा. कोण्या मित्राकडून मटक्याची कहाणी त्याच्या कानांवर गेली. प्रथम त्याने सर्व हसण्यावारी नेले. परंतु सलग दोन–तीन दिवस मटकामाहात्म्य ऐकल्यावर एक दिवस सहज म्हणून १७ का २७ असा काहीसा थोडा आकडा निवडून त्याने २ रुपये त्या आकड्यावर फिरवले. आकड्याबरोबरच नशिबाचे चक्र अनकूल फिरले आणि एका रात्रीत २ रुपयांचे १६२ रुपये हातात मिळाले. लागोपाठ दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी पुन्हा २–५ रुपयांचे सुटे आकडे बसले. आणि करवतीच्या तालात रममाण होणारा प्रभाकर आज आकड्याखेरीज दुसरी भाषा करत नाही. आकड्यांनी बरबटलेली तांबडी–हिरवी पत्रके घेऊन उभ्या असलेल्या प्रभाकरला परवाच सिटी पोस्टाच्या कोपऱ्यावर पाहिला आणि मनापासून वाईट वाटले.

सोमवार ते शुक्रवारपर्यंत चालणाऱ्या मटक्याचे बेटिंग दुपारी ३ च्या पुढे सुरू होत असले तरी धंद्याला खरी गती येते ती ६।। च्या पुढे. साधारणपणे रात्री ८ पर्यंत जोडराशीवरील व खुल्या बाजारावरील बेटिंग होत असले तरी खरा वेग शेवटच्या १।।–२ तासांतच येतो. सांगितलं तर विश्वास बसणार नाही. पण या

आकड्यावर बेटिंग घेणारे सुमारे ५५ ते ६० बुकी आज पुण्यात राजरोस काम करीत आहेत. या बुकींचे काही सब बुकीही आहेत. ते जमेस धरता एकूण संख्या १०० च्या घरात जाण्यास काहीच हरकत नाही.

संध्याकाळी सहाच्या पुढे कोणत्याही बुकीकडे जाऊन पाहा. ही भली मोठी भीड उडालेली दिसून येईल. सगळा व्यवहार कसा सुरळीत. मंडळी शांतपणे येतात, भरभर आकडे सांगतात, त्यावर किती रक्कम खेळणार ते सांगतात. समोरचा माणूस, आपल्याला याच्याशी काहीच कर्तव्य नाही अशा स्थितप्रज्ञाच्या भावनेने गिऱ्हाइकाने सांगितल्याप्रमाणे नोंद करून पावती गिऱ्हाइकाच्या हातात ठेवतो. ही पावती म्हणजे बेअरर चेक. समजा, तुमचा आकडा आलाच, तर ही पावती दिल्यावरच पैसे देण्यात येतात. इतक्या राजरोसपणे हा व्यवहार चालतो, की कायद्याने बंदी आहे असे सांगूनही खरे वाटणार नाही. परंतु कायद्याच्या बंदीची थोडीफार वदंता असल्याने आकडे-बाजारात नव्यानेच येणारा माणूस अचूक हुडकता येतो. सुरुवातीला विचकत येणारा माणूस एखाद्या आठवड्यात इतका सराईत बनतो की, केवळ एका आठवड्याच्या पूर्वपुण्याईवर खेळणारा हा माणूस आहे हे ओळखणेही मुष्कील व्हावे. नवीन मंडळींची इतक्या वेगाने भर पडत आहे की, मध्यम दर्जाच्या बुकीकडे पावत्या फाडण्यासाठी ७–७ कारकून ठेवूनही गर्दी हटत नाही. पुण्यातील कामगारांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये मटकादेवीचे इतके स्तोम माजले आहे, की पुण्यात आकडे खेळणाऱ्या मंडळींपैकी सुमारे ६० टक्के लोक या दोन वर्गातले असतात. २० टक्के व्यापारी व इतर २० टक्के अशी स्थूलमानाने विभागणी होते.

खुल्या बाजाराचा आकडा ऐकला की आकडा बसलेली काही मंडळी पैसे घेण्यासाठी बुकीच्या दुकानापुढे जमा होतात.

पैसे वाटपाचे काम चालू असताना एका बुकीच्या आवारामध्ये एका कोपऱ्यावर उभा होतो. जी थोडीफार मंडळी पैसे घेत होती, त्यांपैकी एखादाच पैसे घेऊन बाहेर पडत असे. बहुतेक जण मिळालेले पैसे घेऊन पुन्हा बंद बाजारावर लावण्यासाठी रांगेत उभी असलेली दिसली.

मटक्यामध्ये अनंत दोष असले तरी अजून पैसे बुडवणारा बुकी माझ्या पाहण्यात नाही. एका बुकीला पैसे देता आले नाहीत तर त्याने झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्या केल्याचे एक उदाहरण ऐकिवात आहे इतकेच. अन्यथा, बँकेत चेक वटवायला जितका वेळ लागतो त्याहीपेक्षा कमी वेळात रक्कम गिऱ्हाइकाच्या हातात टाकण्यात येते. अट फक्त एकच–की आकडा बसलेली चिठ्ठी त्याने सादर करायची.

मटक्याचा चौफेर प्रसार करण्याचे पवित्र कार्य 'जनसेवेला वाहिलेली' असंख्य वृत्तपत्रे नित्यनेमाने करत असतात. कालचा बाजारभाव पहिल्या पानावर टाकायचा आणि पहाटेची तार आतल्या पानावर. वृत्तपत्र प्रतिष्ठित म्हणून विकत घ्यावे तर हा प्रकार. पण एवढ्याने भागत नाही असे वाटल्यावरून रविवारची खास 'धारणा'

सुरू झाली. विशिष्ट विचारसरणी असलेल्या मध्यम वर्गियांच्या घरात येणाऱ्या वृत्तपत्रांची ही कथा. प्रसिद्धीपासून वृत्तपत्राचा फायदा काय, तर म्हणे १।।–२ हजारांनी सेल बुस्ट झाला !

याच वृत्तपत्राच्या ग्राहकाच्या माध्यमिक शाळेत जाणाऱ्या एका चिरंजीवांनी प्रश्न केला, "बाबा, ही 'धारणा' म्हणजे काय हो ?"

"राजू, फालतू प्रश्न विचारू नकोस. ते ज्योतिषातलं असतं काही तरी." वेळ मारून नेण्यासाठी पिताजींनी उत्तर दिलं.

चिरंजीव गप्प बसले पण शाळेत सहज गप्पांच्या ओघात एका स्नेह्याकडून 'धारणे'चा अचूक अर्थ समजावून सांगण्यात आला. राजूला आईने खाऊसाठी दिलेले पैसे स्वारीने शाळेतल्या मित्राजवळ हा गंमतीचा खेळ खेळण्यासाठी दिले. दुसऱ्या दिवशी जास्त पैसे घेण्याच्या आशेने मित्राकडे गेलेला राजू हिरमुसले तोंड करून परतला खरा, पण ती छोटी पावती फाडून टाकण्याचे मात्र विसरला. गणिताच्या पुस्तकात तशीच राहिलेली ती पावती अवघड गणित चिरंजीवांना समजावून देण्याच्या प्रयत्नांत असलेल्या पिताजींच्या हाती लागली. पिताजी 'ह्यातले' नसले तरी ह्याची माहिती असलेले होते. सावधगिरी म्हणून ते मुलाला काही बोलले नाहीत, पण त्याच्यावर बारीक पाळत ठेवली. आणि त्यांच्या लक्षात आले, खेळाच्या आणि चित्रपटाच्या बातम्या वाचणारे आपले चिरंजीव रविवारचा अंक आला म्हणजे मात्र 'धारणे'वर लक्ष केंद्रित करतात. पिताजी सुशिक्षित असल्याने मुलाला विश्वासात घेऊन त्यांनी दुखणे वाढण्यापूर्वीच ते कलम करून टाकले.

बुकीच्या दुकानांवर येणाऱ्या गिऱ्हाइकांत अनेक लहान मुले दिसतात. ही मुले इथे का येतात, त्यांना या प्रकारांची माहिती कशी होते, याचे मोठे गूढ वाटल्याने एका अशाच चिरंजीवांना मी एका बाजूला काढले. दोन-चार फालतू गोष्टी बोलून झाल्यावर सहज विचारल्यासारखे विचारले, "चल, येतोस जरा चहा घेऊ." तो वेळपर्यन्त सरळ बोलणारा मुलगा एकदम बिथरला. त्याला काही संशय आलासे वाटून मी नूर बदलला. चटकन् म्हणालो, "चल दोन 'फिट टिप' सांगतो तुला." मी असे म्हणालो मात्र, त्याला काय वाटले देव जाणे ! चटकन माझ्याबरोबर आला. चहाचा ओलावा मिळाल्यावर जास्त जवळीक निर्माण झाली आणि मग हळूच मुलाला बोलता केला. मिळालेली माहिती मोठी मनोरंजक आहे.

मुलाचे काका बुकी आहेत. वडील सरळ नोकरी करीत होते. पण भावाच्या नादाने तेही मार्गस्थ झाले. त्यामुळे घरात सारखी हीच चर्चा. प्रथम मुलापासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु ते जमत नाहीसे पाहिल्यावर सर्व बोलणी मुलाच्या तोंडावर होऊ लागली. एकंदर प्रकार लक्षात आल्यावर आपणही हा 'पराक्रम' करावा अशी स्वाभाविक इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. आणि त्याने दिलेल्या माहितीप्रमाणे गेल्या महिन्यापासून त्याने हा खेळ खेळण्यास सुरु-

बात केली. "या खळात मिळवलेस काय रे?" असं मी विचारलं तर त्यानं सांगितलं, "फारसं मिळालं नाही, पण हरलोही नाही."

"तू तर म्हणतोस तू रोज खेळतोस, मग पैसे कुठून आणतोस?" उत्तर: "आणतो असेच."

इतकी माहिती दिल्यामुळे निर्माण झालेल्या सलगीमुळे मी विचारले, "अभ्यास करतोस का?" तर उत्तर दिले, "अजून तरी करतो. गेल्या वर्षीच्या परीक्षेत ५५ टक्के मार्क मिळाले. **पण आता मात्र अभ्यासात लक्ष लागत नाही. डोक्यात सारखा एकच विचार असतो. मटका–आकडा, आकडा–मटका.**"

## एक नाटक

खेळणारांपैकी पुष्कळांचं ऐकलं; पाहिलं, म्हटलं, आता खेळवणारांकडे वळावे. पण खेळवणारी ही मंडळी महा बिलंदर. पैसे खेळण्याचा प्रयत्न केला तर चटकन पावती काढतील. पण महिनाभर पावती फाडली. आणि मटक्याच्या अंतरंगाची माहिती विचारली की तोंडाला एकदम कुलूप लावतील. दोन–चार ठिकाणी प्रयत्न करूनही अपेक्षित माहिती मिळेना, तेव्हा एका बुकीकडे पावत्या फाडण्याचे काम करणाऱ्या एका कारकुनाला धरला. आपण सराईत आकडेबहाद्दर असल्याचा आव आणून त्याच्याशी गप्पा मारू लागलो. तेव्हा हळू हळू माहिती मिळू लागली.

घरातील मंडळींनी शिक्षणाकडे दुर्लक्ष केले, अभ्यासात लक्षही बेताचेच. त्यामुळे शिक्षण अपूर्ण राहिलेला हा माणूस. तसा महत्त्वाकांक्षी दिसला. आज बुकीकडे पावत्या फाडत असला तरी लवकरच वेगळी जागा घेऊन स्वतंत्र धंदा करण्याचा त्याचा विचार आहे. गेली चार वर्षे तो आपल्या मालकाकडे काम करतो आहे. आकडे खेळायला आलेल्या मंडळींचे आकडे घेणे, त्यांना त्याप्रमाणे पावत्या देऊन, रात्री व्यवहार संपल्यावर मालकाच्या ताब्यात गल्ला सुपूर्द करणे एवढेच त्याचे काम. त्याबद्दल मासिक मोबदला मिळतो १०० रुपये. त्या खेरीज रोजचा खर्च–भत्ता म्हणून दोन रुपयांची उचल मिळते ती वेगळीच! बरं, नोकरी बेकायदेशीर म्हणून भिण्याचे कारण नाही. कारण नियमित दिल्या जाणाऱ्या हप्त्यांमुळे धंद्याला कायदेशीर स्वरूप प्राप्त झालेले असतेच. बरं, सगळं अगदीच डोळ्यांवर येऊ नये म्हणून एखाद्या वेळी पूर्वसूचना देऊन छापा घालण्याचे नाटक केले जाते. छापा येण्यापूर्वी प्रतिष्ठित अशा मोठ्या गिऱ्हाइकांना धोक्याच्या कक्षेबाहेर नेण्याची व्यवस्था केली जाते. मग पावत्या फाडणाऱ्या नोकरवर्गापैकी काहीजण गिऱ्हाइके बनतात. त्यांच्या जोडीला असल्या प्रकारांची पर्वा नसलेली काही खरी गिऱ्हाइकेही असतात. जमा झालेला गल्ला सुरक्षित ठिकाणी हलवण्यात येतो. थोडीफार चिल्लर, दोन–चार पावती-बुके व हुकमी मंडळी जागेवर शिल्लक राहिली की, त्याप्रमाणे संदेश पोचवला जातो. 'भोऽऽ' आवाज करत मोटार येते. चार–सहा जण सरासरा आत जातात. माराच्या तयारीने बसलेल्या मंडळींना चोप देतात. पावती पुस्तके व चिल्लर

घेऊन परत जातात. पुन्हा दुसऱ्या दिवशीपासून व्यवहार सुरळीत सुरू होतात. कारण आता चार–सहा महिने तरी भीती बाळगण्याचे कारण नसते. या छाप्याच्या नाटकाच्या वेळी जर कोणी पकडले गेले आणि चार–सहा महिन्यांसाठी ' बंदिस्त निवासस्थानात ' त्याची रवानगी झाली तरी कामगार पावतीवाल्याचा पगार घर-पोच केला जातो.

सर्व पावतीवाल्या कारकुनांना या सवलती मिळतात असे नाही. जसा मालक तशी पावतीवाल्याची व्यवस्था, असा हा व्यवहार असतो.

मुंबई-पुण्याची अनेक वृत्तपत्रे मटक्याला भरपूर प्रसिद्धी देतात. या प्रसिद्धीसाठी संयोजकांकडून तर कमिशन मिळतेच, पण त्याखेरीज वाचकवर्गातही वाढ होते. खुलत्या व बंद बाजाराचे भाव वृत्तपत्रांना अचूक पद्धतीने पोचवण्याची व्यवस्था केलेली आहे. भरपूर खेळ केलेल्या एखाद्या ग्राहकाला सकाळपर्यंत दम निघत नसेल तर रात्री सिनेमा सुटल्यावर त्याने आपल्या बुकीकडे चौकशी केली तरी रात्री १२ लाच त्याला जोडराशीचे आकडे समजू शकतात. पुण्यापुरते बोलायचे झाले तर, भरपूर खेळणारी अनेक मंडळी–त्यातही त्यांचा खुलत्या बाजाराचा (ओपनचा) आकडा बसला आहे अशी अनेक मंडळी–मोठ्या आशेने सिटीपोस्ट चौकात जमा होतात. आणि ११॥ च्या सुमारास बंद भाव (क्लोज) ऐकला की हर्षोत्फुल्लित होत अथवा केविलवाणे चेहरे करून घरचा रस्ता सुधारतात. काही सराईत मंडळींना तर या आकड्याने इतके वेडे केले आहे, की स्वतःचा खेळ असो वा नसो. रात्रीचा क्लोज ऐकल्याशिवाय या मंडळींना झोप येणार नाही. अर्थात, या गटातील बहुसंख्य लोक उपजीविकेचे साधन म्हणूनच या जुगारात गुंतलेले असतात. स्वाभाविकपणे आकडा कोणताही येवो, त्या विशिष्ट आकड्यावर त्यांचा खेळ असो वा नसो, अमूकच आकडा कसा आला याचे बिनतोड उत्तर यांच्याजवळ सदोदित तयार असते. विशिष्ट लाईनमुळे अमूकच आकडा येणार आहे हे जर तुला आधीच माहीत होते तर बाबा, तू स्वतःच का या आकड्यावर खेळला नाहीस, असे त्यापैकी कोणाला विचारले, की दोन-चार सुस्कारे टाकून तो तुमच्यापुढे दोन-चार तांबडी-हिरवी पुस्तके टाकेल आणि सांगेल, माझा खेळ मी अमक्या लाईनने केला. त्या लाईनप्रमाणे मेंढी-वर लंगडा म्हणजे ० ७ असा डाव व्हायला पाहिजे होता. पण साल्यानं आज काल-चीच लाईन काढून गंडवलं. पण मी असा फसणाऱ्यातला नाही. नवीन आठवड्याचा महाभारत, रिटेक, भोलाराम, जोकर, (ही सर्व ' मटक्या 'वरील खास मार्गदर्शक पत्रके) आणतो. आणि अशी लाइन काढतो, की रातोरात लखपती.

रात्रीत लखपती होण्याची स्वप्ने पाहणारी ही मंडळी दोन वर्षांनी भेटली तरी याच स्वप्नसृष्टीत वावरताना आढळतात. फरक इतकाच, की त्यांच्या संख्येत वाढ झालेली आढळते.

## सोनेरी टोळीची उलाढाल

या जुगारीच्या आर्थिक अंगाची कल्पना येण्याच्या दृष्टीने विश्वासात घेतलेल्या आमच्या पावतीवाल्याने सांगितलेली हकीकत खरी वाटली नाही, म्हणून मुद्दाम एका 'ए' क्लास बुकीकडे गेलो आणि जमलेला नोटांचा ढीग पाहून थक्क झालो. माहिती विचारण्याच्या माझ्या हेतूची कल्पना नसल्याने व माझ्याबरोबर याच व्यवसायातील 'पावतीवाला' असल्याने त्याने सहज बोलता बोलता म्हणून थोडी-फार माहिती सांगितली.

मुंबई, अहमदाबाद व पुणे ही या जुगारीची मोठी केंद्रे. महाराष्ट्राच्या अन्य भागांतही हा जुगार मोठ्या प्रमाणावर चालतो. परंतु शहरात चालणाऱ्या या व्यवसायाच्या मानाने अन्य भागांतील धंदा बेताचा असतो इतकेच.

मुंबईमध्ये मटक्यावर बेटिंग घेणारे सुमारे १५० मोठे बुकी आहेत. जवळ जवळ ५०० ते ६०० मध्यम श्रेणीचे व सुमारे हजार तृतीय श्रेणीचे बुकी आहेत. यांखेरीज साहेब लोकांच्या घरांतून फिरून रक्कम घेणारी मंडळी निराळी. मटक्याबाबत प्रसिद्ध होणारी सुमारे ५० प्रसिद्धीपत्रके आहेत. यांतील प्रत्येक पत्रकावर संचाल-कांचे नियंत्रण आहे. त्यात 'हमखास' म्हणून येणारे आकडे त्यांच्या संमतीनेच येत असतात. साधारणपणे १ ते १२ तारखेपर्यंत खेळाचा वेग प्रचंड असल्याने या दिवसांत फेवरिट फिगर कधीच काढला जात नाही. परंतु २५ ते ३० च्या दरम्यान एखादेवेळी एखादी फिट फिगर काढून सतत मार खाणाऱ्या खेळाडूंना पुढे खेळण्यास उत्साह राहावा म्हणून संजीवनी पुरवली जाते.

नुसत्या पुण्यातून या आकड्यांवर दरमहा २-२॥ लाख रुपयांपर्यंत बेटिंग सहज-पणे होते. दहा आकड्यांवर पैसे येतात व दोनच आकड्यांवर पैसे द्यावे लागतात. त्यातही काढायच्या आकड्यावर संयोजकांचे संपूर्ण नियंत्रण. त्यामुळे मटका चालव-णारी ही सोनेरी टोळी आजवर लाखो रुपये कमवून बसली आहे.

मटक्याचे हे वाढते वेड व त्यामुळे होणारे सामाजिक अधःपतन यामुळे मुंबई-मध्ये सध्या थोडीफार अस्वस्थता माजली आहे. मटका बंद करण्याची जोरदार मागणीही काही संघटनांकडून होऊ लागली आहे. परंतु लोखंडी कवचाने सुरक्षित असलेला हा 'मटका' कृष्णाच्या गोकुळकाल्याचा मटका फोडावा इतक्या सहजतेने फुटणार नाही. या मटक्यावर घडक देणाराची ताकदही तशीच जबरदस्त हवी ! तशी ताकद संघटित झाली तरच समाजाला लागलेली ही विषवल्ली मुळापासून नाहीतरी निदान थोडीफार निघण्याची शक्यता आहे.

१४



# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

दुमाचे विसर्जन झाल्यानंतर लेनिन, लिओनिड् क्रासिन, बोगॅडॅनोव्ह प्रभृति बोल्शेव्हिक कार्यकर्ते पुन्हा सशस्त्र उठावाची तयारी करू लागले. क्रासिन याने गेली काही वर्षे बाकू येथे गुप्त छापखाना चालविला होता. या छापखान्यामुळे समाजातील प्रतिष्ठितांकडे त्याचे जाणेयेणे असे. शिवाय तो मॅक्झिम गॉर्कीचा स्नेही होता. गॉर्कीमुळेच मॉस्कोमधील साव्हा मोरोझोव्ह या धनाढ्य गिरणी मालकाशी क्रासिनचा परिचय झाला होता. बोल्शेव्हिक सेंटरला वेळोवेळी लागणारे पैसे क्रासिन मोरोझोव्हसारख्या श्रीमंत मित्रांकडून गोळा करीत असे. एकदा अशीच पैशाची गरज निर्माण झाली असताना क्रासिन मोरोझोव्हकडे गेला. लेनिनच्या कार्याबद्दल मोरोझोव्हला प्रारंभापासूनच आदर होता. त्यामुळे त्याने क्रासिनला विचारले, "लेनिनला किती पैसे हवे आहेत ?"

"तुला जितके देणे शक्य होईल तितके."

"माझे वार्षिक उत्पन्न साठ हजार रुबल्स आहे. त्यातले बरेच पैसे मी शिष्यवृत्त्यांसाठी खर्च करीत असतो हे तुला माहीत आहे. तरीदेखील लेनिनला मी दरमहा एक हजार रुबल्स देत जाईन."

# कॉकेशसचा तरुण व तडफदार कार्यकर्ता....

१९०५ मध्ये मोरोझोव्हने आत्महत्या केली. तत्पूर्वी त्याने संपत्तीचा बराच मोठा हिस्सा बोल्शेव्हिक पक्षाच्या कार्यासाठी गॉर्कीच्या हाती सुपूर्द केला होता. १९०६ मध्ये गॉर्कीने अमेरिकेचा दौरा करून पक्षकार्यासाठी आणखी बराच पैसा जमा केला. गॉर्कीने लिहिले आहे–' १९०१ पासून १९१७ पर्यंतच्या काळात सोशल डेमोक्रॅटिक पक्षाला जो अमाप पैसा मिळाला त्यात व्यक्तिशः माझा वाटा मोठा असला तरी मी हे पैसे उद्योगपतींकडूनच गोळा केलेले होते. मोरोझोव्हसारख्या उद्योगपतींच्या आर्थिक पाठबळावरच आम्ही ' इस्क्रा 'चा संसार चालविलेला होता. मोरोझोव्हसारखी आणखी दहा-बारा श्रीमंत माणसे हाताशी लागली म्हणूनच आमच्या पत्राला पैशाची कधीच ददात पडली नाही. मी हे पैसे कोठून आणीत आहे हे लेनिनला माहीत होते.'

मोरोझोव्हने घाडलेल्या पैशाच्या जोरावरच क्रासिन याने दारूगोळ्याचा गुप्त कारखाना सुरू केला. त्याने लिटव्हिनॉव्हच्या मदतीने परदेशांतून बंदुकांची मोठ्या प्रमाणावर आयात चालू ठेवली होती.

ड्यूमाची दुसरी निवडणूक जवळ आली होती. या निवडणुकीत ' ब्लॅक हंड्रेड्स ' या झारच्या हस्तक पक्षाचा पराभव व्हावा, यासाठी सर्व डाव्या पक्षांनी निवडणूक–करार करून आपापसांतील संघर्ष टाळावा, असे मेन्शेव्हिकांनी सुचविले. सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्ष, कॉन्स्टिटयुशनल डेमोक्रॅटिक पक्ष आणि ट्रुडोव्हिकी या तीन पक्षांना मेन्शेव्हिकांची सूचना पसंत पडली. या निवडणूक–कराराबाबत सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची अधिकृत भूमिका निश्चित करणे अवघड होते. कारण मेन्शेव्हिक आणि बोल्शेव्हिक या दोन्ही गटांनी परस्पर विचारविनिमय करून पक्षाचे धोरण निश्चित करावे, असे स्टॉकहोम–परिषदेत ठरले होते. त्यामुळे निवडणूक कराराच्या मेन्शेव्हिकांच्या सूचनेचा विचार करण्यासाठी १९०७ च्या जानेवारीत पीटर्सबर्ग येथे पक्षातील दोन्ही गटांची संयुक्त बैठक बोलावण्यात आली. या बैठकीला बोल्शेव्हिक गटाचे बेचाळीस व मेन्शेव्हिक गटाचे एकतीस प्रतिनिधी हजर होते.

मेन्शेव्हिकांशी कोणत्याही प्रकारचे सहकार्य करावयाचे नाही, हे लेनिनच्या धोरणाचे सूत्र ठरून गेले होते. त्यामुळे या बैठकीतही इतर पक्षांबरोबर निवडणूक करार करण्याबाबतच्या सूचनेला विरोध करण्याच्या निमित्ताने लेनिनने मेन्शेव्हिकांवर तोंडसुख घेतले. लेनिनचा हा हल्ला इतका कडवट होता की मेन्शेव्हिकांनी या

बैठकीतून सभात्याग केला. मेन्शेव्हिक निघून गेल्यानंतर लेनिनचे काम सोपे झाले. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाने कोणत्याही पक्षाबरोबर निवडणूक–करार करू नये हे आपले मत त्याने पुन्हा आग्रहाने मांडले. परंतु त्याची ही एकांतिक भूमिका केरिन्स्की प्रभृति बोल्शेव्हिकांनाही पसंत पडली नाही.

आपल्या निकटवर्ती सहकाऱ्यांनादेखील आपला हा हट्ट मंजूर नाही असे दिसून येताच त्यांना खूष करण्यासाठी लेनिन आपल्या पुढील भाषणात इतर पक्षांशी मर्यादित प्रमाणावर सहकार्य करण्याची भाषा बोलू लागला. त्याच्या हा आकस्मिक मतपरिवर्तनावद्दल साऱ्या प्रतिनिधींना आश्चर्याचा धक्काच बसला. वस्तुत:, या बैठकीमध्ये लेनिनेच आपल्या मूळच्या भूमिकेला सोयीस्कर रीतीने बगल दिली होती. परंतु या बैठकीनंतर त्याने ' एकतीस मेन्शेव्हिकांची भोंदुगिरी ' या नावाची पुस्तिका लिहून मेन्शेव्हिकांवरच पक्षाशी प्रतारणा केल्याचा आरोप केला. ' मेन्शेव्हिकांनी आपली बुद्धी ' बुर्झ्वा ' समाजाला विकली आहे ' या आपल्या लाडक्या आरोपाचा लेनिनने या पुस्तिकेत पुनरुच्चार केला.

लेनिन अकारण आपली बदनामी करीत आहे, यामुळे चिडलेल्या मेन्शेव्हिकांनी पक्षाच्या चौकशी मंडळामार्फत लेनिनच्या वर्तनाची चौकशी व्हावी, अशी मागणी केली. १९०७ च्या फेब्रुवारीमध्ये रॅफेल ॲब्रामोव्हिच याच्या अध्यक्षतेखाली चौकशी मंडळ नेमण्यात आले. या मंडळापुढे जवाब देताना आपण मेन्शेव्हिकांची हेतुपुरस्पर बदनामी केल्याची लेनिनने कबुली दिली. परंतु त्याबरोबरच आपले हे कृत्य कसे बरोबर आहे हेही तो चौकशी मंडळाला समजावून देऊ लागला. तो म्हणाला, " मी मुद्दामच मेन्शेव्हिकांविरुद्ध कडक भाषा वापरली. कारण त्यांनी आपली चूक दुरुस्त करावी ही मुळी माझी इच्छाच नव्हती. मी त्यांना माझे राजकीय प्रतिस्पर्धी मानतो व असले प्रतिस्पर्धी नष्ट झाले पाहिजेत असा माझा प्रयत्न असतो. मेन्शेव्हिकांवर हल्ला चढविल्यामुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये आणि कामगारांमध्ये वैचारिक गोंधळ निर्माण होतो याची मला जाणीव आहे. परंतु राजकीय प्रतिस्पर्धी नष्ट करण्यासाठी हा गोंधळच उपयोगी पडतो. मेन्शेव्हिक गट नष्ट होण्यासाठी जी कोणती कृती आवश्यक ठरणार असेल, ती करावयास मी कधीच अनमान करणार नाही. कारण आपले खरेखुरे शत्रू कोण आहेत हे मला पक्के माहीत आहे. "

लेनिनचा हा जबाब तो सत्तारूढ झाल्यानंतर प्रसिद्ध करण्यात आला.

लेनिन मेन्शेव्हिकांना जगातून नष्ट करण्याची भाषा बोलत असतानाच ड्युमाच्या निवडणुकी झाल्या. या निवडणुकीत सोशल डेमोक्रॅटिक पक्ष आणि सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्ष यांना प्रत्येकी साठ जागा मिळाल्या. सोशल डेमोक्रॅटिक पक्षातर्फे निवडून आलेल्या साठ सदस्यांमध्ये मेन्शेव्हिकांची संख्या अधिक होती. या निवडणुकीत ब्लॅक हंड्रेड्स या प्रतिगामी पक्षालाही काही जागा मिळाल्या. पहिल्या निवडणुकीत हा पक्ष एकही जागा मिळवू शकला नव्हता. परंतु समाजवादी आणि

उदारमतवादी सदस्यांच्या तुलनेने ब्लॅक हंड्रेड्सचे सामर्थ्य अगदीच निकृष्ट प्रतीचे असल्यामुळे पहिल्या ड्युमासारखी ही ड्युमाही विसर्जित केली पाहिजे, हा विचार झारच्या मनात घोळू लागला. त्यासाठी प्रधानमंत्री स्टोलिपिन अनुकूल संधीची वाट पाहू लागला. बोल्शेव्हिक गट ही संधी लवकरच आणून देणार होता.

ड्युमाच्या सदस्यांना पोलिसांच्या अटकेपासून संरक्षण मिळण्याचे जे खास अधिकार असतात त्यांचा फायदा घेऊन सशस्त्र उठावाची तयारी सुरू केली पाहिजे, असे लेनिन आग्रहाने सांगू लागला. तो म्हणत होता, " क्रांतीची तयारी करता येत नसेल तर ड्युमातील खुर्च्या अडवण्याला काहीच अर्थ उरत नाही .कारण लोकांना आता भाषणबाजीचा कंटाळा आला आहे. त्याना हवी आहे कृती—अगदी रोखठोक कृती."

१९०७ च्या एप्रिलमध्ये लंडन येथे सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची पुन्हा परिषद भरली. या वेळी पक्षाच्या मध्यवर्ती समितीवर बोल्शेव्हिक गटाचे नियंत्रण प्रस्थापित करण्यात लेनिन यशस्वी झाला. महिनाभर चाललेल्या या परिषदेला बोल्शेव्हिक, मेन्शेव्हिक आणि ज्युईश सोशॅलिस्ट बंड या तीनही गटांचे प्रतिनिधी हजर होते. लेनिन, प्लेखानोव्ह अॅक्सेलरॉड, मार्तोव्ह, पोट्रेसॉव्ह, ट्रॉटस्की, बोगॅडॅनोव्ह, क्रासिन, रोझा लक्झेंबर्ग, मॅक्झिम गॉर्की हे जुने सहकारी बऱ्याच दिवसांनी पुन्हा एकत्र आले होते. त्याशिवाय नंतरच्या कालखंडात प्रसिद्धीस आलेले झिनोव्हेव्ह, कामेनेव्ह, टॉमस्की, यारोस्लाव्हस्की, व्होरोशिलोव्ह, डेव्हिड झास्लाव्हस्की आदी कार्यकर्त्यांनीही या परिषदेमध्ये आपली हजेरी लावली होती.

ही परिषद आटोपून सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते पीटर्सबर्गला परततात तेथील सैनिकांनी आपल्या मागण्यांचे निवेदन त्यांच्या हाती दिले. या मागण्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या ड्युमा सदस्यांनी सरकारपुढे मांडाव्यात, असा या सैनिकांचा आग्रह होता. झार राजवटीच्या ' ओखराना ' या गुप्त पोलिस संघटनेशी संबंधित असलेल्या मादाम शोर्निकोव्हा हिच्याच मार्गदर्शनाखाली हे निवेदन तयार करण्यात आले होते. हे निवेदन सैनिकांच्या हाती पडण्यापूर्वी शोर्निकोव्हाने ते स्टोलिपिनला वाचावयास दिले होते. सोशल डेमोक्रॅटिक पक्ष सैन्यात बेदिली माजविण्याचा कट करीत आहे, हा आरोप सिद्ध करता यावा, यासाठी हा निवेदनाचा बनाव घडवून आणण्यात आला होता. शोर्निकोव्हाने या निवेदनाच्या दोन प्रती तयार केल्या. एक प्रत तिने सैनिकांच्या स्वाधीन केली व दुसरी प्रत ' ओखराना 'कडे धाडून दिली.

सैनिकांच्या शिष्टमंडळाने आपल्याजवळच्या निवेदनाची प्रत सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रतिनिधींच्या हाती देताच पोलिसांनी पक्षकचेरीवर छापा घातला. परंतु तत्पूर्वी ते निवेदन एका ड्युमा सदस्याने आपल्या पिशवीत ठेवले होते. ड्युमा सदस्याजवळील कागदपत्रांची झडती घ्यावयास पोलिसांना कायद्यान्वये बंदी असल्या-मुळे पक्ष—सदस्यांना पुराव्यासहित पकडण्याचा पोलिसांचा बेत सिद्धीस जाऊ

शकला नाही. शवटी शोर्निकोव्हाने दिलेल्या प्रतीच्या आधारावरच पोलिसांनी सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या ड्युमा-सदस्यांवर देशद्रोहाचा आरोप ठेवला. चौकशीचे नाटक होऊन त्या सर्वांना सैबेरियात हद्दपार करण्यात आले. ड्युमाचे विसर्जन करण्यासाठी उत्सुक असलेल्या स्टोलिपिनला चांगलेच कारण सापडले. ड्युमा–सदस्य देशद्रोही आहेत, असा पुकारा करून त्याने १६ जून १९०७ रोजी ड्युमाचे विसर्जन केले.

आपल्या सहकाऱ्यांवर देशद्रोहाचा आरोप ठेवण्यात आल्यामुळे लेनिनला पीटर्स-बर्गमध्ये राहणे धोक्याचे वाटू लागले. म्हणून ड्युमा विसर्जित होताच तो फिन-लंडला निघून गेला.

१० जुलै १९०७ रोजी आईला पाठवलेल्या पत्रात लेनिन लिहितो— ' आई, मी आता खूप थकलो आहे. विश्रांती घेण्यासाठी मी येथे आलेलो आहे. पोहावे, फिरायला जावे, स्वतःशीच विचार करीत बसावे, असा सध्या मोठा गंमतीचा दिन-क्रम आहे. येथे आणखी दोन आठवडे राहून मी पीटर्सबर्गला परत येईन. '

फिनलंडमधील वास्तव्यातच लेनिनला डोकेदुखी आणि निद्रानाश या दोन विकारांनी घेरले आणि आयुष्यभर त्यांनी लेनिनचा पिच्छा सोडला नाही. सकाळची न्याहारी आटोपली की लेनिन पाच-सहा तास लेखन करीत असे. त्यानंतर मात्र डोकेदुखीमुळे काहीही काम करणे त्याला शक्य होत नसे. तसेच रात्रीच्या वेळी तो दूरवर फिरायला जाई. या फिरण्यामुळे शरीराला थकवा आला की मग तरी झोप येईल म्हणून त्याने ही सवय लावून घेतली होती. परंतु तरीही झोपेशिवायच बऱ्याच रात्री काढाव्या लागत. या निद्रानाशामुळे सकाळी उठल्यानंतरही तो निरुत्साही व थकलेला दिसे. रात्री फिरावयास जाण्याचा कंटाळा आला तर तो क्रासिन, बोगॅडॅनोव्ह किंवा अॅलेक्सीनस्की या मित्रांना गप्पा मारण्यासाठी बोलावत असे.

फिनलंडहून पीटर्सबर्गला येण्याचा विचार त्याला बदलावा लागला. कारण ' तू पीटर्सबर्गला पोचताच तुला पकडण्यात येणार आहे ' असे त्याला आपल्या मित्रांकडून कळले होते. म्हणून लेनिनने पीटर्सबर्गला परतण्याऐवजी स्टॉकहोमला जाण्याचे ठरविले. स्टॉकहोमला जाण्यासाठी आबो बंदरात येणे आवश्यक होते. आपण आबो येथे येणार आहोत हे जर पोलिसांना कळले तर ते आपल्याला तेथेच अटक करतील याची कल्पना असल्यामुळे लेनिन रात्रीच्या वेळी लपत–छपत आबोकडे येण्यास निघाला. पलीकडचा तीर गाठण्यासाठी त्याने गोठलेल्या नदीच्या पृष्ठभागा-वर पाय ठेवताच खालचा हिमखंड खचू लागला. लेनिनने कशीबशी नदी पार केली. तो पलीकडच्या तीरावर येऊन पोचतो न पोचतो तोच मघाचा हिमखंड कोठल्या तरी खडकावर आदळल्याचा आवाज झाला. लेनिन स्वतःशीच पुटपुटला, ' छे, मरणाचा हा असला प्रकार आपल्याला मंजूर नाही बुवा. '

लेनिन स्टॉकहोमला पोचला तेव्हा तो उदास होता. रशियात लवकर क्रांती होईल ही त्याची आशा आता मावळत चालली होती. कसेही करून बोल्शेव्हिक पक्ष जिवंत ठेवायला हवा, या विवंचनेने त्याला ग्रासले होते. पक्ष जिवंत ठेवायचा असेल तर त्यासाठी पैसा उभारण्याची व्यवस्था करणे भाग होते. म्हणून 'सरकारी तिजोऱ्यांवरील हल्ले चालूच ठेवा,' असा त्याने मॉस्को–पीटर्सबर्ग आदी शहरांतील आपल्या क्रांति-पथकांना आदेश धाडला. बोयेव्हिकी या नावाने ओळखली जाणारी बोल्शेव्हिक पक्षाची सशस्त्र क्रांति–पथके लूटमारीच्या तंत्रात निष्णात होती, लेनिनच्या अपेक्षेपेक्षा किती तरी अधिक पैसा या पथकांनी लूटमार करून जमविला.

एकदा या क्रांतिसैनिकांना अशी बातमी समजली की टिफलीस येथील टपाल-कचेरीत स्थानिक सरकारी बँकेत भरणा करण्यासाठी अडीच लाख रूबल्सच्या थैल्या घेऊन येणार आहेत. लागलीच टिफलीस येथील क्रांति–पथके या थैल्यांवर हल्ला चढवण्यासाठी सिद्ध झाली. या थैल्या लष्करी बंदोबस्तात टपाल कचेरीतून बँकेकडे नेण्यात येत असताना पहारेकऱ्यांवर बाँब फेकण्यात आले. त्याबरोबर रस्त्याच्या कडेला दबा धरून बसलेल्या बोयेव्हिकीच्या सदस्यांनी बंदुकीच्या फैरी झाडण्यास प्रारंभ केला. या चकमकीत अनेक जण ठार वा जखमी झाले. परंतु तत्पूर्वी अडीच लाख रुबल्सची रक्कम तेथून पसार करण्यात आली होती.

टिफलीस लुटालूट प्रकरणाचा शोध लावण्यासाठी सरकारी चौकशीची चक्रे वेगाने फिरू लागली. बर्लिन, पॅरिस, म्युनिक येथील बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांची धर-पकड करण्यात आली. परंतु त्या कार्यकर्त्यांना रशियाच्या स्वाधीन करण्यास फ्रेंच व जर्मन सरकारांनी नकार दिल्यामुळे कोणावर खटला भरणे जमू शकले नाही. टिफलीस येथील क्रांति–सैनिकांना क्रासिन यानेच बाँब पुरविले होते व कामो नावाच्या कॉकेशसमधील वळकट अंगाच्या कार्यकर्त्याने लुटालुटीचा धाडसी बनाव यशस्वी करून दाखविला होता असें सरकारी चौकशीत सिद्ध होऊनही ते दोघे सरकारच्या हाती लागू शकले नाहीत. कामो अचाट कामे करण्यासाठीच प्रसिद्ध होता. तो 'कॉमरेड कोबा'च्या मार्गदर्शनाखाली तयार झाला होता. जोसेफ जुगाशव्हिली हा त्या वेळी कॉमरेड कोबा या नावाने वावरत असे.

टिफलीस लुटालूट प्रकरण घडण्याच्या काही दिवस अगोदर काही बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनी बर्लिन येथे खोटचा नोटा तयार करण्याचा कारखाना सुरू केला होता. या कारखान्यामागेही क्रासिन हाच सूत्रधार होता. मूळ योजनेप्रमाणे हा कारखाना फिनलंडमध्ये सुरू होणार होता. परंतु रशियन टाकसाळीतील अधि-काऱ्यांनी या कामी मदत करण्याचे आश्वासन आयत्या वेळी मागे घेतल्यामुळे हा कारखाना फिनलंडमधून बर्लिनला हलवण्यात आला. हे स्थलांतर जर्मन सोशल डेमो-क्रॅटिक पक्षाच्या कार्यकर्त्यांपासून लपवून ठेवण्यात आले होते. त्यामुळे हा कारखाना

जेव्हा उजेडात आला तेव्हा बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनी आपली फसवणूक केल्याबद्दल बर्लिनमधील पक्ष कार्यकर्ते भडकले. बोल्शेव्हिक कार्यकर्ते आपल्याकडून काम करून घेतात. परंतु आपल्याला विश्वासात घेत नाहीत, अशी त्यांनी जाहीर तक्रार केली.

ही बातमी ॲक्सेलरॉडला कळली तेव्हा त्याने मार्तोव्हला पत्र लिहून असा सवाल केला की, बोल्शेव्हिक कार्यकर्ते जर सहकाऱ्यांशी अशा रीतीने वागत असतील तर आपल्याला त्यांच्याबरोबर काम करणे शक्य आहे का?

या प्रकाराने प्लेखानोव्हही चिडला. तो म्हणाला, "बोल्शेव्हिकांचे हे वर्तन इतके संतापजनक आहे की आपण त्यांच्यापासून दूर राहायला शिकले पाहिजे."

ॲक्सेलरॉड आणि प्लेखानोव्ह यांच्या संतप्त उद्गारांचा लेनिनवर मुळीच परिणाम झाला नाही. तो म्हणाला, "जेव्हा हे लोक मोठ्या अभिमानाने सांगतात, की आम्ही अशी लूटमार करीत नाही, असा विश्वासघात करीत नाही, तेव्हा आपण काय बोलतो हे त्यांना समजते तरी की नाही असा मला प्रश्न पडतो."

बनावट नोटांच्या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, अशी जेव्हा काही बोल्शेव्हिक कार्यकर्तेच मागणी करू लागले तेव्हा कोठे लेनिन हे सारे प्रकरण पक्षाच्या परराष्ट्रीय कचेरीकडे चौकशीसाठी सुपूर्द करण्यास तयार झाला. मात्र तत्पूर्वी या प्रकरणाचा सारा पुरावा नष्ट करून टाकण्याची त्याने खबरदारी घेतली होती. या बनावट नोटांसाठी जर्मन कारखानदारांकडे कागद मागण्यासाठी क्रासिनच गेला होता, असे या चौकशीत सिद्ध झाले. पक्षाच्या मध्यवर्ती समितीत बोल्शेव्हिकांचे बहुमत असल्यामुळे हे प्रकरण तेथेच मिटविण्यात आले.

क्रासिन-प्रकरण मिटते न मिटते तोच व्हिक्टर-प्रकरण गाजू लागले. व्हिक्टरचे खरे नाव होते तारातुआ. गेली तीस वर्षे तो बोल्शेव्हिक सेंटरचे कार्य करीत होता. त्याच्या पाताळयंत्री स्वभावामुळे लेनिनने त्याची सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा आर्थिक संचालक म्हणून नेमणूक केली. पक्षकार्यासाठी पैसा उभा करणे हे काम त्याच्यावर सोपविण्यात आले. अर्थात् सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या नावाखाली गोळा करण्यात येणारा पैसा बहुतांशी बोल्शेव्हिक सेंटरच्या तिजोरीत गेला पाहिजे, अशी लेनिनने त्याला सूचना देऊन ठेवली होती. मॉस्कोतील श्मिड्ट नावाच्या कारखानदाराला सोशल डेमोक्रॅटिक पक्षासंबंधी सहानभूती होती. म्हणून त्याने मृत्युपत्रात आपल्या संपत्तीपैकी अमूक एक रक्कम सोशल डेमोक्रॅटिक पक्षाला देण्यात यावी असे लिहून ठेवले होते. श्मिड्ट मरण पावल्यानंतर ही रक्कम पक्षाच्या तिजोरीत आणून भरण्याचे काम व्हिक्टरने करावयाचे होते. हे पैसे आणण्यासाठी व्हिक्टर मॉस्कोला गेला. श्मिड्टचे पैसे सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या मध्यवर्ती समितीकडे न जाता बोल्शेव्हिक सेंटरकडे कळविले पाहिजेत हे सूत्र ध्यानात ठेवूनच व्हिक्टरच्या हालचाली सुरू झाल्या. व्हिक्टरवर पाळत ठेवण्यासाठी लेनिनने अँड्रेकानिस नावाच्या दुसऱ्या

कार्यकर्त्याला मॉस्कोला धाडले. श्मिड्टला कॅथेरीन व एलिझाबेथ नावाच्या दोन बहिणी होत्या. श्मिड्टची सारीच संपत्ती आपल्या वाट्याला यावी म्हणून अँड्रेकानिस याने कॅथेरीनशी विवाह केला. आता या डावात आपण मागे राहून चालणार नाही, या विचाराने व्हिक्टरने प्रेमाची बतावणी करून एलिझाबेथचा हात आपल्या हातात घेतला. अशा रीतीने श्मिड्ट याच्या संपत्तीचे अँड्रेकानिस व व्हिक्टर हे दोघे कायदेशीर वारस झाल्यानंतर त्या दोघांनी श्मिड्टच्या मृत्युपत्रातील रक्कमही बोल्शेव्हिक सेंटरच्या हाती सोपविण्यास अळंटळं सुरू केली. शेवटी बरीच दमदाटी करण्यात आल्यानंतर त्या दोघांनी श्मिड्टच्या मालमत्तेपैकी काही भाग सेंटरला देऊन टाकला.

**व्हिक्टरने बोल्शेव्हिक सेंटरशी दगाबाजी केली असल्यामुळे त्याला पक्षातून काढून टाकण्यात यावे, अशी बोगॅडॅनोव्ह, लुनाखरस्की प्रभृतींनी लेनिनकडे मागणी केली. परंतु व्हिक्टरविरुद्ध कोणतीही उपाययोजना करण्यास लेनिनचा विरोध होता. व्हिक्टर हा लफंगा आहे असे कोणी तरी म्हणताच लेनिन उत्तरला, 'तो लफंगा आहे म्हणूनच तो आपल्याला उपयोगी पडू शकतो. कारण कोणतीही गोष्ट करायला तो मागेपुढे पाहणार नाही. मला सांगा, केवळ पैशासाठी प्रेमाचे नाटक करून एखाद्या स्त्रीशी लग्न करण्याचे धाष्टर्य तुम्ही दाखवाल काय? मला खात्री आहे, तुम्हांला ते मुळीच जमणार नाही. मीदेखील तसे करू शकणार नाही. पण व्हिक्टरने ते केले आणि म्हणूनच काही विशिष्ट पद्धतीच्या पक्ष-कार्यासाठी व्हिक्टरसारख्या व्यक्तीच उपयोगी ठरतात हे विसरू नका.'**

स्टॉकहोममध्ये काही दिवस राहिल्यानंतर लेनिन जिनीव्हाला परतला. एवढी धडपड करूनही क्रांतीच्या रोखाने पक्षाची पावले पडत नाहीत म्हणून तो उद्विग्न झाला होता. १४ जानेवारी १९०८ रोजी आपल्या बहिणीला धाडलेल्या पत्रात लेनिन लिहितो—'जिनीव्हाला राहण्याचाही मला कंटाळा आला आहे. परंतु तूर्त दुसरे काहीही करता येण्यासारखे नसल्यामुळे येथेच राहणे भाग आहे.' संध्याकाळच्या वेळी लेनिन आणि क्रपस्काया फिरावयाला गेले असताना लेनिन तिला निराशेने म्हणाला,-"आयुष्यात जिनीव्हा सोडता येईल असे काही मला वाटत नाही. माझा देह बहुवा येथेच पुरला जाईल."

लेनिनने जिनीव्हाला वास्तव्य करण्याचे मुख्य कारण असे होते की, त्या वेळी एलिझाबेथ के. तेथेच राहत होती. दुसरे काहीच काम नसल्यामुळे लेनिन तिला वारंवार भेटावयास जाई. त्याने तिला बुद्धिबळे शिकविण्याचाही प्रयत्न करून पाहिला. परंतु या खेळात एलिझाबेथ के. ची काहीच प्रगती होईना. लेनिन म्हणाला,

" मार्क्स समजणे, बुद्धिबळे खेळता येणे आणि रेल्वेचे वेळापत्रक वाचता येणे या तीन गोष्टींत पारंगत असलेली स्त्री मला अद्याप भेटलेली नाही."

एलिझाबेथ के. फ्रान्समध्ये राहावयास गेली म्हणून लेनिनने १९०९ च्या उन्हाळ्यात जिनीव्हा सोडून पॅरिसला बिऱ्हाड केले. एलिझाबेथ के. लेनिनला भेटण्यासाठी वारंवार पॅरिसला येत असे. पक्षकार्याच्या दृष्टीने पॅरिसमधले वास्तव्य निरुपयोगी होते. आपल्या आयुष्यातील 'भिकार कालखंड' असे लेनिनने या काळाचे वर्णन केले आहे.

१९१० च्या उन्हाळ्यात कोपेनहेगन येथे आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषद भरली. रशियन प्रतिनिधींना भेटता यावे म्हणून लेनिन या परिषदेसाठी कोपेनहेगेनला गेला. या परिषदेला जमलेले रशियन प्रतिनिधी लेनिनच्या एककल्ली स्वभावाविषयी तीव्र नापसंती व्यक्त करीत होते ते म्हणत होते, " हा एकटा माणूस रशियातील समाजवादी चळवळीचे अतोनात नुकसान करीत आहे. तो मेला तर बरे होईल."

हे शब्द ऐकून मादाम क्रिझानोव्हस्कायाला राग आला. तिने विचारले, " या एका माणसात सारा पक्ष नष्ट करण्याचे सामर्थ्य आहे असे तुम्हांला का वाटते ?"

" कारण हा चोवीस तास क्रांतीचाच विचार करीत असतो. हा एकच कार्यकर्ता असा आहे की, त्याला क्रांतीशिवाय दुसरे काही सुचतच नाही."

परंतु टीकाकारांच्या असल्या नापसंतीची दखल घेण्याचे लेनिनच्या स्वभावातच नव्हते.

कोपेनहेगनहून पॅरिसला परतल्यानंतर लेनिनने एलिझाबेथ के. ला मुद्दाम भेटीसाठी बोलावून घेतले तो म्हणाला, " माझे एक महत्त्वाचे काम आहे. पीटर्सबर्गमधल्या आमच्या पक्षाच्या कामगारांकडे त्यांच्या मुलांसाठी मला काही खेळणी धाडायची आहेत. पण मी जर ती सरळ कामगारांकडे रवाना केली तर सरकारला त्यांचा अकारण संशय येईल. म्हणून तू ही खेळणी पीटर्सबर्गमधल्या तुझ्या ओळखीच्या व्यक्तीकडे धाडून दे. म्हणजे आमचे कामगार तेथे येऊन ती खेळणी घेऊन जातील."

" ठीक आहे. पण ती खेळणी कुठे आहेत ?"

" मी स्वित्झर्लंडमध्ये असतानाच ती खरेदी केली होती. मी तुला पत्ता देतो. तेथून तू मागवून घे."

एलिझाबेथ के. ने स्वित्झर्लंडमधून खेळणी मागविली. परंतु ती पार्सले पाहताच तिला शंका आली व म्हणून तिने त्यातले एक पार्सल मुद्दाम उघडून पाहिले. या पार्सलमध्ये 'प्रोलेटरी' पत्रांचे अंक बांधण्यात आले होते. लेनिनने आपल्यास फसविले म्हणून एलिझाबेथला कमालीचा राग आला.

कडवट स्वरांत तिने लेनिनला विचारले, " बरे झाले, मी ती पार्सले पाहिली

म्हणून ! ती पार्सले मी तशीच पीटर्सबर्गला पाठवून दिली असती तर माझे परिचित नाहक सरकारी रोषाला बळी पडले असते."

"मग त्यामुळे विशेष काय घडणार होते ?" लेनिन शांतपणे बोलत होता. "नाही तरी माणसाने एकदा तुरुंगाचा अनुभव घेतलाच पाहिजे. क्रांतीकडे वळायला तुरुंगासारखी दुसरी जागा नाही."

"ते काहीही असले तरी तू मला हे पार्सलांचे रहस्य अगोदर सांगायला हवे होतेस."

"एलिझाबेथ, तूच मागे एकदा मला म्हणाली होतीस ना की मलाही पक्षकार्याची आवड आहे. म्हणून तर मी तुझ्याकडे ही कामगिरी सोपविली. तू इतकी भित्री असशील याची मला कल्पना नव्हती."

या माणसाशी अधिक बोलण्यात अर्थ नाही हे एलिझाबेथला कळून चुकले. लेनिन आणि एलिझाबेथ यांची १९१४ मध्ये गॅलिशियामध्ये शेवटची भेट झाली. परंतु ती भेट अगदीच जुजबी ठरली. कारण, त्या वेळी लेनिन दुसऱ्या एका स्त्रीच्या प्रेमात पडला होता. इनेसा आर्मंद हे लेनिनच्या दुसऱ्या प्रेयसीचे नाव होते. लेनिन १९१० मध्ये पॅरिसला राहत असतानाच त्याची आणि इनेसाची पहिली भेट झाली होती. इनेसा ही एका फ्रेंच कलावंताची मुलगी. तिच्या वयाच्या सहाव्या वर्षी वडिलांचे निधन झाल्यामुळे इनेसा आत्याकडे राहण्यासाठी मॉस्कोला गेली. तिची आत्या युजिन आर्मंद या गिरणी मालकाकडे नोकरीला होती. इनेसाचे रूपसौंदर्य अलौकिक असल्यामुळे युजिन आर्मंदच्या मुलाने—अॅलेक्झांडरने— तिच्याशी विवाह केला. या दांपत्याला पाच मुले झाली. परंतु कालांतराने अॅलेक्झांडर आणि इनेसा यांचे वारंवार खटके उडू लागले. शेवटी या प्रकरणाला कंटाळून इनेसाने घटस्फोट घेतला व ती स्टॉकहोमला राहावयास गेली. तेथे लेनिनचे 'व्हॉट इज टु बी डन' हे पुस्तक तिच्या वाचनात आले, तेव्हापासून ती बोल्शेव्हिक पक्षाचे काम करू लागली. १९०५ च्या जानेवारीत इनेसा पक्षकार्य करण्यास रशियात गेली असताना तिला अटक करण्यात आली. परंतु लगेच ऑक्टोबरमध्ये तिला सोडण्यात आले. १९०७ मध्ये तिला पुन्हा पकडण्यात आले. या वेळी तिला दोन वर्षांसाठी आर्चएंजल प्रांतात हद्दपार करण्यात आले. परंतु हद्दपारीची मुदत संपण्यापूर्वीच इनेसा तेथून पळाली व ब्रुसेल्समार्गे पॅरिसला येऊन पोचली. ज्या पुस्तकाच्या वाचनाने आपण राजकारणाकडे वळलो त्या पुस्तकाच्या लेखकाला—लेनिनला—भेटण्यासाठी ती उत्सुक होती.

प्रारंभीच्या औपचारिक परिचयानंतर इनेसा वारंवार लेनिनच्या घरी येऊ लागली. संध्याकाळच्या वेळी ते दोघेजण एखाद्या छानदार उपाहारगृहात जाऊन तासन् तास गप्पा मारीत बसत. इनेसा या वेळी छत्तीस वर्षांची असली तरीदेखील तिने आपल्या यौवनाची झळाळी किंचितही कमी होऊ दिलेली नव्हती. चार्लस् रॅपोपार्ट हा फ्रेंच समाजवादी कार्यकर्ता लेनिनकडे अधूनमधून येत असे. तो म्हणायचा,

"कोणीही इनेसाकडे एकदा पाहिले की त्याचे डोळे तेथून हलायला तयार होणार नाहीत."

एकाटेरिना कुस्कोव्हाने लिहिले आहे– 'मी इनेसाला दोनदाच पाहिले. परंतु दीर्घकाल लक्षात राहावे असे तिचे लाखांत उठून दिसणारे रूप होते. बेढब ऋपस्काया-पुढे तर तिचे सौंदर्य विशेषच नजरेत भरे." लेनिनचे पॅरिसमधल्या कामगारांसाठी जी शाळा काढली होती, तीत इनेसाही शिकवू लागली. तिचा तास असला की लेनिन मुद्दाम त्या वर्गात हजर राही. ऋपस्काया मात्र कधीच तिच्या व्याख्यानांना जात नसे. लेनिन, ऋपस्काया आणि इनेसा या तिघांचे जीवन वरकरणी शांत दिसत असले तरी ऋपस्काया आपले दुःख मुकाट्याने गिळत होती. लेनिन इनेसापायी वेडापिसा झालेला आहे हे ऋपस्कायाला उघडचा डोळचांनी पाहावे लागे काही काही वेळा हा सारा प्रकार तिला असह्य होई. तेव्हा "मीच येथून निघून जाते," असा ती त्रागा करी. लेनिन म्हणायचा, "नाही, तुला येथेच राहिले पाहिजे."

१९१२ च्या जानेवारीमध्ये प्राग येथे बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांची बैठक भरून तीत बोल्शेव्हिक पक्ष हाच खरा सोशल डेमोक्रॅटिक पक्ष आहे, असे जाहीर करण्यात आले. बोल्शेव्हिकांनी ही भूमिका घेतल्यामुळे बोल्शेव्हिक आणि मेन्शेव्हिक हे गट परस्परांपासून कायमचे दूर गेले. ड्युमातील कामकाजापुरते ते सहकार्याने वागत होते. परंतु ते मर्यादित सहकार्यही लवकरच संपुष्टात येणार होते.

प्राग परिषदेत असेही ठरले की बोल्शेव्हिक सेंटरच्या कार्याचा व्याप वाढत चालल्यामुळे पीटर्सबर्गमध्ये लवकरच एक दैनिक वृत्तपत्र सुरू करावे. या वृत्तपत्राची जबाबदारी मॅलिनोव्हस्की या नव्या कार्यकर्त्यावर सोपविण्यात आली. त्यानुसार मे महिन्यापासून 'प्रावदा' हे पत्र प्रसिद्ध होऊ लागले.

जुलैमध्ये लेनिन, झिनोव्हेव्ह व कामेनेव्ह पॅरिस सोडून गॅलिशियातील क्रॅको येथे राहावयास गेले. लेनिन तेथून 'प्रावदा'चे अग्रलेख धाडत असे. शक्यतो रशियन सीमेजवळ राहिल्यास 'प्रावदा'च्या कामकाजावर लक्ष ठेवणे सुकर जाणार असल्या-मुळे क्रॅको या गावाची निवड करण्यात आली. वर्षभराने इनेसाही तेथे राहावयास आली. परंतु क्रॅकोसारख्या लहान गावात तिला करमेना म्हणून ती पुन्हा पॅरिसला गेली. लेनिन अधून मधून पॅरिसला जाऊन तिला भेटत असे.

क्रॅको येथे राहावयास गेल्यापासून लेनिनला बर्फावरील स्केटिंगची हौस मनसोक्त पुरवून घेता आली. सकाळचे काम संपले की तो स्टेपाशी– झिनोव्हेव्हच्या मुलाशी– खेळत बसे. त्या लहान मुलावर लेनिनचा अतिशय जीव होता. आपल्याला मूलबाळ झाले नाही हे दुःख विसरण्यासाठी स्टेपाला दत्तक घेण्याचा त्याचा विचार होता. परंतु झिनोव्हेव्हने नकार दिल्यामुळे लेनिनला खूप वाईट वाटले.

१९१२ च्या डिसेंबरमध्ये लेनिनच्या निवासस्थानी बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांची बैठक भरली. या बैठकीला पीटर्सबर्ग, मॉस्को, उरल्स, कॉकेशस आदी अनेक भागांतील प्रतिनिधी हजर होते. या बैठकीच्या निमित्ताने कॉकेशसमधील एक तडफदार कार्यकर्ता लेनिनला प्रथमच भेटत होता. त्याच्या कार्यकौशल्याची कीर्ती अगोदरच लेनिनच्या कानांवर गेली होती; म्हणून बैठकीच्या प्रारंभीच लेनिन म्हणाला, "या बैठकीच्या निमित्ताने एका हुशार आणि कार्यकुशल तरुणाचा प्रत्यक्ष परिचय करून घेण्याची आपणांस संधी लाभत आहे. या कार्यकर्त्याचे नाव आहे जोसेफ जुगाशव्हिली'.

(क्रमशः)


अश्वनदीच्या घोंगावत्या आणि फेसाळणाऱ्या प्रचंड लाटांवरून आपल्या इवल्याशा हातांच्या मुठी चोखीत चोखीत गंगेच्या विशाल पात्रापर्यंत शेकडो योजनांचा प्रवास करणारा एक प्रवासी. ज्याची सारी जीवनकथाच हृदयस्पर्शी आहे असा एक

**महारथी.**

महर्षी व्यासांच्या सर्वस्पर्शी प्रतिभेतून
शब्दरूप पावलेल्या महाभारतातील एका अतिप्रमुख पर्वाचा नायक

**सूर्यपुत्र : कर्ण**

एका अभिनव स्वरूपात मराठी वाचकांसमोर सादर होत आहे
सतत सात वर्षे संशोधनाचे परिश्रम घेऊन
लिहिलेली सातशे पृष्ठांची प्रदीर्घ कादंबरी

**मृत्युंजय**

*लेखक : शिवाजी सावंत ( आजरा )*

**कॉन्टिनेन्टल प्रकाशन : टिळक रोड, पुणे : २**

## □ फियाट म्हणता ब्रह्महत्या

हिंदुस्थानात तयार होणाऱ्या मोटार गाड्या का चांगल्या नसतात हे शोधून काढण्यासाठी सरकारने एक समिती नेमली आहे, आणि या समितीने ते शोधून काढण्यासाठी मोटार-मालकांना १८ प्रश्नांचा एक पेपर सोडवायला पाठविला आहे. हे अठरा प्रश्न काय आहेत हे अस्मादिकांना कळण्याचा सुयोग कधी येईल असे वाटत नाही; कारण मोटारीचा अन् आमचा 'निकट'चा संबंध फक्त एकदाच येतो व तो म्हणजे जवळून जाणारी मोटारगाडी अंगावर चिखल उडवून जाते तेव्हा ! तरीदेखील हे प्रश्न काय असायला हवेत याची कल्पना करणे कठीण नाही. उदाहरणार्थ : सारे जहाँसे अच्छा हिंदुस्थान मोटर्स हमारा' हे तुम्हांला कबूल आहे की नाही ? तुमच्याजवळ लँडमास्टर गाडी असेल तर तिचे नाव बँडमास्टर असायला हवे, हे तिचा खडखडाट ऐकल्यावर तुम्हांला पहिल्याच आठवड्यात पटले की तब्बल महिन्यानंतर कळले ? मार्क-टू गाडीला तुम्ही दहापैकी दोन मार्क तरी द्याल काय ? तुम्ही ऐन उमेदीत उमेदीने बुक केलेली फियाट गाडी जेव्हा तुमच्या नातवांना डिलिव्हर होईल तेव्हा ती तुमच्या मोठ्या नातवाला मिळावी की धाकट्या, याचा खुलासा तुम्ही बुकिंग ऑर्डरमध्ये आणि / किंवा मृत्युपत्रात करून ठेवला आहे की नाही ? मोटारीचे नाव स्टँडर्ड असल्यावर तिच्या बनावटीत स्टँडर्ड असण्याची काय आवश्यकता आहे ? तुमची गाडी फियाट किंवा स्टँडर्ड असेल तर ती तुम्ही रात्री कपाटात ठेवता की छोट्याच्या खेळण्याच्या टोपलीत ? मोटारीत बसून वाढलेली चरबी कमी करण्यासाठी मोटार ढकलण्याइतका नियमित व्यायाम दुसरा आहे काय ? हिंदुस्थानी मोटारींच्या हॉर्नमधून हिंदुस्थानी संगीत ऐकू आले तर कसे ? इतकी वर्षे – म्हणजेच इतके 'दिवस' – जाऊनही अजून बेबीकारचा जन्म झाला नाही हे भारत सरकारच्या संततिनियमन मोहिमेच्या यशाचे गमक आहे काय ?

## □ सहावारी समस्या

जगातल्या प्रत्येक देशात हल्ली काही ना काही गोंधळ चालू आहे, पण तेथल्या जनतेचे त्या गोंधळाकडचे लक्ष दुसरीकडे ओढण्याचे तंत्र मात्र प्रत्येक सरकारचे निराळे आहे. उदाहरणार्थ : पाकिस्तानातला गोंधळ वाढला की नापाक भारतीय आपल्यावर हल्ला करण्याच्या बेतात आहेत अशी हाकाटी तेथे सुरू होते. चीनमध्ये आधीच चाललेला गोंधळ उतू जाऊ लागला की, मार्क्सवादाशी बेइमानी करणाऱ्या रशियावर एकदम लाखोली वाहायला सुरुवात होते. आता अमेरिकेसारख्या सुव्यवस्थित देशातही निग्रो गोंधळ सुरू झाला तेव्हा सर्वसाधारण अमेरिकन नागरिकांचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी काय क्लृप्ती योजावी लागली ? न्यूयॉर्क टाईम्ससारख्या-

अग्रगण्य वर्तमानपत्राने बेसबॉल या अमेरिकेच्या आवडत्या खेळावर खरमरीत टीका करणारा एक लेख ठळकपणे छापला ! आता बोला ! निग्रोंची बंडाळी अन् व्हिएट-नामची लढाई हे प्रश्न महत्त्वाचे खरे, पण बेसबॉलवर आलेल्या या वृत्तपत्रीय गंडांतरापुढे त्याचा काय पाड लागणार ? यापुढे प्रत्येक जातिवंत अमेरिकन माणूस निग्रो बंडखोरांनी केलेले कोटयवधी डॉलरचे नुकसान आणि व्हिएटनाममध्ये मेलेले शेकडो अमेरिकन सोजीर असल्या क्षुल्लक गोष्टी विसरून बेसबॉल कसा वाचवावा या चिंतेनें अहोरात्र घेरला जाणार यात शंका नाही. बरे तर बरे, हॉट्डॉग खाणे ही "अन्–अमेरिकन ॲक्टिव्हिटी" आहे असा लेख नाही छापून आला. नाहीतर प्रत्येक अमेरिकन माणसाला प्रत्येक हॉट्डॉगमध्ये साम्यवादाचे जंतू दिसले असते आणि प्रत्येक घासावरोबर साम्यवाद आपल्या अंगात भिनत आहे या विचाराने तो हवालदिल झाला असता.

मला वाटते, ही क्लृप्ती इतरही देशांत लागू पडू शकेल. उदाहरणार्थ : इंग्लंडला कॉमन मार्केटमध्ये प्रवेश मिळत नाही म्हणून सर्वसाधारण ब्रिटिश माणूस चिडला आहे. उपाय ? – क्रिकेटसारखा रद्दी खेळ नाही असा लेख लंडनच्या टाईम्समध्ये छापावा. द गॉलने कानडा–यात्रेत उद्धटासारखे काहीतरी बोलून समस्त फ्रेंच जन-तेला उद्वेग आणला आहे. उपाय ?–फ्रेंच स्वयंपाक अगदी बेचव असतो असे मत मांडावे. अन् आपल्याकडे ?–आपल्याकडे चाललेल्या निरनिराळया गोंधळाकडून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळविण्याचा मला तरी एकच उपाय दिसतो – सकच्छ की विकच्छ या वादाची नवीन आवृत्ती काढणे.

## ☐ पुत्रदेवो भव

चिली या दक्षिण अमेरिकन देशात एका फुटबॉल खेळाडूने एका मॅचमध्ये गोल-कीपर म्हणून काम करीत असताना प्रतिपक्षाचे वारा गोल होऊ दिले म्हणून त्याची तिन्ही तरुण मुले चिडून घर सोडून गेली आहेत, असे परवा वाचले. शाब्बास ! खेळातच काय पण इतरही बऱ्याच बाबतींत तरुण मंडळींनी असा आग्रह धरला तर निदान हिंदुस्थानात तरी परिस्थिती बरीच सुधारेल. उदाहरणार्थ : तुमचे डिपॉझिट जप्त झाले तर मी घरातून निघून जाईन अशी एखाद्या बंड्याने आपल्या उमेदवार बाबांना धमकी दिली तर निवडणुकीतली अर्धी गर्दी कमी होईल अशी माझी खात्री आहे. एखाद्या मंत्र्याचा मुलगा खडसावून म्हणेल, "बाबा, आतापर्यंत तुम्ही सहा कोनशिला बसविल्यात. मी अधिक दगडांचा मारा सहन करणार नाही." एखाद्या नवचित्रकाराचा मुलगा कळवळून म्हणेल, "बाबा, आतापर्यंत तुमची बारा चित्रे उलटी टांगली गेल्याने त्यांना पहिले बक्षीस मिळाले. यापुढे मीच स्वत:ला उलटा टांगून घेईन. अन् माझा मुलगा ! सुदैवाने, मला त्याची भीती नाही. मी लिहिलेल्या अकराच कथा संपादकांकडून साभार परत आल्या आहेत – कारण तेवढ्याच लिहिल्या होत्या. ○




# सोबर्सचा बार्बाडोज आणि भारत

वेस्ट इंडिजचे क्रिकेट कर्णधार गॅरी सोबर्स यांनी अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या ' क्रिकेट इन् द सन् ' या जे. एस्. बार्कर यांचेबरोबर संपादित केलेल्या पुस्तकात ४९ पानावर ' बार्बाडोज ' नावाचे एक छोटेसे प्रकरण लिहिले आहे. २ लाख २० हजार वस्तीच्या आणि १६६ चौरस मैल वस्तीच्या बार्बाडोजने स्वतंत्र झाल्याबरोबर उर्वरित जागतिक संघांशी लढत द्यावी याचा त्यांना जेवढा आनंद, तेवढाच अभिमान वाटतो. कोणच्याही पिढीत बार्बाडोजने कमीत कमी अर्धा डझन तरी क्रिकेट वीर तेथल्या रहिवाशांच्या कौतुकाला दिले आहेत आणि नवोदित खेळाडूला अनुकरण करण्यास सभोवार दिसले आहेत. मॅसन, गुडमन, चॅलेनॉर, ऑस्टिन, मार्टिडेल, वीक्स, वॉरेल, वॉलकॉट, गोडार्ड आणि अगदी सध्याच्या संघातील हंट, नर्स, हॉल, ग्रिफिथ अशी किती नावे सांगावीत ? शिवाय त्यात स्वत: सोबर्स अनुल्लेखिलेले आहेतच. सोबर्स म्हणतात, " इंग्लंडच्या रसिकांना डब्ल्यू. जी. (ग्रेस) हॉब्ज आणि विल्फ्रेड ऱ्होड्स त्यापेक्षाही आम्हा बार्बाडियन लोकांना आमचे खेळाडू अधिक प्रिय वाटतात. " केवळ बढाई मारावयाची म्हणून ते म्हणत नाहीत तर पुढे ते सांगतात, की वेस्ट इंडिजमधील प्रत्येक बेटाला असे वाटते की बार्बाडोजला पराभूत करावे. आणि असे गेली १०० वर्षे चालले आहे.

फलंदाजाचे काम भराभर धावा काढण्याचे, गोलंदाजाचे त्यांना बाद करण्याचे आणि क्षेत्ररक्षकांचे कार्य पहिल्याला रोखावयाचे व दुसऱ्याला साहाय्य करावयाचे असते हे बार्बाडोजच्या खेळाडूला पक्के माहीत आहे. आणि हे करताना निसर्गाच्या देणगीवर ते अधिक अवलंबून राहतात. म्हणजे बार्बाडोजमध्ये क्रिकेटचे शिक्षणच नाही, असे मुळीच नाही ! पण क्रिकेट-शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या अंगातील कलागुणांचा जास्तीत जास्त त्याला फायदा करून दिला पाहिजे. त्याच्या अंगभूत गुणांना उजळीत वरच्या श्रेणीत त्याला न्यावयाचे हे शिक्षकाचे काम. विद्यार्थी म्हणजे काही दुसरी, तिसरी किंवा चौथी कार्बन कॉपी नाही, की त्याला शिक्ष-

णाच्या दडपणाखाली रेटून निष्प्रभ करावयाचे. एव्हर्टन वीक्स आणि क्लाइड वाल-कॉट हे शिक्षक खेळाडूंच्या नैसर्गिक गुणांना उत्तेजन देतात. बार्बाडोजच्या प्रत्येक चौरस मैलाला एक क्रिकेट क्लब आहे असे म्हटले तरी चालेल. साधारण दीडशे संघ. त्यांचे कार्य सुसूत्र आणि संघटितपणे चालू आहे.

त्यानंतर सोबर्स बार्बाडोजचा इतिहास वर्णन करीत आहेत. ज्यांनी ज्यांनी बार्बाडोजचे क्रिकेट बहरविले त्यांच्याबद्दल चार चांगले उद्‌गार ते काढतात. आणि शेवटी ते लिहितात की, बार्बाडोजला तीनच गोष्टी कळतात. एक, साखरेचं उत्पादन, दोन, रम तयार करावयाची आणि तिसरे, भरपूर क्रिकेट खेळावयाचे !

छोटयाशा मातृभूमीवर प्रेम करणाऱ्या एका महान् क्रिकेटपटूचे हे स्वाभिमानाने स्फुरलेले स्वगत आहे. भारतात एक मुंबई सोडली तर इतर प्रांतांतले कितीसे खेळाडू आपल्या राज्यावर असे मनापासून प्रेम करतात? नोव्हेंबर महिन्यात ऑस्ट्रेलियाला जाणारा भारतीय संघ निवडताना दत्त रे, माधव मंत्री, हेमू अधिकारी आणि गुलाम अहमद यांनी त्याचा जरा तपास करावा. भारतीय क्रिकेटचे भवितव्य उज्ज्वल करण्यास त्याचा पुष्कळच फायदा होईल.

—मनोहर रेगे

O

पुणे : महाराष्ट्राचे माजी कर्णधारश्री. नाना जोशी भेटले असता त्यांनी भारतीय क्रिकेट संघाच्या पराभवा बद्दल सर्वस्वी पतौडींना दोषी ठरविणे चूक आहे, असे आपले मत व्यक्त केले. मग भारताचा पराभव कोणत्या कारणाने झाला, असे विचारता त्यांनी उत्तर दिले, की आपला संघच कमकुवत होता शिवाय बोर्डेसारख्यांनी फलंदाजी केली नाही. खेळाडूला आयुष्यात 'बॅड पॅच' अनभवावा लागतोच. १९५९ च्या इंग्लंड-दौऱ्यात श्री. नाना जोशी भारतीय संघाचे एक यष्टिरक्षक होते. भारतीय संघात वसंत रांजणे आणि बापू नाडकर्णी असते तर त्यांचा चांगला उपभोग झाला असता, असे शेवटी ते म्हणाले.

O

माजी हेवीवेट मुष्टियुद्धपटू ज्यो लुईस यांना एका वार्ताहराने प्रश्न विचारला, "का हो लुईस, आयुष्यात इतक्या लढती आपण जिंकल्यात, पण तुम्हांलाही कुणी-तरी प्रभावी प्रतिकार केला असणारच ! आतापर्यंत सर्वांत जोरदार ठोसा तुम्हांला कुणी मारला ?"

ज्यो लुईस शांतपणे म्हणाले, "इन्कमटॅक्स ऑफिसने !"

O

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

दि. २ ते ८ सप्टेंबर ६७ चे भविष्य

श्री. गो. जोशी

सायनाचार्य, नासिक

**मेष :** सिंह–रवी आणि तोही पंचमात. हे निसर्गाचे तुम्हांला लाभलेले वरदानच. शिवाय गुरूही त्याच्या संगतीत लवकरच येणार आहे.

शनी आणि मंगळाची तीव्रता हे निश्चितच कमी करतील. तरीसुद्धा हे दिवस निर्भेळ सुखासमाधानाचे नव्हेत. काहीसे जपून आणि दूरदर्शीपणाने वागण्याची या वेळी नितांत गरज भासेल.

चुकूनही अपयश येणार नाही किंवा सांपत्तिक ताणही असह्य होणार नाही. पण त्यासाठी सतत झटावे लागेल. अविश्रांत परिश्रम करावे लागतील.

या आठवडचात नव्या जबाबदाऱ्या वाढू लागतील. स्थावराच्या समस्या निर्माण होऊ नयेत म्हणून थोरांची सल्ला सतत घ्यावी लागेल.

दि. ५ ते ८ या काळी अपेक्षित यश पदरी पडावे.

**वृषभ :** चौथ्या सूर्याची नाराजी आणि उग्र मंगळाचे आव्हान. यामुळे हा आठवडा आपणांस फारसा स्वास्थ्याचा जाणवेल असे दिसत नाही. पण हताश होण्यासारखे काही घडणार नाही. अशा वेळीच तुमची जिद्द जागी होते. निर्धारून उफाळून येते. म्हणूनच नैराश्य–औदासिन्य हे शब्द आपण सदैव विसरू शकता.

या आठवडचात आपल्या राहत्या जागेचा प्रश्न सुटावा. नोकरीधंद्यात फार मोठा लाभ जरी झाला नाही तरी नव्या आशा अंकुरायला लागतील.

भागीदारीच्या व्यवहारात जपून व जुळते मिळते घेऊन वागायला हवे.

पैशाअडक्याच्या व्यवहारात सतत सावध राहायला हवे.

दि. २–३–६–७ या वेळी थोड्याफार अनुकूल घटना घडून याव्यात.

**मिथुन :** पराक्रमस्थानी अनेक महान ग्रहांची उपस्थिती–एवढ्या भांडवलावरही आपण वाटेल ते करू शकाल.

या आठवड्यापासून आपल्यातील सुप्त कर्तृत्वाला जाग येईल. अनेक सहकाऱ्यांना डावलून पुढे जाल. इष्ट मित्रांच्या सहकार्यामुळे नवे व्यवसायक्षेत्र निर्माण करण्यात यश मिळवाल. प्रवास, स्थानांतर, बदल यांपैकी काहीही या वेळी घडावे. सहज काही करावे आणि ते घवघवीत यश घेऊन उठावे, असे पदोपदी प्रत्ययास येईल.

साहित्यिकांना, वृत्तपत्र व्यावसायिकांना आणि हस्तकला कौशल्याचा व्यवसाय करणारांना हे दिवस अपेक्षेबाहेर यशस्वी ठरावेत. प्रगतीच्या नव्या वाटाही दृष्टिक्षेपात यायला लागतील. दि. ४ ते ७ हा काल अपेक्षासाफल्याचा जाणवेल.

**कर्क :** मंगळ चतुर्थातून पसार झाला आहे. आता तुमचा मार्ग कोणीही रोखू शकणार नाही. दि. ७ ला श्रीगणराजाचे आवाहन करून कार्याला सुरुवात करा. सारी कामे निर्विघ्नपणे यशस्वी ठरतील. दैवी साक्षात्कार पदोपदी घडून यायला लागतील. गुरूचे धनस्थानी आगमन घडताच नव्या-आशा अंकुरायला लागतील. नोकरीतील प्रगतीची हुकलेली संधी पुन्हा दिसेल. तिची तत्परतेने दखल घ्या. सांपत्तिक पेचप्रसंगही या गुरूच्या कृपेने सुटायला लागतील.

नवे स्नेहसंबंध जुळून येतील. आरोग्य सुधारेल. स्थावराचा पेचप्रसंग सुटेल. वैचारिक संघर्ष मिटेल. दि. ५ ते ७ या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवू लागेल.

**सिंह :** सूर्य हाच तुमचा परमेश्वर. तो तुमच्या घरी प्रकटला आहे. यापेक्षा आणखी काय हवे ? लवकरच गुरूही तुमच्या राशीत येणार आहे. या सर्व ग्रहस्थितीकडे पाहिल्यानंतर असे म्हणावेसे वाटते की, तुमच्या जीवनातील काल अधिकाधिक चांगला हाच. प्रत्यक्षात फार मोठे लाभ पदरी पडले नाहीत तरी याच काली तुमच्या प्रतिष्ठेची उंची वाढवणाऱ्या अनंत घटना घडून यायला लागतील.

राजकारण हे तुमचे खास क्षेत्र. या क्षेत्रात येथूनच तुमचा दबदबा वाढू लागेल. तुमच्या नेतृत्वाची राजकीय क्षेत्राला नितांत गरज भासू लागेल.

नोकरीधंद्यात उच्चस्थानाचा लाभ घडेल, शैक्षणिक–वैज्ञानिक क्षेत्रात प्रतिष्ठा उंचावेल. दि. ५ ते ८–प्रामुख्याने गणेशचतुर्थी–हे दिवस विशेष उत्साहाचे, आनंदाचे जाणवतील.

**कन्या :** मंगळाचे पराक्रमस्थानी आगमन घडताच त्याने पुकारा केला की, आता तुमच्याकडे वाकड्या नजरेने कोणीही पाहू शकणार नाही.

जी जी कामे व्हावीत म्हणून तुम्ही आजवर धडपड करूनही होऊ शकली नाहीत, ती ती आता झटपट यशस्वी व्हावीत. अनेकांचे सहकार्य लाभेल. अपेक्षित व्यवसाय-धंदे आकार घेऊ लागतील.

या आठवड्यापासून आपले अनेक वेळा प्रवास घडतील. दुरावलेले स्नेहसंबंध पुन्हा जुळून यायला लागतील. व्यवसाय धंद्यातील सारे पेचप्रसंग सुटायला लागतील. कला-क्रीडा क्षेत्रात विक्रम करून दाखवाल. वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभेल. यांत्रिक, वैद्यकीय, रासायनिक क्षेत्रांतील व्यक्तींना हा काल अधिक प्रगतीचा जाणवेल.

दि. २-३-६-७ हे दिवस विशेष लाभाचे ठरतील.

**तूळ :** सूर्य, बध, शुक्र लाभस्थानी. आणि लवकरच गुरूचेही आगमन तिथे. तुमच्या जीवनात कित्येक वर्षांनी लाभलेली ही सर्वोत्तम ग्रहस्थिती तुमची हयात उजळून काढील. परमेश्वर पाठीशी उभा असल्याचा क्षणोक्षणी प्रत्यय येईल.

नोकरीत अनेकांना डावलून पुढे जाल. व्यापारधंद्यात हेवा करण्यासारखे नेत्रदीपक यश लाभेल. धनोत्पादनाचे नवे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील.

या कालात जिवाभावाचे स्नेहसंबंध जुळून येतात आणि साऱ्या हयातभर त्यांचे हार्दिक सहकार्य लाभते.

नोकरीधंद्यासाठी प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल आणि समाजात वैचारिक उत्क्रांती घडवून आणण्यासारखे वातावरण निर्माण होते.

दि. ३ ते ६ या काळात अनेक लाभ पदरी पाडून घ्याल.

**वृश्चिक :** सूर्य दशमात आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचा योग बुध-हर्षल एकादशात. हर्षल लाभस्थानी. ही दुर्मीळ ग्रहस्थिती हयातीतून फक्त एकदाच घडू शकते. जीवनाच्या मध्य कालात ही अवस्था लाभली तर तिच्यासारखा दुसरा लाभ नाही.

या वेळी अनेक ग्रह आपणांवर खूष आहेत. ते आपले सारे सामर्थ्य पणास लावून तुमचे अधिकाधिक भले करण्याचा सतत प्रयत्न करतील.

नोकरीत नेत्रदीपक प्रगती, अनपेक्षित लाभ. यांत्रिक तांत्रिक-व्यवसायात उन्नती या स्वरूपाच्या अनेक गोष्टी या काली घडून आल्याशिवाय राहणार नाहीत.

दि. ४ ते ७ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**धनू :** या वेळी रवि-शुक्र तुमच्या भाग्यस्थानी आलेले आहेत. कलेला प्रतिष्ठा लाभेल तुमच्यामुळेच. या वेळी तुम्हांला शनि-मंगळ अनुकूल नाहीत. पण त्यांची तुम्हांला यत्किंचितही बाधा होणार नाही.

गुरू भाग्यस्थानी आल्यानंतर तर तुमच्या भाग्याला अक्षरशः उधाण येईल.

त्या वेळी तुम्ही कुठेही गेलात तरी तिथे तुमचा सत्कार होईल.

आगामी ८–१५ दिवसांत बदली–बढतीचे योग येतील. साहित्य–कलाक्षेत्रांत तुमची प्रतिभा बहरास येईल. आता सहसा तुमचा मार्ग कोणी रोखू शकणार नाही.

दि. ३–४–५–६ या काळी स्मरणातील अशा अनंत चांगल्या घटना घडून यायला लागतील.

**मकर :** या वेळचे ग्रहमान काहीसे तणातणीचे जाणवेल. अष्टमस्थानी जमलेले अनेक ग्रह सहजासहजी यश पदरी पडू देणार नाहीत. या वेळी आपणांस प्रत्येक गोष्टीसाठी जिवाचे रान करावे लागेल. मंगळ लाभस्थानी येणार असल्यामुळे अंतिम यश तुमचेच आहे. पण ते मिळविताना जिवाचा आटापिटा करावा लागेल.

या ८–१० दिवसांत प्रकृतीला जपा. नोकरीधंद्यात मतभेद वाढू नयेत म्हणून काहीसे पडते घ्या.

या आठवड्यात तरी दूरचे प्रवासाचे शक्य तो टाळा. आणि हात राखून खर्च करा.

दि. ५ ते ८ एवढा काल अनुकूल व उत्साही जाणवेल.

**कुंभ :** बुद्धिजीवी माणसे कुंभ राशीतच पाहावयास मिळतात. आणि सध्याचे दिवस त्यांना इतके अनुकूल आहेत की, त्यांनी या वेळी काहीही केले तरी ते आदर्श असेच घडेल. गुरू सिंहेत येताक्षणीच त्यांचे परिश्रम फलाला येतील.

साडेसाती आता आपण विसरू शकता. दशमस्थ मंगळामुळे तुम्हांला नवा प्रांत काबीज करता येईल. आणि त्या प्रांतात तुमचे प्रभुत्व निरपवादपणे सिद्ध होईल.

या महिन्यात अनेक मोठाल्या उलाढाली होतील, भागीदारीच्या व्यवसायाचे निश्चित ठरेल. सारे प्रयत्न सफल होतील.

दि. ३–५–६–७ या काळी अनेक चांगल्या गोष्टी घडाव्यात.

**मीन :** मंगळ भाग्यात म्हणजे सर्व काही. तो तुमच्या साऱ्या आशाआकांक्षा सफल व्हाव्यात म्हणून सतत प्रयत्नशील राहील.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल. नवे प्रगतीचे क्षेत्र हाती येईल. राजकीय मानसन्मान मिळेल. वृत्तपत्रीय प्रसिद्धीही लाभू शकेल.

साहित्यिकांना–कलावंतांना इतका अनुकूल काल यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळाला असेल.

झालेली हानी भरून निघेल, हुकलेली संधी पुन्हा लाभेल. हरवलेले स्वास्थ्य गवसेल.

दि. ४ ते ७ या काळी अनेक कामे गती घेऊ लागतील.

○

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649


# आता पुढे काय !

'हिटलरचे जीवन जेवढे नाट्यपूर्ण, तेवढेच श्री. कानिटकर यांचे निवेदनही नाट्यपूर्ण आहे. प्रत्येक प्रकरणाची अखेर लेखकाने अशा खुबीने केलेली आहे की, ज्यांना हिटलरच्या जीवनाची रूपरेषा माहीत आहे, त्यांनाही, प्रत्येक प्रकरण संपताच, आता पुढे काय, हे जाणून घेण्याची उत्कंठा लागून राहते.' –'युद्धनेतृत्व'कार दि. वि. गोखले

[ महाराष्ट्र टाईम्स ]

हिटलरच्या उदयास्ताचे नाट्यपूर्ण निवेदन

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर